म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक | सन |
| --- | --- | --- |
| चरित्र | व्यं. खं. पेंढावे, इनामदार जेजुरीकर. | १८७७ |

ग्रंथालय क्रमांक ९२ / ३४४

पुस्तकाचें नांव मल्हारी चरित्र जेजुरी इतिहास.

९२

मल्हारी (चरित्र)

जेजुरी इतिहास

स.प ३५५५
पं.

पे. ४८.

# मल्हारी चरीत्र अथवा जेजुरी इतिहास

हें पुस्तक

बळवंत खंडेराव पेशवे इनामदार जेजुरकर

यानीं केलें

ते

पुणें पेठ शनवार येथें.

“ पुना सिटी प्रेस” छा० छा०

शके १७९९

किंमत १० आणे.



प. ५८

# प्रस्तावना.

सांप्रत इंग्रजसरकारचें राज्य असल्यामुळें या हिंदुस्थानांत विद्येचा प्रसार बराच झाला आहे. छापखाना हें यंत्र या देशांत आल्यामुळें वेदोक्त व पुराणोक्त ग्रंथ छापून प्रगट झाले आहेत, व अनेक रीतीचीं उपयुक्त व मनोरंजक पुस्तकें विद्वज्जनांनीं छापून तयार केलीं आहेत, त्यामुळें सांप्रत काळचे लोकांस प्राचीनकाळची माहिती बरीच झाली आहे. परंतु मार्तंड-भैरवाचे अवतार चरित्राचें पुस्तक नसल्या कारणानें मार्तंड भक्तांस फार अडचण पडती, ह्मणून हें लहानसें पुस्तक तयार करून छापविलें आहे. या ग्रंथास मल्हारी चरित्र अथवा जेजुरी इतिहास असें नांव दिलें आहे, व या पुस्तकाचे दोन भाग केले आहेत. प्रथम भागांत मणिमल्लाची उत्पत्ती व ऋषीमंडळांत झालेला अनर्थ, घृतमारीची व हरिद्रा देवीची उत्पत्ती आणि पुढें अवतार घेऊन मणिमल्लाचा मृत्यु कसा झाला तो प्रकार, व [illegible] जयादासीस वचन आणि जयादासीचे जन्म प्रकरण, व मार्तंडभैरवासी बाणेचा लग्न प्रकार, पुढें मार्तंडभैरवाचे जेजुरीस अगमन व नारदास हृदयस्त मार्तंडभैरवाचे दर्शन हा प्रथम भाग समाप्त झाला. आतां दुसरे भागांत प्रथम सामवेदाचे श्रापामुळें मार्तंडभैरवांनीं श्रीकृष्णास श्वानरूप केलें तो प्रकार, पुढें धर्मराजाचे जेजुरीस अगमन व करा नदीची उत्पती आणि पुढें खटाव कर होळकरादी भक्तांचे चरित्र वर्णन

केलें आहे. हा ग्रंथ मल्हारीमाहात्म व जयाद्रीमाहात्म या उ
ग्रंथाचे साह्यानें केला आहे परंतु म्हाळसा स्वयंवर आ
पुढील भक्तचरित्र हे मात्र जुनें लेखावरून व प्राचीन कविचे
वितेंवरून वर्णन केलें आहे. हा ग्रंथ कल्पित कादंबरी सार
उगीच एखादे विषयाचे वर्णन करून वाढविला नाहीं,
कथाभागावर नजर ठेऊन थोडक्यांत जितका साधवला तित
साधला आहे.

## सूचना.

मी आपले प्रिय मित्रास व देशबांधवांस आणि विद्वज्ज
विनयपूर्वक सूचवितों कीं, मी अल्पमती असून
महत कृत्य हातीं धरिलें. तें सद्गुरू प्रसादें सिद्धीस गेले
खरें, तत्रापि मी मूढ असून तुम्हां समोर येण्याचा हा माझा
मच प्रयत्न आहे, यास्तव दोषादोष न पाहतां, फक्त मार्तंडभै
वाचे नाम महिमेवरच लक्ष ठेऊन या ग्रंथाचा विद्वज्जन स्वीक
करतील, अशी अशा बाळगीत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. २२४
ठाणे सन १९
१३२७

## ॥ मंगलाचरण ॥

॥ धांवत ये शिवसुता ॥ आतां तूं ॥ धृ० ॥ निशिदिनीं तु-
॥ जला नमीतो भावें, सोडूनी सर्व अहंता ॥ कल्यूगा माजी
॥ अवतार प्रभुचा, हाच जाण सत्यता ॥ बालदास हा दीन
॥ हीनरे, तुच प्रभू करविता ॥ पद ॥ चा० ॥ शारदे ॥
॥ आंबिके, पूर्ण चांद्रिके, पाव रेणुके दीन बालके, तारी तूं
॥ माते ॥ तुज वांचून कोण आम्हांला त्राते ॥ इंदीरे, भावें मी
॥ स्मरें, संकट हरें, जगउध्धरें तु जगदंबे ॥ आदी शक्ती तारक
॥ पूर्ण कदंबे कुरळे, केश सुंदरी, मुहूर्त गोजरी, रती रूपह-
॥ री, वीधिची तनया ॥ ये मयुरा रूढ गर्व हराया ॥ नमितो,
॥ भावें स्तवितो, नेत्री पाहतो, मनी धरीतो, स्वरूप गोजीरे ॥
॥ आंतरी ध्याता चित्त वृत्तिला हरे ॥ चाल ॥ जगाची ता-
॥ रकबाळी, सुंदरी ॥ पुष्पाची शीरी ती जाळी, गोजरी ॥
॥ बालके तीन्ही हो पाळी उदरी ॥ पसरून मायेचा [illegible],
॥ आंतरी ॥ आंतरी, शुद्धता करा, भावानें स्मरा, स्वये उद्धरा,
॥ आपणापेची ॥ बाळदास म्हणे कर्णी या मायेची ॥

### ॥ आर्या ॥

गणपती चरणी नमुनी, विधी तनया शारदा अशी नमिली ॥
श्रीगुरू चरणी लीन मी, साधु सज्जन सुमंडळी नमिली ॥ १ ॥

# मल्हारी चरित्र अथवा जेजुरी इतिहा

## भाग १ ला.

देव दानव हे सापत्न बंधु असून त्यांचे आपआपसात वै
स्य होतें, हें सर्वांस ठाउकच आहे. त्यांतीलच एक इति
खालीं लिहितों, तो येणेंप्रमाणें:—कृतयुग लागण्याचे पूर्वी महा
शेषपर्यंकावर योगनिद्रेंत निमग्न असतां, त्यांचे कर्णमळा पा
टभ नामें दैत्य उत्पन्न झाले. ते ज वेळेस उत्पन्न झा
महाविष्णूचे नाभिकमलामध्यें ब्रह्मदेव होते, ते त्या दै
ीस पडले. नंतर ते मधुकैटभ दैत्य त्या ब्रह्मदेवास भ
करण्याकरितां उद्युक्त झाले असतां, ब्रह्मदेव भयाभित हो
योगनिद्रेची स्तुति करूं लागले. हे अंबे, बाले, त्रिपुरसुंदरी
दिमाते, कात्यायनी, हे दुष्टअसूर, माझे घातास प्रवर्त झाले आ
यास्तव तूं त्या मधुकैटभास मोह उत्पन्न कर, व महाविष्णूस
आपल्या योगनिद्रेंतून मुक्त कर. ही ब्रह्मदेवाची भाषणें ऐकत
आदिमातेनें महाविष्णूस योगनिद्रे पासून मुक्त केलं. नंतर
हाविष्णु जागृत होत्छाते ब्रह्मदेवाकडे विलोकन करते झाले;
वेळेस त्यांचे दृष्टीस ते मधुकैटभ दैत्य पडले. नंतर महावि
फार त्वरेनें गरुडावर बसून त्या मधुकैटभासी युद्ध करण्या क
तां प्रवर्त झाले, पुढें त्या मधुकैटभाचे व विष्णूचे पंचसहस्र स
त्सर पर्यंत युद्ध चालले असतां, त्या युद्धांत विष्णूचा मोड झा



धुकैटभांनीं पाहून विष्णूस बोलते झाले कीं, तूं आम्हांस श-
ये, आणि इच्छित वर माग आम्हीं देण्यास सिद्ध आहोंत.
दैत्यांची भाषणें ऐकून, महाविष्णु बोलते झाले, जर तुम्हीं मला
देण्यास सिद्ध आहांत तर तुमचा वध ममहस्तानें व्हावा,
वर तुम्ही मला दिला पाहिजे. याशिवाय दुसरे वराची म-
इच्छा नाहीं. ही विष्णूची भाषणें त्या दैत्यांनीं ऐकून घेत-
, नंतर कांहीं वेळ विचार करून विष्णूस बोलते झाले कीं,
हीं तुझे वचनांत बद्ध झालो आहोंत, यास्तव तूं आमचा वध
रशील हे वरप्रदान आम्हीं आपले स्वमुखानें तुला दिलें आहे.
त्या दैत्यांचें उदार कृत्य विष्णूनीं पाहिलें असतां त्यास मोठा
आनंद प्राप्त झाला. व सुप्रसन्न वदनानें त्या दैत्यासी भाषण
करते झाले, तुम्ही अन्यजन्मीं मलाही अजिंक व्हाल असें बोलून
विष्णूनीं आपल्या सुदर्शन चक्रेंकरून त्या मधुकैटभ दैत्यांची शिरे
तात्काळ उडविलीं व सर्व शरीर छिन्नविछिन्न केलें. ते वेळेस
त्या मधुकैटभ दैत्यांचा रक्तबिंदु पाताळीं शे... अंधकाराचे पद
झा असतां, त्या शेष लोमगर्भाचेठायीं दोन कि... पन्न
पुढें ते किटक त्याच शेषाचे मस्तकावर परमात्मा प्रसन्न होण्या
करितां, तप करूं लागले. आतां इकडे त्या रक्तबिंदु पासून
जे वेळेस ते कीटक उत्पन्न झाले, ते वेळेस ब्रम्हा विष्णु भयाभीत
होत्साता शंकराकडेस धाऊन गेले, आणि झालेला मजकूर सर्व
शंकरास विदित केला. ते वेळेस शंकरासही मोठी चिंता प्राप्त
झाली असतां महाविष्णु शंकरास बोलते झाले कीं, तुम्ही त्या स्थ

ळीं जाऊन युक्तीनें आपला कार्यभाग साधून घ्यावा. हें विष्णु-वाक्य शंकरानीं ऐकतांच फार त्वरेनें निघाले आणि शेषाचें मस्तकावर ते कीटक तप करीत होते त्या स्थळीं येऊन त्या कीटकांस मोठ्या अभय वचनानें बोलते झाले कीं, मी तुमच्या भक्ती पाहून सुप्रसन्न झालों आहे, तस्मात जी तुह्माला वांछित इच्छा असेल ती मागून घ्या. मी ती तुमची इच्छा पुरविण्यास समर्थ आहे. हीं शंकराचीं भाषणें त्या कीटकांनीं ऐकून घेतलीं, व विनयपूर्वक शंकरास बोलते झाले कीं, जर तुम्हीं इच्छित पुरवीत असाल तरी आमचे हातून नाग, मानुषादि, देवादि देवतेचा पराभव व्हावा व आह्मी अमर होऊन त्रैलोक्याचें राज्य करावें या शिवाय दुसरी इच्छा नाहीं. हें कीटकांचे भाषण ऐकतांच शंकर मौन्य धरून स्तब्ध झाले, व कांहीं वेळ विचार करून तुमचा मृत्यु तुमचे हातूनच होईल, याप्रमाणें बोलले असतां ते कीटक [illegible] देते झाले कीं. तें, कार्यार्थिनों, [illegible] करण्यास असमर्थ होता झालास, अस्तु कांहीं [illegible] हीं, आतां आह्मी कीटक होत्साता तूं जें मागशील तें पुरवितों यास्तव तूं इच्छित मागून घे. हीं त्या कीटकांचीं भाषणें ऐकून मम हस्तानें तुमचा अंत व्हावा ही [illegible] इच्छा आहे ती तुह्मी पूर्ण करावीत.

याप्रमाणें शंकर त्या कीटकास बोलते झाले. पुढें ते शंकराचें वचन त्या कीटकांनीं मान्य केलें, आणि शंकरास विनयपूर्वक बोलूं लागले कीं, आमचा वध अन्य रूपानें करा-

वा, व तुझे चरण आमचे मस्तकीं अक्षयीं राहतील असें केलें पाहिजे. ही त्या कीटकांची प्रार्थना शंकरानीं मान्य केली. नंतर ते कीटकरूपी उभय दैत्य शंकराची स्तुती करून बोलते झाले कीं, देव, पिता, माता, गुरू सर्व प्रकारे आम्हाला तूंच आहेस, यास्तव आमचे नामकर्म करावे, ही त्या दैत्यांचीं भाषणें ऐकून शंकर बोलते झाले कीं, मधुकैटभाचा रक्त बिंदु शेषाचे फणीवर मण्याप्रमाणें पडला, यास्तव मधू दैत्य तो मणी व कीटकाप्रमाणें उद्भवला, व मम हस्तानें त्यय होणार यास्तव कैटभ तो मल्ल याप्रमाणे शंकरांनीं त्या दैत्यांचीं नावें ठेवून ते तेथून निघून गेले. नंतर शंकर निघून गेल्यावर ते मणीमल्ल उभय बंधू त्या स्थळाहून निघाले आणि मृत्यु भुवनी येऊन उदयाद्री पर्वतास मणीचुळ असें नांव देऊन आपलें कुलबांधवासह रहाते झाले. व त्रिभुवनांत आपला अमल चालवूं लागले, तें वेळेस त्या सर्व दैत्यकुळ परिवारांत मणीमल्लच श्रेष्ट होते, ह्मणूनच त्या सर्व दैत्यांनीं राज्य अधिकाराचें पद मल्लासुरासच दिलें. पुढें मल्लासुरास राजा हें पद प्राप्त झाल्यावर त्यानें देवांशीं शत्रुत्व वाढविलें. तें असें कीं नित्यशा आपले परिवारासह काननांत गमन करावे, आणि गौ ब्राह्मण, यांचा छल करावा, स्वर्गलोकीं जाऊन इंद्रादिकांची स्थानें भ्रष्ट करावींत, असा कांहीं काळक्रम चालू असतां एके दिवशीं असें घडून आलें कीं, मणिमल्ल हे उभय बंधु सडे स्वारीनिशीं अरण्यांत फिरत असतां उदयाद्रीचे पाठारी ह्मणजे पूर्व

ळीं जाऊन युक्तीनें आपला कार्यभाग साधून घ्यावा. हें विष्णु-वाक्य शंकरानीं ऐकतांच फार त्वेरेनें निघाले आणि शेषाचें मस्तकावर तें कीटक तप करीत होते त्या स्थळीं येऊन त्या कीटकांस मोठ्या अभय वचनानें बोलते झाले कीं, मी तुमची भक्ती पाहून सुप्रसन्न झालों आहे, तस्मात जी तुह्माला वांछित इच्छा असेल ती मागून घ्या. मी ती तुमची इच्छा पुरविण्यास समर्थ आहे. हीं शंकराचीं भाषणें त्या कीटकांनीं ऐकून घेतलीं, व विनयपूर्वक शंकरास बोलते झाले कीं, जर तुह्मी इच्छित पुरवीत असाल तरी आमचे हातून नाग, मानुषादि, इंद्रादि देवतेचा पराभव व्हावा व आह्मी अमर होऊन त्रैलोक्याचें राज्य करावें या शिवाय दुसरी इच्छा नाहीं. हें कीटकांचेंभाषण ऐकतांच शंकर मौन्य धरून स्तब्ध झाले, व कांहीं वेळ विचार करून तुमचा मृत्यु तुमचे हातूनच होईल, याप्रमाणें बोलले असतां ते कीटक प्रत्युत्तर देते झाले कीं, माते, कांहीं इच्छा पूर्ण करण्यास असमर्थ होता झालास, अस्तु [illegible] कांहीं [illegible] नाहीं, आतां आह्मी कीटक होत्साता तूं जें मागशील तें पुरवितों यास्तव तूं इच्छित मागून घे. हीं त्या कीटकाचीं भाषणें ऐकून मम हस्तानें तुमचा अंत व्हावा हीच इच्छा आहे ती तुह्मी पूर्ण करावीत.

याप्रमाणें शंकर त्या कीटकास बोलते झाले. पुढें ते शंकराचें वचन त्या कीटकांनीं मान्य केलें, आणि शंकरास विनयपूर्वक बोलूं लागले कीं, आमचा वध अन्य रूपानें करा-

वा, व तुझे चरण आमचे मस्तकीं अक्षयीं राहतील असें केलें पाहिजे. ही त्या कीटकांची प्रार्थना शंकरानीं मान्य केली. नंतर ते कीटकरूपी उभय दैत्य शंकराची स्तुती करून बोलतें झाले कीं, देव, पिता, माता, गुरू सर्व प्रकारे आम्हाला तूंच आहेस, यास्तव आमचे नामकर्म करावे, ही त्या दैत्यांचीं भाषणें ऐकून शंकर बोलते झाले कीं, मधुकैटभाचा रक्त बिंदु शेषाचे फणीवर मण्याप्रमाणें पडला, यास्तव मधू दैत्य तो मणी व कीटकाप्रमाणें उद्भवला, व मम हस्तानें क्षय होणार यास्तव कैटभ तो मल्ल याप्रमाणे शंकरांनीं त्या दैत्यांचीं नावें ठेवून ते तेथून निघून गेले. नंतर शंकर निघून गेल्यावर ते मणीमल्ल उभय बंधू त्या स्थळाहून निघाले आणि मृत्यु भुवनी येऊन उदयाद्री पर्वतास मणीचुळ असें नांव देऊन आपलें कुलबांधवासह रहाते झाले. व त्रिभुवनांत आपला अमल चालवूं लागले, तें वेळेस त्या सर्व दैत्यकुळ परिवारांत मणीमल्लच श्रेष्ट होते, ह्मणूनच त्या सर्व दैत्यानीं राज्य अधिकाराचें पद मल्लासुरासच दिलें. पुढें मल्लासुरास राजा हें पद प्राप्त झाल्यावर त्यानें देवांशीं शत्रुत्व वाढविलें. तें असें कीं नित्यशा आपले परिवारासह काननांत गमन करावे, आणि गौ ब्राम्हण, यांचा छल करावा, स्वर्गलोकीं जाऊन इंद्रादिकांची स्थानें भ्रष्ट करावीत, असा कांहीं काळक्रम चालू असतां एके दिवशीं असें घडून आलें कीं, मणिमल्ल हे उभय बंधु सडे स्वारीनिशीं अरण्यांत फिरत असतां उदयाद्रीचे पाठारी म्हणजे पूर्व

आजूस ज्या स्थळीं सप्तऋषी यज्ञ यागादिक कर्मे करीत होते, त्या स्थळीं ते दैत्य जाऊन प्राप्त झाले.

॥पद॥ पहा कसे, दिवस आले खोटे, या चालीवर.

उदयाद्रि, पर्वतावरी सप्तऋषी तरी सह परिवारी आनंदे रहाती॥ मुखी वेद अक्षरे गाती ॥ सुशिल ते बहु ब्राम्हण वेद पठण आणि हावन करती हो नामी ॥ पहा आवदान वोपिती होमी ॥ वेद ... सार काढीती शास्त्र निर्मिती द्वैत सोडती धरूनी भाव ॥ प्रभु चरणी मागती ठाव ॥ असे असतां तये पर्वती ऋषी निश्चिती आले अवचिती मणि आणि मल्ल ॥ येऊन करती ऋषींचे हाल ॥ विप्रासी बहु त्रासिले यज्ञ नासिले आणि गांजिले स्त्रियासी फार ॥ आसुरे केला आनाहोच्यार ॥ द्विज्याची धरूनी मुंडी बुडविती कुंडी झुंडिचे झुंडी विप्र पळताती ॥ शांते दांतेस बहू छळिताती ॥ शांतेच्या कंठी हो ज.ण बांधी पाषाण फिरवी रानोरान वीर विचित्र ॥ होम कुंडांत करती मळ मूत्र ॥ यापरी द्विजा लागुनी, बहु गांजुनी गेले निघुनी अन्य स्थळाला ॥ बहु विप्रास शोक तो झाला :

या प्रमाणें मणि मल्ल दैत्यानीं विप्रसमुदायांत आक्रांत करून व त्यांचा यज्ञ सामुग्री सर्व नासून तें त्या स्थळाहून गमन करते झाले.

॥ पद ॥ मागील.

आसूर गेले निघुनी मग ते मुनी सर्व मिळुनी करती विचार ॥

दग्ध शापानें करू ते वीर ॥ मग त्यांत श्रेष्ठ जे होते झाले बोलते
आणा मनाते वेदाची युक्ती ॥ स्वये शापिल्या नाही की मुक्ती ॥
तरी आतां तुम्हीं सर्वांनी भाव धरूनी प्रभुचरणीं स्वस्थ असावे ॥
स्वये दुःखांत प्रभु गुण गावे ॥

ही श्रेष्ठ, श्रेष्ठ ब्राम्हणांचीं वचनें सर्वांनीं श्रवण करून ( तस्मात प्राक्तनरे, विचित्र बलया, ललाटरेषा खरी ) असे म्हणून सर्व मुनी शांत झाले. नंतर सर्वत्रांनीं परमेश्वर स्तवास आरंभ केला, अशा दुःख समुद्रांत सर्व ब्रम्हवृंद निमग्न असून करूणा-स्वरे, भगवंताचें स्तवन करिताहेत अशा समयीं परम साधु ब्रम्ह तनय जो नारद तो हस्ताचे ठायीं विणा धारण करून व मुखा-नें नारायण नाम उच्चारीत त्या विप्र समुदायांत प्राप्त झा-ला. हें सप्तऋषींनीं अवलोकन करून उठून उभेराहिले आणि आपले जवळ कुशासनावर नारद स्वामीस बसविलें, नंतर सर्व-त्रांनीं नारदाचे चरणकमळ प्रक्षालन करून वंदनें केलीं, पुढें सप्त ऋषींनी देवमुनीची षोडशोपचारे पुजा केली, नंतर विनंती करते झाले कीं, महाराज, दैत्य कुळामध्यें मणिमल्ल उभय असूर उत्पन्न झाले आहेत तें आम्हांस बहुत पिडा करितात वगैरे सर्व झालेला मजकूर सप्त ऋषींनीं नारदस्वामीस विदित केला. त्या सर्व मुनींची दुःखपर भाषणें श्रवण करून नारदास फार गहीवर उत्पन्न झाला. अस्तु, पुढें नारदांनीं सर्वांचें शांतवन केलें. आणि नंतर बोलते झाले हे सप्तऋषी हो, आतां मी तुम्हांस एक विचार सांगतो तो असा कीं, तुम्ही सर्वत्रांनीं आप आपलीं कुटुंबें

बरोबर घेऊन सह्यांद्री पर्वताचे पाठारी दुर्वास ऋषीचा शिष्य लवऋषी आश्रम बांधून राहत आहे; त्या स्थळीं तुम्ही जाऊन आपलीं कुटुंबें ठेवावीत कारण त्या धवलाद्रीचे पंच कोशीस पूर्वी दुर्वास ऋषींनीं शाप दिला आहे तो असा कीं, जो कोणी दैत्य कुळांत उत्पन्न होईल, त्यानें या पंच कोशींत येऊ नये, व जर कोणी माझी आज्ञा भंग करून या धवलाद्रीवर असुर येईल तर, तो तात्काळ जळून भस्म होईल. या कारणानेंच त्या सह्याद्री पर्वताचे पंच कोशींत कोणी असुर जात नाहीं, त्यामुळें तें स्थान निरवैर आहे म्हणून तुम्ही फार त्वरेनें तेथें जावे.

॥ अभंग ॥ दीड चरणी.

॥ तेथें तुम्ही जावे कुटुंब रक्षावे लवासी हो घ्यावे समवेत ॥
॥ सत्वर निघावे इंद्रलोकीं जावे, तयासी सांगावे वर्तमान ॥
॥ विप्राचा कैवारी आहे वज्रधारी, तया असुरारी श्रुत करा ॥
॥ नारदे कथिले विप्रासी मानले, त्वरेनें निघाले तेधवाची ॥
॥ मार्ग ते क्रमीती लवतीर्थी येती, कुटुंब ठेविती लवाश्रमी ॥
॥ सांगती लवाला वृत्तांत जो झाला, लव तो वदला काय तेव्हां ॥
॥ ब्राम्हण मिळूनी वेद ते घेऊनी, इंद्रासी जाऊनी श्रुत करू ॥
॥ कोणतेही रीति विप्र ते जाताती, आणा तुम्ही चित्ती श्रोतेजन॥

लवादी सप्तऋषी सर्व ब्रम्हवृंदा सहवर्तमान स्वर्गीं इंद्र जाण्याकरितां मनोवेगें करून निघाले असतां मार्गांत सुर म्हणजे भागिरथी ही त्यास भेटली, म्हणून सर्वांनीं स्नान सं

षट्कर्मे आचरण केलीं पुढे त्या सुरनदीची शोभा अवलोकन करीत करीत नंदन वनांतून गमन करताहेत.

॥ अभंग ॥ दी०

॥ अमरपुरीची रचना हो कैसी नंदन वनासी विलोकीती ॥
॥ नारळी बकुळी पोफळी जांभळी, रातांजंन केळी, विराजीती ॥
॥ आंम्र आननस, नारींग्या फणस, खिरण्या गोडस, लागल्यासे ॥
॥ वड औदंबर, पिंपळ करीर, निंबते सुंदर शोभताती ॥
॥ मोगरा मालती, गुलाब शेवंती, चंपक डुलती पुष्पभारे ॥
॥ कल्पवृक्ष आदी, पारिज्यातकादी, ऋषीची ती मांदी स्थिरावली ॥
॥ सुरनदी वाहे नयनानी पाहे, स्थिरावे मन हे तेथवाची ॥
॥ तया तीरावर बक ते मयूर, आणिक सुंदर राजहंस॥

अशी रमणीय व मनोवेधक त्या स्थळाची शोभा पाहून त्यास मोठा आनंद प्राप्त झाला, नंतर इंद्रसभेत इंद्राकडे जाण्या· करितां ते तेथून त्वरेनें निघाले. इकडे इंद्रसभेत तेहतीसकोटी देवतेसहवर्तमान देवेंद्र सिंव्हासनावर बसून धर्माधर्म पाहत आहे.

॥ साकी ॥

॥ इंद्र चंद्र जलपती षडानन, कुबेर यमागिरवाण ॥
॥ न्यायनितीनें विचार करती, तव येती ते ब्राह्मण ॥

तो ब्राम्हण समुदाय इंद्रसभेचे महाद्वारांत आला हे देवेंद्रानें पाहून आपले सर्व सुरा सहवर्तमान उठून अनन्यभावानें विप्रास सामोरा गेला. नंतर सर्वांनीं सर्वांस अनुक्रमानें वंदनें केलीं, पुढें

देवेंद्रानें लवादी सर्व ऋषी मंडळास सभेमध्यें आणून मोठ्या सत्कारानें पाद्य अर्घ्यादी षोडशोपच्यारें पुजन केलें, आणि हात जोडून बहुलीनतेनें येण्याचें कारण विचारलें असतां ब्रम्हवृंद बोलताहेत.

॥ साकी ॥

॥ अमरपतीसी वार्ता सांगती, सर्वही ते ब्राह्मण ॥
॥ मणिमल्लानें बहुत गांजिलें, कैवारी तूंचि रे जाण ॥

ही विप्र मुखीचीं भाषणें ऐकून देवेंद्र अतिशय भयाभित होत्साता विप्रास बोलता झाला.

॥ अंजनी गीत ॥

॥ काय सांगू आपणासी ॥ आम्ही देव भीतो त्यासी ॥ मणि
॥ मल्ला झुंजण्यासी ॥ समर्थ नोहे ॥ मुनी आणि सर्व देव ॥
॥ चिंताक्रांत स्वयमेव ॥ तव बोले गुरुराव ॥ काय ते ऐका ॥
॥ चिंतेचे हो नसे काज ॥ वैकुंठीचा महाराज ॥ वृत्त सर्व सांगा
॥ त्यास ॥ तोची कैवारी ॥

हा ब्रहस्पतीनें वर सांगितलेला विचार सर्व देवऋषींस मान्य झाला, नंतर वैकुंठी शेषशाई महा विष्णु भगवान याजकडे जाण्या करितां बृहस्पती आदिकरून सर्व ब्रम्हवृंद व देवेंद्रादी संपूर्ण गिरवाण आपआपल्या वहानावर बसून फार त्वरेनें निघते झाले.

॥ अभंग ॥ दी०

॥ भूदेव निघती, वैकुंठासी जाती, कोणश्या हारीती, पहा तुम्हीं ॥

संचय ३५५



॥ इंद्रादिक देव सप्तऋषी लव, त्यांत अभिनव, नारदहो ॥
॥ मनाचे हो नर, स्वार तयावर, चालले सत्वर, वैकुंठासी ॥

वैकुंठी महाविष्णु अव्यग्र मनानें शेषावर शयन करित होतसाता लक्ष्मी पादसेवन करीत आहे अशा समयांत तो सूर विप्राचा मेळा त्या स्थळीं येऊन प्राप्त झाला.

॥ पद ॥ मागील.

॥ ब्राम्हण आणि सुरवर, करूनि विचार, आले सत्वर, विष्णु
॥ लोकासी ॥ झाला आनंद बहु मानसि॥पाहिले प्रभुसि दुरूनि,
॥ त्वरे धाउनि लीन होऊनि, चरणी नमीताती ॥ कर
॥ जोडूनि बहु स्तविताती ॥ सुंदर तनु कोवळी, मुहूर्त सावळी
॥ कर कमळी, धरूनि चक्र॥ भक्त तारिले प्रल्हाद नक्र ॥ अर्ध
॥ आंगी स्थान लक्ष्मीचे, शयन शेषाचे, आणि ब्रम्ह्याचे,
॥ नाभी ठिकाण ॥ वेद निर्माण तयापासून ॥ कौस्तुभ माळ
॥ कंठांत पोची मनगटांत मुदी बोटांत शोभली नाभी ॥ भ-
॥ क्त वच्छल भक्ताचा स्वामी ॥ कीरिट आणि कुंडलें बहु
॥ शोभले वेद थकले तव गुण गाता ॥ जगजीवन जगाचा
॥ त्राता ॥ टिळक रेखिला भाळी भक्त संभाळी तू वनमाळी
॥ तारी लवकरी ॥ दैत्य मातले आवनी पाठारी ॥

याप्रमाणे, महा विष्णूची, प्रार्थना करून मणीमल्लानें केलेला अधर्म व विप्र समुदायांत झालेला आकांत सर्व विप्रानीं विष्णूस

निवेदन केला असतां महाविष्णूनी नाभी नाभी, अशा शद्बां अभय देऊन नंतर विप्रास बोलते झाले.

॥ दिंडी. ॥

॥ महाविष्णु ते काय बोलताती ॥ मणिमल्लाची फार असे
॥ ख्याती ॥ शिव वरदीते वीरधुंधर ॥ त्यासी वधणारा सांभ
॥ निराकार ॥

मणि मल्लाचा मृत्यू शिव हस्ते आहे यास्तव तुम्हीं सर्व सुरऋषींनीं त्वरे करून कैलास पर्वती शंकराकडेस जावे म्हणजे त्या स्थळीं तुमचा हेतु पूर्ण होईल असें हें विष्णूचें वाक्य सर्वांनीं श्रुत केलें असतां नारदादी मुनींनीं लक्ष्मी कांतास विनंती केली कीं, आम्हां सर्वांसहवर्तमान आपल्हेही येणें झालें पाहिजे. हा सर्वांचा आदररूपी आग्रह पाहून महा विष्णु सर्वांसह वर्तमान आपणही फार त्वरेनें गरुडावर बसून कैलासास जाण्याकरितां निघाले. अशा प्रकारें ते लवादी सर्व ब्रम्हवृंद व इंद्रादी सर्व सुरासह लक्ष्मी पती विष्णु कैलास पर्वती शंकराकडेस गमन करते झाले आणि जातां जातां चंद्रचूड पर्वताची शोभा अवलोकन करताहेत.

॥ पद ॥ मागील.

॥ कैलास पंथ लक्षूनी जाती सुरमुनी पाहती नयनी मार्गाची रचना॥
॥ श्रोतेजनानी आणावी मना ॥ तये स्थळी केळी नारळी, फणस
॥ जांभळी, आणि पोफळी आंब्र अनार ॥ बिल्व वृक्षाची लाग-

|| ली हार || दवणा गुलाब मरवा पाच हीरवा आणि बरवा पा-
|| रिज्यातक || जाई मालती जुई चंपक || त्यामध्यें कोकिळा
|| गाती मोर नाचती हंस बोलती राघू चातक || व्याघ्र
|| सिंहादी रीस जंबूक || अशा वनीं सिद्ध जे मुनी शांत हो-
|| ऊनी हृदय भुवनी ब्रम्ह लक्षीती || कोणी यज्ञादी कर्म
|| करिताती || सोडूनी सर्वही भोग घेतला जोग भव हा रो
|| ग नासीला ज्यानी || जन्म मृत्यूस हटविले त्यांनीं ||

अशा प्रकारे त्या चंद्रचूड पर्वताची शोभा अवलोकन करुन सर्वत्रांचें अंतःकरणास बहूतच आनंद प्राप्त झाला व त्या सर्व देव ऋषींची मनें गंगेचे डोहा सारखी शांत झाली. नंतर शंकराकडे जाण्याकरितां ते तेथून बहुत त्वरेनें निघाले आणि कैलास पर्वतावर ज्या ठिकाणी सप्त कोटी गणासह वर्तमान शंकर आपले प्रिय पत्नीसह विनोद करीत बसले होते त्या स्थळीं ते सुर ऋषी येऊन प्राप्त झाले ; नंतर अनन्य भावानें लिन होऊन स्तुतीस आरंभ केला.

|| पद || मागील.

|| शंकरा, आपर्णावरा, गंगाधरा, भक्तप्रिय करा, पार्वती रमणा ||
|| तुज येऊंदे दिनाची करूणा || पादुका चरणी शोभती हे
|| पशुपती, शोभले हाती नरकपाळ ||चक्रसुनाभ डमरू त्रिशुळा||
आंगाशी भस्माची उटी कौपिन कटी अंकी गोरटी दक्षाची
बाळी || प्रणवरूपिणी जगाते पाळी || व्याघ्राचें शोभे कडा.
सन व्याळभूषण कंठीधारण शिराच्या माळा || तेणे शोभ-

निवेदन केला असतां महाविष्णूनी नाभी नाभी, अशा शद्वे अभय देऊन नंतर विप्रास बोलते झाले.

॥ दिंडी. ॥

॥ महाविष्णु ते काय बोलताती ॥ मणिमल्लाची फार असे
॥ ख्याती ॥ शिव वरदीते वीरधुंधर ॥ त्यासी वधणारा सांभ
॥ निराकार ॥

मणि मल्लाचा मृत्यू शिव हस्ते आहे यास्तव तुम्हीं सर्व सुर-ऋषींनीं त्वरे करून कैलास पर्वती शंकराकडेस जावे म्हणजे त्या स्थळीं तुमचा हेतु पूर्ण होईल असे हें विष्णूचें वाक्य सर्वांनीं श्रुत केले असतां नारदादी मुनींनीं लक्ष्मी कांतास विनंती केली कीं, आम्हां सर्वांसहवर्तमान आपलेही येणें झालें पाहिजे. हा सर्वांचा आदररूपी आग्रह पाहून महा विष्णु सर्वांसह वर्तमान आपणही फार त्वरेनें गरुडावर बसून कैलासास जाण्याकरितां निघाले. अशा प्रकारें ते लवादी सर्व ब्रम्हवृंद व इंद्रादी सर्व सुरासह लक्ष्मी पती विष्णु कैलास पर्वती शंकराकडेस गमन करते झाले आणि जातां जातां चंद्रचूड पर्वताची शोभा अवलोकन करताहेत.

॥ पद ॥ मागील.

॥ कैलास पंथ लक्षूनी जाती सुरमुनी पाहती नयनी मार्गाची रचना॥
॥ श्रोतेजनानी आणावी मना ॥ तये स्थळी केळी नारळी, फणस
॥ जांभळी, आणि पोफळी आंब्र अनार ॥ बिल्व वृक्षाची लाग-

॥ ली हार ॥ दवणा गुलाब मरवा पाच हीरवा आणि नरवा पा-
॥ रिज्यातक ॥ जाई मालती जुई चंपक ॥ त्यामध्यें कोकिळा
॥ गाती मोर नाचती हंस बोलती राघू चातक ॥ व्याघ्र
॥ सिंहादी रीस जंबूक ॥ अशा वनीं सिद्ध जे मुनी शांत हो-
॥ ऊनी हृदय भुवनीं ब्रम्ह लक्षीती ॥ कोणी यज्ञादी कर्म
॥ करिताती ॥ सोडूनी सर्वही भोग घेतला जोग भव हा रो-
॥ ग नासीला ज्यानी ॥ जन्म मृत्यूस हटविले त्यांनीं ॥

अशा प्रकारे त्या चंद्रचूड पर्वताची शोभा अवलोकन करून सर्वत्रांचें अंतःकरणास बहूतच आनंद प्राप्त झाला व त्या सर्व देव ऋषींची मनें गंगेचे डोहा सारखी शांत झाली. नंतर शंकराकडे जाण्याकरितां ते तेथून बहुत त्वरेनें निघाले आणि कैलास पर्वतावर ज्या ठिकाणी सप्त कोटी गणासह वर्तमान शंकर आपले प्रिय पत्नीसह विनोद करीत बसले होते त्या स्थळीं ते सुर ऋषी येऊन प्राप्त झाले ; नंतर अनन्य भावानें लिन होऊन स्तुतीस आरंभ केला.

॥ पद ॥ मागील.

॥ शंकरा, आपर्णावरा, गंगाधरा, भक्तप्रिय करा, पार्वती रमणा ॥
॥ तुज येऊंदे दिनाची करूणा ॥ पादुका चरणी शोभती हे
॥ पशुपती, शोभले हाती नरकपाळ ॥ चक्रसुनाभ डमरू त्रिशुळ ॥
आंगाशी भस्माची उटी कौपिन कटी अंकी गोरटी दक्षाची
बाळी ॥ प्रणवरूपिणी जगाते पाळी ॥ व्याघ्राचें शोभे कडा.
सन व्याळभूषण कंठीधारण शिराच्या माळा ॥ तेणें शोभ-

ला कंठतो नीळा ॥ प्रावर्ण गजाचें चर्म स्वये पाळी धर्म आगिचा घर्न तीच नर्मदा ॥ आला दीनाची चुकवी आपदा॥ चंद्रमा शोभतो भाळी टिळक कपाळी नेत्रानें जाळी स्वये मदनासी ॥ त्र्यंलोचनी रक्षी जगतासी ॥ मस्तकीं जटेचा भार त्यांत ठेवी नार तियेची धार जगपावन ॥ शिव मस्तकीं गंगा जीवन ॥ यापरि बहुस्तविले मनी हर्षले मग बोलले मुनी सुरवर ॥ आवनी मातले दुष्ट असुर ॥ चा० मणी मल्लानें देवब्राह्मण त्रासिले ॥ यज्ञ आधर आणि हवन नासिले ॥ नासिले सर्व तें कर्म करती अधर्म हेचकी मर्म करती विदीत ॥ मुखीं वेद अक्षरें गात.

मणी मल्लानें पृथ्वीवर अधर्म केला व त्या योगानें गौब्राह्मणा- अतिशय दुख प्राप्त झालें. हा सर्व मजकूर भोलानाथानें ऐकून घेतला, नंतर नाभी नाभी अशा शब्दानें अभय देऊन सर्व सुर ऋषीस बोलते झाले, भिऊं नका भिऊ नका. मी आतां- च त्या दुष्ट दैत्यांचा नाश करून धर्माची स्थापना करितो असें ह्मणून नेत्र फिरविले व मोठया क्रोधांत येऊन जान्हू जमीनीवर टेंकले. (आणि मोठया वीर शब्दानें) दुष्टानें मम भक्तांचा छल केला काय? असें अर्धंच बोलून मोठया जोरानें जटेचा भार भुमी- वर ताडण केला. त्या बरोबर त्या स्थळीं एक मोठो भयंकर महामारी राक्षसी उत्पन्न झाली. ती जे वेळेस उत्पन्न झाली ते वेळेस तिच्या तेजानें व शंकराच्या क्रोधाग्नीनें त्या सुर ऋषी- चीं आंगें भाजूं लागलीं तेंव्हां त्या सुरमुनींनीं त्या निशाचरीचे

अंगावर घृत शिंपिलें म्हणून ती शांत झाली व त्याच योगानें शंकराचाही क्रोधाग्नि कांहींसा शांत झाला. नंतर शंकरानीं जी महामारी शक्ती निर्माण केली होती त्या शक्तीवर ऋषींनीं घृत शिंपिलें ह्मणून शंकरांनीं त्या शक्तीचें नांव घृतमारी असें ठेविलें. आणि तिला आज्ञा केली कीं, तूं अग्रभागीं जाऊन मणिमल्लाचें सैन्यास उपद्रव करावा. अशी शंकराची आज्ञा होतांच ती भयंकर शक्ती मणिचूल पर्वताचा मार्ग लक्षून गमन करती झाली. शंकरानीं लवादी सप्तऋषीस आज्ञा केली कीं, तुम्हीं सर्वत्रांनीं संह्याद्रि पर्वताच्या पाठारी जाऊन यज्ञ यागादिक कर्म करावींत आतां आम्ही थोडेंच दिवसांत धर्माची स्थापना करूं. हे शंकर भाष्य सर्व ब्रम्ह वृंदानीं श्रवण करितांच त्या सर्वांस मोठा आनंद प्राप्त झाला. पुढें गिरजा पतीची आज्ञा घेऊन ते सर्व ब्रम्हवृंद तेथून निघाले व संह्याद्रि पर्वतावर येऊन लव ऋषीचे आश्रमानजीक आपापली पर्णकुटिका करून राहते झाले. इकडे ऋषी निघून गेल्यावर शंकरानीं आपले नंदी आदि सप्तकोटी गणास व विष्णु आदि तेहतीस कोटी देवतेस मणिमल्लाशीं युद्ध करण्याकरितां आमचे बरोबर चलावें असें सुचविलें आणि प्रस्थान पीठ संह्याद्रि पर्वतावर लव आश्रमाचे दक्षिणेस नेमिलें. (त्यास हल्लीं कडेपठार म्हणतात) नंतर सुमुहूर्त पाहून शंकरानीं सर्व सुरगणास कैलास पर्वत सोडून प्रस्थानपीठी म्हणजे कडेपठारी जाण्यास आज्ञा केली, व आपण ही समवेत निघाले.

## ॥ अभंग ॥

॥ आज्ञा करी शिव निघताती देव विष्णु ब्रम्हदेव निघालेहो ॥
॥ खगपतीवरी विष्णुची हो स्वारी चक्र धरी करी दुष्टासाठीं॥
॥ ऐरावतीवरी शोभे वज्रधारी सहपरीवारी निघतसे ॥
॥ कृतांत निघाला महिषारूढ झाला सर्व रोग पाळा याच्या असे॥
॥आणिक वरूण सेना ती घेऊन निघालासे जाण तातडीनें॥
॥ सूर्य अश्वावरी चंद्र मृगावरी आणी परोपरी वहनेहो ॥
॥ आपआपल्यारे वहनावरीरे बसुनिया सारे चालीयेल ॥
॥ तेहतीस कोटी सुरगण दाटी स्वारी कडाकोटी निघालीसे॥
॥ आतां शिवगण निघताती जाण वर्णी तया कोण ऐसा नाहीं॥
॥ मुषक वहान निघे गजानन अंकुश तो जाण हस्तीं शोभे ॥
॥ शिखीवरी जाण बैसे षडानन सेनापती जाण देवेंद्राचा ॥
॥ वीरभद्रभट योद्धा तो सुभट शरीर अचाट बहु त्याचे ॥
॥ शृंगी भृंगी भूत रुद्र तो मरूत गणाचे गणीत सप्तकोटी ॥
॥ पिशाच पळती आरोळ्याहो देती दिवल्या शोभती हातामध्यें॥
॥ येळकोट गण उभे ते राहून घे घे हो ह्मणून धावताती ॥
॥ आष्ट ते भैरव कोर्ति अभिनव वंदुनिया शीव चालीयेल ॥
॥ चमुअगाणित निघाली त्वरित मृत्युलोकीं येत कैशापरी ॥
॥ डंका व नौबदी शिंगाडे बहुत हालक्याची मात तेथें कैची॥
॥ सुरू वाद्य रणीं शस्त्रास्त्रे घेउनि कवचे लेवूनि सिद्ध झाले॥
॥ पताका शोभती निशाणें डुलती वीर ते चालती आवेशानें॥
॥ रथी महारथी आणि आती रथी तयाचे सारथी भटा ऐसे॥

॥ स्वार वाजीवर शोभती कुंजर किती भूमीवर चालताती ॥

याप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर सर्व सुरगणा सहवर्तमान शंकर निघाले आणि मोठ्या समारंभानें सह्यांद्रि पर्वतावर येऊन दाखल झाले. नंतर आपआपलीं शिबीरें उभारून रहाते झाले, ते वेळेस गणपतीनें सह्याद्रीचे पूर्वेस डेरे दिले असतां इंद्राचा दूत येऊन गणपतीस बोलू लागला कीं देवेंद्रानें आपल्यास सांगितले आहे कीं, पूर्व बाजूची जागा आमची आहे यास्तव तुम्ही तेथे राहूनये. ज. कदाचित् तुम्ही आमचा अनादर करून पूर्व बाजूस रहा[illegible]डशेप तुमचा आमचा बरेपणा रहाणार नाहीं. ही इंद्र दूत [illegible]लूं लागली ऐकून गणपती क्रोधाविष्ठ होत्साते परत कैलासास [illegible] घ्या आणि हें वर्तमान नंदीला समजतांच त्यानें शंकरास जाऊन व मार्तंडस- ले तेवेळेस शंकरास मोठा क्रोध उत्पन्न झाला व [illegible] पीष्ट करून केली कीं, तूं जाऊन त्या देवेंद्राचे पाशे करून बंधन शरीराचे ठा- पतीस परत घेऊन ये, ही शंकराची आज्ञा होताच नं[illegible]ामसालेचा जवळ आला. आणि पाशे करून इंद्राचे पाय बांधीत[illegible]ल. हे नंतर गणपतीकडे जाऊन त्यांची समजूत करून गणपतीस शंकराकडे घेऊन आला, नंतर शंकरानी ब्रह्मदेवास पाठऊन स- ह्याद्री पर्वताचे पूर्वेस गणपतीची स्थापना केली. या स्थळास हल्लीं मोरेश्वर म्हणतात, पुढें ते सुर ऋषी सह्याद्री पर्वतावर येऊन उतरले असतां ब्रम्हा, विष्णु, महेश हे त्रिवर्ग सह्याद्री पर्वताचे शीर्षावर एकांत बसून मणि मल्लाच्या वधार्थ विचार करीत असतां तप करून आदीमाता प्रसन्न केल्या शिवाय मणि मल्लाचा वध

होणार नाहीं या प्रमाणें ब्रम्हदेव बोलले असतां विष्णु शंकरास बोलते झाले कीं, तप करण्यास मनाची स्थिरता कशाने होईल. हे विष्णुभाष ऐकतांच शंकर बोलते झाले. अहो मूळ सुखास कारण म्हटलें म्हणजे, योगनिद्रा तिलाच समाधी म्हणतात व तिलाच शक्ती म्हणतात ती योगनिद्रा, सत्वगुणे करून सुख करिते, व रजो गुणानें संसार करिते, आणि तमोगुणानें निद्रारूपी मनुष्यास सुखकरिते असी जी त्रिगुणायुक्त आदीमाता, ती अनकूल त्या शिवाय अंतःकरणाची स्थिरता होणार नाहीं हा शंकराची ऐकून महाविष्णु बोलते झाले. अशी जी त्रिपुर सुंदरी तेहतं कोणत्या रीतीनें प्रसन्न होऊन दर्शन देईल, ते कृपा आतां त्रि. मग शिव बोलते झाले. ती त्रिपुरा देवी पाताळा-मुषक व ठायीं पाषाणाचे आंत शिरली आहे. यास्तव, तु-शिखीवर ब्रम्हदेव या त्रिवर्गांनीं वृक्षाचीं रुपें धारण करावीत वीरभद्राकडून पाषाण शिळेचे भेदन करावे म्हणजे त्या त्रि-शृंगाचा शोध लागेल. हे शिवाचें बोलणें ब्रम्हा विष्णूस झालें. पुढें त्या त्रिवर्गांनीं वृक्षाचीं रुपें धारण केली, शिव वटवृक्ष झाले, व महाविष्णु अश्वथ झाले, आणि ब्रम्हदेव पलाश झाले. नंतर आपआपले वृक्ष जवळ बसून देवीची प्रार्थना नाममाले करून करूं लागले, हे प्रणवरूपिणी, आदिमाते, कात्यायनी, वैकुंठवासिनी, महंमाये, बाले, याप्रमाणें त्रिपुरासहस्त्र नामाचा ते त्रिवर्ग जप करीत असतां, एकाएकी विष्णूचे असनाखालीं मोठा भयंकर शब्द झाला ते वेळेस विष्णु भयाभीत होत्साते

असन सोडून ब्रम्हदेवाकडेस गेले आणि झालेला मजकूर सर्व ब्रह्मदेवास विदित केला. नंतर ब्रह्मदेव विष्णूस घेऊन विष्णुचे आसना जवळ आले आणि आपले हाताने ते विष्णूचे आसन त्या स्थळाहून उचलिता झाला. ते वेळेस त्या आसना खालीं पीतवर्ण धनुष्याकृति एक मोठा अंकूर त्यांचे दृष्टीस पडला. नंतर तो अंकूर ब्रह्मा विष्णूनीं शंकरास दाखविला ते वेळेस शंकरानीं सांगितलें कीं हा काल रात्री देवीचा अंकूर आहे. यास्तव अव्यग्र मनानें या प्रणवरूपिणीचे पूजन करावे, नंतर त्रिवर्गांनीं लक्ष्मी सूक्तोक्त मंत्रानें त्या काल रात्री देवीची षोडशोपचारें पूजा केली असतां त्रिपुरा देवी प्रसन्न होऊन बोलूं लागली कीं, ही शीळा भेदन करण्याची मूळ ग्रंथी आहे ती घ्या आणि शुद्धोदके करून प्रक्षालन करा, व माझे मूळ मंत्रानें व मार्तंडमंत्रानें अष्टोतर शत जप करून, नंतर त्या ग्रंथीचे पीष्ट करून उदकानें त्या पिष्टाच्या गोळ्या करा नंतर तें चूर्ण शरीराचे ठायीं धारण करा व पीतोपचारें माझी पुजा करावी व नाममालेचा जप करावा लक्ष जप पूर्ण झाला ह्मणजे शत्रूचा नाश होईल. हे देवीचें वाक्य ऐकून त्या त्रिवर्गांस मोठा आनंद प्राप्त झाला. नंतर या ग्रंथीचें नांव काय? असें त्या त्रिवर्गांनीं देवीस विचारलें असतां, ही ग्रंथी हरिचें आसनाखालीं उत्पन्न झाली या कारणामुळें या ग्रंथीचें नांव मी हरिद्रा असें ठेविलें आहे. पुढें ब्रह्मा, विष्णु, व शंकर, या त्रिवर्गांनीं देवीचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक केली असतां जो तेज्योरूपी सर्व व्यापक परमात्मा तो ज्योतिरूपानें त्या

स्थळीं साक्षांत प्रगट झाला. नंतर शंकरानीं आपले पंचवदन दशभुज शंकररूप अंशतः प्रथक ठेऊन विराटरूप ह्मणजे भैरव स्वरूप धारण केलें. हें पार्वतीनें पाहून लागलीच आपलेही रूप प्रथक ठेवून आपण शक्ती रूप धारण करती झाली. पुढें त्या ब्रह्म तेजानें त्या विराटाचे ऱ्हदयस्थ प्रवेश केला. हें काळानें पाहून विचार केला कीं आतां आपण शक्तीरूपानें भैरवास साह्य व्हावें, नंतर तो काळ स्त्री रूपानें शक्ती स्वरूपांत प्रवेश करिता झाला. म्हणून शक्तिला म्हाळसा असें नामाभिधान प्राप्त झालें. नंतर भैरवांनीं चतुर्भुज मोठें स्वरूप धारण केलें, व मोठा भयंकर शब्द केला. ते वेळेस चंद्रमा भैरवाजवळ आला आणि विनयपूर्वक बोलूं लागला कीं, तुरंगा विषयीं माझी योजना करावीत, ते वेळेस भैरव बोलते झाले कीं आम्हीं तुला मस्तकीं, धारण केला असतां वहन कसें करावें हीं भैरवाची भाषणें ऐकून चंद्रमा पुन्हा बोलूं लागला. जे वेळेस मीं पूर्वीं गुरुद्रोह केला, ते वेळेस मला शाप झाला म्हणून मी जलरूपी झालों. नंतर पुढें आकाशवाणी झाली कीं, जे वेळेस मार्तंड भैरव अवतार होईल ते वेळेस तुला वाजित्व प्राप्त होईल. त्या कारणामुळें मी आपले जवळ येऊन प्राप्त झालों आहे. हे चंद्रमाचें वाक्य भैरवांनीं ऐकून फार उत्तम आहे असें म्हणून त्या तुरंगरूपी चंद्रमास भैरवांनीं वाहन केलें. पुढें तो तुरंगरूपी चंद्रमा सह्याद्रीचे मध्यभागीं अंशतः राहता झाला. त्यास हल्लीं घोडेउड्डान असे ह्मणतात. इकडे मार्तंडभैरवांनीं शंकरास या पर्वताचे ईशान्य कोनास रहाण्याविषयीं आज्ञा केली.

व या शिवस्थानास जयाद्री क्षेत्र असें नांव ठेविलें, आणि सांगितलें कीं, माझी मुख्य पंचस्थानें आहेत तीं अशीं कीं निलाद्री प्रथम स्थान, दुसरें वाराणशी, तिसरें मातापूर, व चौथें हरिद्वार, आणि पांचवें हें जयाद्री क्षेत्र आहे. या सर्व तिर्थीं गेल्याचें पुण्य, एक पंचलिंगाचें दर्शनानें प्राप्त होईल, ही मार्तंडभैरवाची, आज्ञा होतांच शंकर त्या स्थळीं जाऊन पार्वतीसहित राहते झाले. त्यास हल्लीं पंचलिंग ह्मणतात. इतक्यांत इंद्रपर्वताहून इंद्राचा दूत मार्तंडभैरवाकडेस आला, आणि वंदनकरून नंदीनें इंद्राचें पाय पाशेकरून बांधिले वगैरे सर्व मजकूर मार्तंडभैरवास इंद्रदुतानें विदित केला असतां, मार्तंडभैरवानीं त्या दुताजवळ हरिद्राचूर्ण दिलें, आणि सांगितलें कीं हें चूर्ण घेऊन जा व मार्तंडमंत्रे करून त्या पाशावर टाक, ह्मणजे इंद्रबंधापासून मुक्त होईल. मग तो दूत मार्तंडाची आज्ञा घेऊन निघून गेला. पुढें तो दूत इंद्राजवळ आला व भैरवांनीं सांगितल्याप्रमाणें तें हरिद्रा चूर्ण समंत्रक पाशावर टाकीता झाला. तें ज्या वेळेस हरिद्राचूर्ण. पाशावर टाकीलें त्या बरोबर इंद्र पाशबंधा पासून मुक्त झाला नंतर इंद्र फार त्वरेनें निघून मार्तंड भैरवा जवळ आला आणि प्रेमानें धाऊन आनन्य भावें शरण गेला असतां, मार्तंड भैरव बोलते झाले कीं या स्थळी अमक्यानें अमुकच ठिकाणीं रहावे हा कांहीं नेम नाहीं ज्याला वाटेल त्यानें वाटेल त्या स्थळीं रहावे. तस्मात तूं पूर्व बाजूस राहण्याचा आग्रह करूं नकोस. तुला नंदीनें ज्या स्थळीं बंधांत ठेविले होते. त्याच पर्वती तूं आपले सुरासह वास्त-

व्य करावें, ही मार्तंडभैरवाची आज्ञा होतांच देवेंद्र आपले सु वृंदासह जयाद्रिक्षेत्राचे पश्चिमेस डोंगरावर राहता झाला, त्यास सांप्रत पुरंदर किल्ला असें ह्मणतात. आतां इकडे मार्तंडभैरव अवतार धारण करून परमेश्वर मणिमल्लाशीं युद्धास प्रवृत्त झाले आहेत.

॥ पद ॥

॥ सदाशिव भोलाशंकर भक्तप्रियकर धरि अवतार चतुर्भुज
॥ झाला ॥ साजपठाणी तयानें केला ॥ पाणिपात्र नरकपाळ
॥ डमरुत्रिशूळ खंडासोज्वळ धरिला हस्तीं ॥ मणिमल्लाची हा
॥ राया मस्ती ॥ अश्वावर होई प्रभूस्वार शिरीं भंडार म्हाळसा
॥ नार अर्धांगासी ॥ सर्व घेराती प्रभूगणासी ॥ सप्तकोटी
॥ गण घेउनि भाललोचना मृत्युभूवनीं प्रगट झाला ॥ दै
॥ त्यमर्दना अवतार धरिला ॥

जे वेळेस शिवानीं चतुर्भुज रूप धारण केलें ते वेळेस कोटी सूर्याचें तेज भैरवाचें तेजापुढें सर्वांस तुच्छवत् भासूं लागलें, व भयंकर शब्द केला. या दोन कारणामुळें ते वेळेस मार्तंडभैरव असें नांव प्राप्त झालें. आणि काळ शक्तीरूपें अनुकूळ झाला, ह्मणून शक्तीला म्हाळसा असें नामाभिधान प्राप्त झालें, नंतर पुढें मार्तंडभैरवानीं पठाणी साज केला, व अश्ववर स्वार झाले आणि हस्ताचेठायीं त्रिशूळ, डमरु, पाणीपात्र व खंडा, याप्रमाणें शस्त्रें धारण केलीं आणि मोठ्या समारंभानें मणिमल्लासी युद्ध करण्याकरितां तयार झाले. हे मणिमल्लाचे गुप्त हेरानीं अवलोकन

केलें, नंतर तें वर्तमान मल्लासुरास सांगण्याकरितां ते हेर तेथून फार त्वरेनें निघाले. आतां इकडे मणिचुलाचे ठायीं मणिमल्ल आपले दैत्यपरीवारासह कचेरीकरून बसले आहेत, व राज्य प्रकर्णीं अनेक विचार चालूं आहेत; अशा समयीं तो हेर येऊन प्राप्त झाला, व मुजराकरून मणिमल्लापुढें हात जोडून उभा राहिला असतां हें मणिमल्लानें पाहून काय वर्तमान आहे ते मला लौकर सांग असें त्या दुतास विचारिलें असतां त्या हेरानें हात जोडिले आणि मोठ्या लिनतेनें तें वर्तमान सांगण्यास आरंभ केला.

॥ अभंग ॥ दी०

॥ दूत सांगतसे, मणि मल्ला प्रती, कैलासाचा पती येत असे ॥
॥ विप्राच्या कैवारें, इंद्रादीक सारे, विष्णु तो आलारे, युद्धालागीं॥
॥ सप्त कोटी गण, सर्व ते घेऊन, आलाहो धाऊन, सदाशीव ॥

या प्रमाणें दूताचें भाषण ऐकतांच मल्लासुरास मोठा क्रोध उत्पन्न झाला, व हात पाय आपटून नेत्र फिरवित आणि मोठ्या स्वरानें मंत्री जनास हाक मारून बोलूं लागला.

॥ श्लोक. ॥

॥ उद्यम: साहसं धैर्यं, बलं बुद्धि : पराक्रम: ॥
॥ शाड्वेतं यत्र तिष्ठती तत्रदेवोपि शंकत ॥

हे षड्गुण ज्याचे आंगीं वास करितात त्याला देवही भितात आणि ते षड्गुण सांप्रतकाळीं दैत्य कुळास अनुकूळही आहेत आणि असे वचनही आहे.

॥ श्लोक ॥

॥ अश्वन्नैव, गजंन्नैव, व्याघ्रं नैवच, नैवच्यः ॥
॥ अजापूत्र, बलीन् दद्यात, देवो दुर्बल घातका ॥

तस्मात असे जे दुर्बलाचे घातकी, मतीहीन सुरवर ब्राह्मण चा कैवार घेऊन आपल्याशीं समर करण्याची ईच्छा धारण करु न येताहेत, यास्तव तुह्मी संपूर्ण वीरांनीं आपआपले सेनेसह तयार असावें, कारण कोणते वेळेस शत्रू येऊन प्राप्त होईल याचा नेम नाहीं. ही मल्लासूराची भाषणें श्रवण करितांच संपूर्ण वीरांनीं आपआपले हातांतील शस्त्रें सावरिली आणि मोठ्या आवेशानें व वीर शद्बानें भयंकर गर्जना केली आणि आम्हापूढें सुरवरांचे कटक तुच्छवत आहेत असे मल्लासूरास आपआपले भाषणांत सूचऊं लागले. आतां इकडे मार्तंड भैरव आपले सुरगणासह सह्यांद्री पर्वतीं विचार करीत असतां दूतानें येऊन विदीत केलें कीं, मणि मल्ल आपले परीवारासह तयार होऊन युद्धाची मार्ग प्रतीक्षा करीतात हीं दूत मुखीचीं भाषणें ऐकून मार्तंड भैरवास मोठा क्रोध उत्पन्न झाला. नंतर सप्त कोटी गणास आज्ञा केली कीं, तुम्ही आग्रभागी जाऊन, मणी मल्लाचे नगरास वेढा घालावा, अशी भैरवाची आज्ञा होतांच सर्वांनीं प्रभूस वंदनें केली व आज्ञा प्रमाण असे म्हणून निशाणावर घाव दिला आणि रणवाद्यें वाजाविण्यास आरंभ केला.

॥ पद. ॥

॥ दिधला घाव निशाणी, सर्व सुरगणी, तयार होऊनी, शस्त्रें
॥ सावरती ॥ बहू गर्जून शद्ब ते करति॥वाद्याचे नाद उठले,
॥ खग कोंदलें, सैन्य चाललें, बहू गजघाट ॥ तेथें वायूस
॥ मिळेना वाट ॥ मणी चूला नजिक येऊनी, शिवाचे गणी,
॥ जागा पाहूनी दिलासे तळ ॥ युद्ध करण्यास उताहो वेळ ॥
॥ मल्लांच दूते पाहीले, त्वरें धांवले, वृत्त कथिलें दैत्य नृपासी।
॥ विप्र कैवारी कैलासवासी ॥ सुरगणा, सहीतहो आले, नगर
॥ वेढीले, बहु कोपले, शिव शंकर ॥ कथी वृत्त नृपासी हेर ॥
॥ ऐकुनी वृत्त साचार, वीर अनिवार, कोपले फार, वीर
॥ नायक ॥ सुर मजपुढे आहेत किटक ॥ मंत्र्यासी, त्वरे
॥ हाकारीले, वृत्त कथीलें, सुरवर आले, युद्धा कारणें ॥ तुम्ही
॥ यास्तव तयार होणें ॥ कल्होळ, करती आसूर, झाले
॥ तयार, धुरंधर वीर, गर्जती फार ॥ शस्त्र आस्त्रानें शोभले
॥ कर ॥ दळभार, झाला तयार, करून विचार, मणिमल्लासूर
॥ आज्ञाहो करती॥घाव घालीजे निशाणा वरति ॥चाल॥ मणि
॥ मल्लाचे वीर सर्वत्र कोपले ॥ शद्ब गर्जना केली विचित्र,
॥ त्यामुळें ॥ त्यामुळे खग कोंदलें, आसूर चालले, गर्वे फूगले,
॥ जाती रणांत ॥ मनी धरून युद्धांचा हेत ॥

या प्रमाणें दोहीं कडील दळें सिद्ध झाल्यावर रणवाद्यें सुरू झाली, त्या योगानें जो भयंकर नाद उठला तेणेकरून सर्व आकाश कोंदून गेलें.

॥ श्लोक ॥

॥ अश्वन्नैव, गजंन्नैव, व्याघ्रं नैवच, नैवच्य: ॥

॥ अजापूत्र, बलीन् दद्यात, देवो दुर्बल घातका ॥

तस्मात असे जे दुर्बलाचे घातकी, मतीहीन सुरवर ब्राह्मणांचा कैवार घेऊन आपल्याशीं समर करण्याची ईच्छा धारण करुन येताहेत, यास्तव तुह्मी संपूर्ण वीरांनीं आपआपले सेनेसह तयार असावें, कारण कोणते वेळेस शत्रू येऊन प्राप्त होईल याचा नेम नाहीं. ही मल्लासूराची भाषणें श्रवण करितांच संपूर्ण वीरांनीं आपआपले हातांतील शस्त्रें सावरिली आणि मोठ्या आवेशानें व वीर शद्वानें भयंकर गर्जना केली आणि आम्हापूढें सुरवरांचे कटक तुच्छवत आहेत असे मल्लासूरास आपआपलें भाषणांत सूचऊं लागले. आतां इकडे मार्तंड भैरव आपले सुरगणासह सह्यांद्री पर्वतीं विचार करीत असतां दूतानें येऊन विदीत केलें कीं, मणि मल्ल आपले परीवारासह तयार होऊन युद्धाची मार्ग प्रतीक्षा करीतात हीं दूत मुखीचीं भाषणें ऐकून मार्तंड भैरवास मोठा क्रोध उत्पन्न झाला. नंतर सप्त कोटी गणास आज्ञा केली कीं, तुम्ही आग्रभागी जाऊन, मणी मल्लाचे नगरास वेढा घालावा, अशी भैरवाची आज्ञा होतांच सर्वांनीं प्रभूस वंदनें केली व आज्ञा प्रमाण असे म्हणून निशाणावर घाव दिला आणि रणवाद्यें वाजविण्यास आरंभ केला.

॥ पद. ॥

॥ दिधला घाव निशाणी, सर्व सुरगणी, तयार होऊनी, शस्त्रें
॥ सावरती ॥ बहू गर्जून शद्ब ते करति॥वाद्याचे नाद उठले,
॥ खग कोंदलें, सैन्य चाललें, बहू गजघाट ॥ तेथें वायूस
॥ मिळेना वाट ॥ मणी चूला नजिक येऊनी, शिवाचे गणी,
॥ जागा पाहूनि दिल्हासे तळ ॥ युद्ध करण्यास उताहो वेळ ॥
॥ मल्लाच दूते पाहीले, त्वरें धांवले, वृत्त कथिलें दैत्य नृपासी
॥ विप्र कैवारी कैलासवासी ॥ सुरगणा, सहीतहो आले, नगर
॥ वेढीलें, बहु कोपले, शिव शंकर ॥ कथी वृत्त नृपासी हेर ॥
॥ ऐकुनी वृत्त साचार, वीर अनिवार, कोपले फार, वीर
॥ नायक ॥ सुर मजपुढे आहेत किटक ॥ मंत्र्यासी, त्वरें
॥ हाकारिले, वृत्त कथीलें, सुरवर आले, युद्धा कारणें ॥ तुम्ही
॥ यास्तव तयार होणें ॥ कल्होळ, करती आसूर, झाले
॥ तयार, धुरंधर वीर, गर्जती फार ॥ शस्त्र आस्त्रानें शोभले
॥ कर ॥ दळभार, झाला तयार, करून विचार, मणिमल्लासूर
॥ आज्ञाहो करती॥घाव घालीजे निशाणा वरति ॥चाल॥ मणि
॥ मल्लाचे वीर सर्वत्र कोपले ॥ शद्ब गर्जना केली विचित्र,
॥ त्यामुळें ॥ त्यामुळे खग कोंदलें, आसूर चालले, गर्वे फूगले,
॥ जाती रणांत ॥ मनी धरून युद्धांचा हेत ॥

या प्रमाणें दोहीं कडील दळें सिद्ध झाल्यावर रणवाद्यें सुरू झाली, त्या योगानें जो भयंकर नाद उठला तेणेकरून सर्व आकाश कोंदून गेलें.

॥ पद ॥ मा०

॥ मल्लासूर आणि शंकर, उभयते वीर, होऊन तयार, चालून
॥ आले ॥ दोन्ही दळें एकमय झाले ॥ दळभार, चा
॥ गजघाट मिळना वाट, वीर अचाट, बहु गर्जती ॥ श
॥ हातात त्वरे सारयती॥वीर घोष बहु ते कराति, वाद्य वाजती
॥ आवाज होती, शस्त्रअस्त्राचे॥ यूद्ध चालले आसूरगणाचें॥
॥ वीरासी, वीर भिडती, शस्त्रें झगटती, बहू चमकती
॥ विजेच्या परी ॥ नाना रीतीची युद्ध कुसरी ॥ सणसणा
॥ बाण सुटती, तया वरती, आस्त्र प्रेरीती प्रयोग मंत्र ॥
॥ पाश पटीश उल्हाट यंत्र ॥ शिवाचे, दूत अनीवार, देती
॥ बहू मार, करित बेजार, मल्लवीराला ॥ दैत्य सेनेंत आकांत
॥ झाला ॥ वीरभद्र, आणि गणपती, असुराप्रती, चरणें
॥ ताडिती, तेणें व्याकुळ ॥ महंमायेनें केला बहू छळ ॥
॥ भिडती विरासी वीर, अश्व अश्वावर, आणि कुंजर, रथ
॥ रथासी ॥ शस्त्रें मारीती येक मेकासी ॥ रणामध्यें राक्षसी
॥ वीर, बहु बेजार, निघेना धीर, झाले दीनहीन ॥ बहु अनीवार
॥ शीवाचे गण ॥ राक्षसा, प्रती ते गण, चरणीं धरून, बहु
॥ फिरऊन, झोकुनी देती ॥ तेणें सागरी जाऊनी पडती ॥
॥ गर्जना करती अनीवार, शीवाचे च्यार, तेणेहो फार खग
॥ कोंदलें ॥ जय वाद्याचे घोष चालले ॥ सेनेचा मोडती
॥ नयनी, वीरे पाहूनी, आला धाऊनी तो उल्मुलुक ॥ मणि
॥ मल्लाचा सेना नायक ॥ तयानें ख्याती केली फार, तयाचे

॥ वार, बहु आनिवार, तेणें शिव दूत ॥ झाले मानसी बहु ॥ दुःखीत ॥

॥ श्लोक ॥ कामदा.

॥ स्वामी कार्तिके नेत्रीं पाहुनी ॥ कोपला मनीं बहू ते क्षणीं ॥
॥ गर्जना बहू केली त्यावीरें ॥ बाण सोडित धावलात्वरें ॥

वर लिहिल्याप्रमाणें स्वामीकार्तिकास मोठा क्रोध उत्पन्न झाला, व बाण सोडीत त्या सैन्य सागरांत जाऊन मिसळला, आणि मोठी ख्याती केली नंतर मणिमल्लाचा सेनापती जो उल्मुलुक व कार्तिकस्वामी या उभयतांचें युद्ध सुरू झालें. हें वज्रदौंष्ट्रानें अवलोकन करून मोठी भयंकर गर्जना केली, व बाण सोडीत स्वामीकार्तिकावर धाऊन आला, हें गजाननानें पाहून मोठी गर्जना केली आणि वज्रदौंष्ट्रास युद्ध करण्या करितां पाचारण केलें. व कुंतलोमादैत्यास जयनंदीनें हाकामारिले याप्रमाणेंच वीरभद्रादि, शृंगी, भृंगी गणांनीं एकेका वीरास युद्ध करण्याकारितां बोलाविलें. नंतर तीं दोन्ही दळें येकमय झाल्यावर, जो कांहीं अहःकार उठला तो लिहितां पुरत नाहीं असु, पुढें जे वेळेस तीं दोन्ही दळें एक झालीं ते वेळेस मोटी गर्दी उसळली. व वीर शब्दाचा एकच कल्होळ झाला. त्यामुळे सर्व आकाश कोंदून गेले व धुराळ्याची एकच गर्दी उडाली. त्यामुळें त्या दोन्ही सैन्यात कांहीं दिसेनासें झालें. फक्त उल्हाट यंत्राचे व बाणांचे अवाज मात्र ऐकूं येत आणि विरांचे हातांतील शस्त्रें तवेळेस विजेपरी चमकूं लागलीं अशा समयीं असंख्य वीर गतःप्राण झाले व कांहीं विव्हळ होऊन

जमिनीवर प्रेत:प्राय पडले. या समरामध्यें रुधीराचा मोठा प्रवाह चालला, व त्या प्रवाहांत वीरादि अश्वकुंजरांची प्रेतें वरी ते रथवाहून जाऊं लागले. या युद्धांत षडानन, गजानन, व विरभद्र यानी फार ख्याती केली ती अशी कीं, त्या मणिमल्लाचें सैनेंत जाऊन मि: ळाले; आणि फार नासाडी करून सोडली पुढें मणिमल्लाचे वज्र दौष्ट्रादि वीर याजबरोबर फार निकराचें युद्ध केलें. अखेर शिव गणांनीं त्या मल्लवीरास फार त्वरेनें यमलोकांस पाठविले. जे वेळेस उल्मुल्क वज्रदौष्ट्र, व कुंतलोमा हे रणांत गत झाले, ते वेळेस असुरदळांत आहा:कार होऊन त्या सर्व वीरांस पळ सुट ला. इकडे शीव सेनेंत जय वाद्यें वाजूं लागली व सुरवर पुष्प वृष्टी करूं लागले. आणि अप्सरादि गंधर्वांचें नृत्य गायन सुरूं झालें अशा प्रकारचा त्या शिवसैनेंत आनंद होउन राहिला आहे, व स्वामीकार्तिकादि वीरांचा मोठा गौरव करताहेत, आतां इकडे म- णिमल्लाचे जे राहिलेले वीर त्या सर्वांनीं पळ काढिला असतां ते कितीएक मार्गांतच मरण पावले, व कितीएक घायाळ होऊन पडले आणि कांहीं वीर शरिरानें च्छिन्न विच्छिन्न झालेले, तें वीर मणिमल्लाकडे मोठ्या कष्टानें झडतपडत जाऊन पोंहचले. व मोठा उसासा टाकून रडूं लागले, नंतर झालेला मजकूर सर्व म- ल्लासुरास विदित केला, शिवगणांनीं आपले वीरास मारिले व सैनेचा मोड केला, हें वर्तमान मल्लासुरास समजतांच त्यास मोठा क्रोध उत्पन्न झाला, व सिंहासारखी मोठी गर्जना केली आणि उसासा टाकून बोलूं लागला कीं शत्रूनीं ममसेनेंचा नाश

केला काय ? अस्तु कांहीं चिंता नाहीं, गाठ मल्लासुराशीं आहे शिव गणास जय प्राप्त झाला ह्मणून त्यांजला मोठा गर्व प्राप्त झाला असेल, परंतु हा मल्लासूर त्यांचा गर्व छेदन करण्यास समर्थ आहे. असे ह्मणून हातांतील शस्त्र सावरले, आणि मोठा संतप्त होत्छाता नेत्र अरक्त केले व मनामध्यें शत्रूचे घाता विषयीं विचार करीत आहे. अशा समयीं मल्लासुराचा कनिष्ठ बंधू मणि हा जवळच होता, त्यानें ते मल्लासुराचे कृत्य पाहिलें. नंतर बहु लिनतेनें हात जोडून उभाराहिला, व श्रेष्ठ बंधूस रणीं जाण्याविषयीं आज्ञा मागूं लागला.

॥ अभंग ॥ दी०

॥ श्रेष्ठ बांधवारे आज्ञा तूं देईरे ॥ वधीन मी सारे अरीदळ ॥
॥ स्वामिच्या कृपेनें चौदाची भुवनें ॥ जिंकीन भुजेनें स्वयें मीच ॥

ही मणिदैत्याची भाषणें मल्लासुरानें श्रवण करतांच त्यास मोठा आनंद प्राप्त झाला. नंतर मल्लवीरानें मणिवीराचा फार गौरव केला, व ह्मणूं लागला कीं, तूं अद्याप बालक आहेस त्यांतून तुला युद्धाचा प्रसंग कधींच आला नाहीं आणि आजचे दिवशीं समरास एकटाच जाईन ह्मणतोस खरा. परंतु असें अर्धेच बोलून मल्लासूर स्तब्ध झाला. नंतर मणिदैत्य बोलूं लागला मी आपला बाळ आहे खरा परंतु कृतांताला काळरूपी भासत आहे, यास्तव हे श्रेष्ठबांधवा आज कृपा करून या दासास रणीं जाण्या विषयीं आज्ञा करावीत म्हणजे मणि दैत्याचा पराक्रम कोणते रीतीचा आहे हे आपल्यास समजून येईल, ही अवेशाची भाषणें मल्लासुरानें

जमिनीवर प्रेत:प्राय पडले. या समरामध्यें रुधीराचा मोठा प्रवाह चालला, व त्या प्रवाहांत वीरादि अश्वकुंजरांची प्रेतें वरी ते रथवाहून जाऊं लागले. या युद्धांत षडानन, गजानन, व विरभद्र यानी फार ख्याती केली ती अशी कीं, त्या मणिमल्लाचे सैनेंत जाऊन मिळाले; आणि फार नासाडी करून सोडली पुढें मणिमल्लाचे वज्रदौष्ट्रादि वीर याजबरोबर फार निकराचें युद्ध केलें. अखेर शिवगणांनीं त्या मल्लवीरास फार त्वरेनें यमलोकांस पाठविले. जे वेळेस उल्मुल्क वज्रदौष्ट्र, व कुंतलोमा हे रणांत गत झाले, ते वेळेस असुरदळांत आहा:कार होऊन त्या सर्व वीरांस पळ सुटला. इकडे शीव सेनेंत जय वाद्यें वाजूं लागली व सुरवर पुष्प वृष्टी करूं लागले. आणि अप्सरादि गंधर्वांचें नृत्य गायन सुरू झालें अशा प्रकारचा त्या शिवसैनेंत आनंद होउन राहिला आहे, व स्वामीकार्तिकादि वीरांचा मोठा गौरव करताहेत, आतां इकडे मणिमल्लाचे जे राहिलेले वीर त्या सर्वांनीं पळ काढिला असतां ते कितीएक मार्गांतच मरण पावले, व कितीएक घायाळ होऊन पडले आणि कांहीं वीर शरिरानें च्छिन्न विच्छिन्न झालेले, ते वीर मणिमल्लाकडे मोठ्या कष्टानें झडतपडत जाऊन पोंहचले. व मोठा उसासा टाकून रडूं लागले, नंतर झालेला मजकूर सर्व मल्लासुरास विदित केला, शिवगणांनीं आपले वीरास मारिले व सैनेचा मोड केला, हें वर्तमान मल्लासुरास समजतांच त्यास मोठा क्रोध उत्पन्न झाला, व सिंहासारखी मोठी गर्जना केली आणि उसासा टाकून बोलूं लागला कीं शत्रूनीं ममसेनेंचा नाश

केला काय ? अस्तु कांहीं चिंता नाहीं, गाठ मल्लासुराशीं आहे शिव गणास जय प्राप्त झाला ह्मणून त्यांजला मोठा गर्व प्राप्त झाला असेल, परंतु हा मल्लासूर त्यांचा गर्व छेदन करण्यास समर्थ आहे. असे ह्मणून हातांतील शस्त्र सावरले, आणि मोठा संतप्त होत्छाता नेत्र अरक्त केले व मनामध्यें शत्रूचे घाता विषयीं विचार करीत आहे. अशा समयीं मल्लासुराचा कनिष्ठ बधू मणि हा जवळच होता, त्यानें ते मल्लासुराचें कृत्य पाहिलें. नंतर बहु लिनतेनें हात जोडून उभाराहिला, व श्रेष्ठ बंधूस रणीं जाण्याविषयीं आज्ञा मागूं लागला.

॥ अभंग ॥ दी०

॥ श्रेष्ठ बांधवारे आज्ञा तूं देईरे ॥ वधीन मी सारे अरीदळ ॥
॥ स्वामिच्या कृपेनें चौदाची भुवनें ॥ जिंकीन भुजेनें स्वयें मीच ॥

हीं मणिदैत्याची भाषणें मल्लासुरानें श्रवण करतांच त्यास मोठा आनंद प्राप्त झाला. नंतर मल्लवीरानें मणिवीराचा फार गौरव केला, व ह्मणूं लागला कीं, तूं अद्याप बालक आहेस त्यांनून तुला युद्धाचा प्रसंग कधींच आला नाहीं आणि आजचे दिवशी समरास एकटाच जाईन ह्मणतोस खरा. परंतु असें अर्धेच बोलून मल्लासूर स्तब्ध झाला. नंतर मणिदैत्य बोलूं लागला मी आपला बाळ आहे खरा परंतु कृतांताला काळरूपी भासत आहे, यास्तव हे श्रेष्ठबांधवा आज कृपा करून या दासास रणीं जाण्या विषयीं आज्ञा करावीत म्हणजे मणि दैत्याचा पराक्रम कोणते रीतीचा आहे हे आपल्यास समजून येईल, ही अवेशाची भाषणें मल्लासुरानें

श्रवण केली, नंतर मणि दैत्यास सेनेसहीत युद्धो जाण्याकरीतां आज्ञा दिली.

॥ अभंग ॥ दी०

॥ आज्ञा ती देऊन, बहु गौरऊन, असीरवचन, देता झाला ॥
॥ मग त्वरे मणी, निघे तये क्षणी, च्यमु ती वेष्टुनी सर्वे चाले॥
॥ त्वरे रणी अला, सिंहनाद केला, कंप भूमी झाला तेधवाची ॥
॥ आरक्त चंदन, सर्वांगी, चर्चून केल्यासे धारण पुष्पमाळा ॥
॥ स्वार अश्वावरी, खड्ग धरी करी, माथा तो सुंदरी शेंदूरची ॥
॥ किरिट कुंडले बहु ते शोभले, पहातांची भ्याले शिवदूत ॥
॥ वाद्य सुरू झाले, सिंह नाद केले, मग ते मिळाले, अरिदळी ॥
॥ देती मार फार, बाण अनिवार, सोडी झराझर, मणि सैन्य ॥
॥ शस्त्राने मारीती, हस्त छेदीताती, आरोळ्याहो देती, घेघे ऐशा ॥
॥ विरभद्र आणि वृषभ वदनी, शुर्पतो करणी, आणि गण ॥
॥ ऐसे ते मिळून, करती संधान, मणि पुढे जाण सर्व व्यर्थ ॥

या प्रकारे त्या मणी दैत्याने शिव सेनेत, फारच दाणादाण केली व वीरभद्रादी विरास, हातवीर्य करून सोडिले. आपले सर्व गणास मणि दैत्याने फार गांजीले व सेनेचा मोड केला, हे शंकरानीं अवलोकन करतांच त्यास मोठा क्रोध उत्पन्न झाला, नंतर हस्ताचे ठायीं त्रिशुलादी शस्त्र धारण करून मोठ्या त्वरेने त्या दैत्य सैन्य सागरी येऊन मिसळले.

## ॥ अभंग ॥

॥ शंकर कोपले त्वरे धाविन्नले, क्रोधावेशे बोले, प्रभू तेन्हां ॥
॥ क्रोधे शब्द केला, तेणे त्रिलोकाला, दचका पडला विराटासी ॥
॥ रूप प्रगटले, आरी दचकले नेत्रही झांकले, दोही वीरें ॥
॥ मायेचा गोसावी, जग हे चालवी, तोच हा लाघवी, युद्ध करी ॥

नंतर मार्तंड भैरवानी सिंह नादासारखी मोठी गर्जना केली व हस्ताचे ठायीं सहस्रभार लोहाची गदा धारण करून त्या मणि सेनेंत मारीत चालले असतां ते कृत्य मणि वीरानें आवलोकन केले. नंतर आपला शंकरानें मोड केला म्हणून फार कोपाविष्ट होच्छाता शंकरावर धाऊन आला, व धनुष्यास बाण जोडून त्या बाणावर अग्नि अस्त्राची प्रेरणा केली, आणि तो बाण मणिनें मार्तंड भैरवावर सोडिला, तेवेळेस मार्तंड भैरवाचे कटक त्या अग्निमुळे जळून भस्म होऊं लागले. हे शंकरानीं अवलोकन करतांच फार त्वरेने पर्जन्य आस्त्राची प्रेरणा करून, अग्नि शांत केला व मणि वीरावर वातअस्त्र मोठे क्रोधानें सोडिले, त्यामुळे ते दैत्यवीर वस्त्र विरहीत होऊन संपूर्ण हिवाने मरूं लागले. पुढे आंपले कटकाचा बचाव होण्याकरितां मणिनें पर्वत अस्त्र सोडून सर्व वायू बंद करून टाकिला व भैरव सेनेवर वज्रअस्त्राची प्रेरणा केली ते वेळेस संपूर्ण शिव कटकाचा छेद होऊं लागला. हे त्या मणि दैत्याचे कृत्य मार्तंड भैरवानी अवलोकन करतांच नेत्र आरक्त केलें व भिवया वर चढविल्या नंतर मोठ्या क्रोधानें मणि विरावर चाल केली.

## ॥ अभंग ॥ दी०

॥ मार्तंड भैरव संतप्त मानसी, तेणे सागरासी उष्णपणा ॥
॥ त्रितीय नयन, त्वरे उघडून, गेलासे धाऊन, मणि वरी ॥
॥ दचके कृतांत, भुमी कंप होत, शेष सावरीत मस्तकाते ॥
॥ शद्ब भयंकर, केला अनीवार, तेव्हां सर्व वीर गत झाले ॥
॥ नारायण किती, सहस्त्र गणीती, वुचकुळ्या देती प्रभूरूपी ॥
॥ सर्वांचे नयन, गेले ते झाकून, जाताती नीघुन पंचप्राण ॥
॥ कोपला तो भोळा, लक्षीले मणीला, प्रहार तो केला वक्षस्थळीं॥
॥ गदेनें मारीत, त्रिशुळें टोचीत, तेणेहो मुर्छीत मणि झाला॥
॥ शिव शंकरानें वधिला त्वरेनें, केश ते करानें, आकर्षिले ॥
॥ शिरावर पाय देत शिवराय, विगलीत होय दैत्यराज ॥
॥ धन्यधन्य मणि कैलासरमणी, तयाहो लागूनी, तोषवीले ॥
॥ धारा तिर्थीगत, नया स्वर्ग प्राप्त ऐसेहो बोलत वेद श्रूती ॥
॥ विश्वाचा नियंता, मणिला वधिता मुक्ती सायुज्यता, लोळे तेथें॥
॥ दैत्य तो भुपाळ झालासे विव्हळ, परी तो कृपाळ, तया पासी॥
॥ नेत्र उघडीले, ध्यान ते पाहीले, दृढ धरीयेले हृदयांत ॥
॥ देहाचेहो भान, गेला विसरून, झाला असे लीन स्वस्वरूपी ॥

या प्रमाणें त्या मणी दैत्याची शंकरानें हवाल केली त्यामुळें तो मूर्छित झाला, नंतर कांहीं वेळानें सावध झाला, व नेत्र उघडून शंकराकडेस पाहूं लागला, जे वेळेस मणीनें शंकराकडेस अवलोकन केलें, ते वेळेस मणिचें मनांतील द्वेषभाव जाऊन त्यास मोठें ज्ञान उत्पन्न झालें, पुढें त्यानें मनांत असा

विचार केला कीं, परमेश्वर प्राप्ती करून घेणें हेंच भक्ताचे कर्तव्य कर्म आहे, व अशी संधी पुन्हा येणार नाहीं असा मनाचा दृढनिश्चय केला, व सर्व नाशिवंत सुखाचे विसर्जन करून अष्टांग भावानें मार्तंडभैरवास शरण गेला व मुखानें स्तुति करूं लागला.

॥ श्लोक ॥ कामदा.

॥ भुतनायका नमितो तुला ॥ गिरजापती तारि तूं मला ॥
॥ भवसागरीं बुडतसे खरा ॥ हे दयानिधे म्हाळसा वरा ॥
॥ भवसागरीं बहुत त्रासलो ॥ त्यामुळें तुला शरण मी आलों ॥
॥ जन्ममृत्युचे बंध तोडिसी ॥ अजरामर त्वरित करसी ॥

॥ अभंग ॥ दी०

॥ नमो भूतनाथा तारि तूं अनाथा ॥ हास्त ठेविमाथा दा-
॥ साच्या हा ॥ नमो गंगाधरा नमो शिवहरा ॥ नमो दिगंबरा
॥ तुज नमो ॥ नमो भस्मधारि नमो त्रिपुरारि ॥ नमो रुद्रधारि
॥ तुज नमो ॥ नमो भक्तराज नमो महाराज ॥ नमितो मी तुज
॥ अनन्यची ॥

या प्रकारें मणिवीर शंकराचा स्तव करीत असतां देहाचे सर्व भाव विसरून तद्रुपी होऊन गेला. हे शंकरांनीं अवलोकन केलें असतां त्यास मोठा आंनद प्राप्त झाला. नंतर मोठ्या सुप्रसन्नतेनें वरंरोहि वरंरोही, हे मणिदैत्या तुझी भक्ति पाहून मी या वेळेस प्रसन्न झालों आहें तस्मांत जी तुझी मनइच्छा असेल ती मला निवेदन कर मी तुझी इच्छा पुरविण्यास समर्थ आहे, ही मार्तंड-

भैरवाची अभयवचनें मणीनें श्रवण करतांच त्यास परमानंद झाला. पुढे भैरवाजवळ मणीनें मागणें मागितलें तें असें कीं, हाल्ली मम मस्तकावर जो तवचरण आहे, तो अक्षयीं असाच असूं दे, व तुरंगासहित मम स्वरूप तव संनीध वसूंदे आणि मी जे तव स्तोत्र केले आहे ते जो लेखन पठण करील त्याचा मनहेतु पूर्ण करावा, हेच दासाचे मागणें आहे, याशिवाय दुसरी इच्छा नाहीं. ही मणिची भाषणें मार्तंडभैरवांनीं श्रवण केली, व त्यांतील भावार्थ जाणून घेतला. नंतर भैरवांनीं मणीस सांगितले कीं, तुझी इच्छा ज्या प्रमाणें आहे त्या प्रमाणे पूर्ण केली आहे, व तुला मी सायूज्यता, मुक्ति दिली आहे. ही भैरव भाषणें, मणिनें श्रवण करतांच तद्रुपी होऊन गेला, नंतर मणीचे मुखांतून ज्योती निघून मार्तंड भैरवाचे मुखी प्रवेश करती झाली. त्या योगानें मणीचा देह भूमीवर अचेतन पडला. नंतर भैरव सेनेंत जयवाद्याचा गजर होऊं लागला, व सुरवरादि गण गंधर्व आदीं करून सर्वत्र मार्तंड भैरवाचे यश वर्णन करूं लागले व आनंदयुक्त होच्छाते नाना प्रकारची क्रीडा करताहेत, व वारंवार भैरवाचा स्तव करून मणीची युद्ध कौशल्यता व त्याचे अंतसमयाचे वेळची भक्ति या गोष्टीचे क्षणोक्षणी स्मरण करून या मणि वीराची फारफार तारीफ करूं लागले. मार्तंड भैरवानीं मणीस सायूज्यता मुक्ति दिली व मणि वीराची भक्ति पाहून त्याचे कुलाची त्यास मोठी दया उत्पन्न झाली. पुढें मार्तंड भैरवानीं विष्णूस आपले जवळ बोलाविले. आणि त्यास

सांगितले कीं, तुम्ही स्वतः मल्लासुराकडेस जाऊन त्यास सांगावे कीं, ज्या प्रमाणें तुझा बंधु मणि, यानें अखेर मार्तंड भैरवास शरण जाऊन आपले देहाचे सार्थक केले, त्या प्रमाणें तूंही भैरवास शरण जाऊन, पुत्र कलत्रासहीत सुखीहो; जर तूं भैरवास शरण न जासील तर आपले गोत्रजासहीत नाश पावशील या प्रकारें सामदाम भेद करावा. मी तुम्हास सांगणे नको, या कामांत तुम्ही कुशलच आहांत, ही भैरवाची भाषणें विष्णूनीं श्रवण करून लागलीच मल्लासुराकडे जाण्याकरितां विष्णूनीं आज्ञा मागितली. नंतर विष्णु भैरवाची आज्ञा घेऊन मल्लासुराकडे, शिष्टाई करण्या करितां फार त्वरेनें जाण्यास निघाले. आतां इकडे मल्लासुर आपले विरासहीत बसला आहे, व मणिकडील कांहींच वर्तमान कळत नाहीं म्हणून विचार करीत आहे इतक्यांत मणि सेनेंतील कांहीं घायाळ झालेले लोक फार कष्टी होच्छाते, मल्लासुरा जवळ प्राप्त झाले, व म्लान वदनें करून खालीं माना घालून उगीच उभे राहीले आहेत, हे मल्लासुरानें अवलोकन करतांच मनामध्यें खोचून गेला; व त्याचे काळीज धडधुडा उडूं लागले. नंतर मोठा उसासा टाकून काय वर्तमान आहे तें मला लौकर सांगा, याप्रकारें मल्लासूर बोलत असतां, ते घायाळ वीर मोठ्या कष्टानें मणीचा देहांत झाला, वगैरे सर्व मजकूर मल्लासुरास सांगूं लागले. मणीचा देहांत झाला, हे शब्द, मल्लासुराचे कानीं पडतांच त्याचा कंठ सद्गदीत होऊन गेला, व पाण्यानें नेत्र भरून आले, आणि दिल हवाल झाल्या

मुळें तो आपले देहाचे भान विसरून गेला, यामुळें तो सिंहास. ना वरून खालीं भूमीवर प्रेत प्राय पडला. नंतर कांहीं वेळानें स्मृतीवर आला, व मणी वीराविषयीं फार शोक करूं लागला, तेव्हां मल्लासुराचे वीरांनीं मल्लासुराचे फार शांतवन केलें, व आपले भा· षणांत, असें सुचविलें कीं, जर आपण असा शोक करीत बसा· ल तर शत्रूस सवड सांपडून ते प्रबळ होतील मग काय कर तील याचा नेम नाहीं, येवढ्या करितां हे सर्व दुःख एकीकडेस ठेवून ज्यानें आपले बंधूस मारिलें त्याचा सूड उगविण्याकरितां फार त्वरेनें धारा तीर्थीं चलावे, ही त्या वीरांचीं भाषणें मल्लासुरानें श्रवण केलीं, नंतर सर्व दुःखाचे विसर्जन करून मोठ्या क्रोधानें भूमीवरून धडधडून उठला. नंतर आपले वीरासी समरास जा· ण्याचा विचार करीत आहे इतक्यांत गरूडावर बसून लक्ष्मीपती त्या स्थळीं प्राप्त झाले. हे मल्लानें पाहून विष्णूस अभ्यु- त्थान दिलें, व मोठ्या सत्कारानें सिंहासनावर बसविलें. नंतर पाद्य अर्घ्यादि पूजा करून फार लीनतेनें व हात जोडून येण्याचें कारण विचारलें असतां विष्णूनीं सांगण्यास आरंभ केला,

॥ अभंग ॥

॥ मग भगवान बोलले वचन, तुजला कथीन तेची मानीं ॥
॥ प्रल्हादाचें कुळीं जन्म घेतलासी, ह्मणुनि मजसी चिंता
॥ असे ॥ तरी एक करी शिव त्रिपुरारी, तयासी सत्वरी लीन
॥ होई ॥ तेणें शिव भोला प्रसन्न तुजला, पुरविल इच्छेला
॥ सत्यजाण ॥ मार्तंड भैरव प्रभू अभिनव, देवाधिदेव

॥ सत्य तोची ॥ तव बंधू मणी तयानें मृडानी प्रसन्न करूनी
॥ सुखी झाला ॥ त्यानें केलें स्तोत्र प्रसन्न त्रिनेत्र हरिलें ता-
॥ पत्र अक्षयींहो ॥ तरी आतां मल्ला ऐक माझा सल्ला,
॥ मिटउनि हल्ला सुखी होई ॥ पुत्रधनादिक सुखें तीं अनेक ॥
॥ दास ते कित्येक आणि दासी ॥ मेहुणे श्वशूर भ्रातृपुत्रवीर॥
॥ हाय ते कुंजर याहीसह ॥ राज्य हे अवनी स्वताच्या का-
॥ मिनी ॥ सर्वांसी राखुनी सुखी नांदे ॥ मार्तंड प्रभुसी श-
॥ रण रिघसी ॥ तरीच लाधसी सर्व सुख ॥

ही विष्णूची भाषणें मल्लासूरानें ऐकतांच त्यास मोठा क्रोध उत्पन्न झाला, व तो गर्वाची भाषणें करूं लागला.

॥ श्लोक ॥

॥ हंसश्वेतो बकश्वेतो ॥ को हंसो बक ये वहः ॥
॥ पयनीर परिक्षायां ॥ हंसे हंस बको बकः ॥

असे असून त्या जोगड्याची प्रतिष्ठा माझे पुढें वर्णन करिता काय? मी कदापि त्यास शरण जाणार नाहीं. आजचे दिनीं मी रणांत जाऊन शंकराशीं समर करीन, व बंधूचा सूड उगवीन. ही मल्लासुराची भाषणें ऐकून घेतली नंतर महाविष्णु बोलते झाले, हे बापा, जर पतंग उन्मत होऊन दीपकास भक्षण करावयास धावेल तर तोच तात्काळ जळून भस्म होईल, तस्मांत तूं जो समराचा हेतु धारण केला आहेस तो सर्व सोडून मार्तंड-भैरवास शरण जा, म्हणजे पुत्र कलत्रासहित सुखी होशील. ना-

हीं तर ज्याप्रमाणें पतंग आपले देहासहित भस्म होतो त्याप्रमाणें तूं आपल्या काळासहित आंत करून घेशील; ही शेषशाईची भाषणें मल्लासुरानें श्रवण केली, नंतर तो मल्ल पुढें लिहिल्याप्रमाणें बोलूं लागला:—

॥ अभंग ॥ दी०

॥ मग मल्ल बोले वेदानें कथिलें ॥ रणीं जेहो झाले तर्क ॥ नर्क ॥ यास्तव ये क्षणीं जाईन मी रणीं ॥ ख्याती करू ॥ नि दाखवीन ॥ दैत्याचे कुळ बहु ते प्रबळ ॥ तयाचे मी ॥ बाळ मल्लासूर ॥ तुझा सत्य बाळ प्रल्हाद भूपाळ ॥ तयाचा ॥ कृपाळ सत्य तूंचि ॥ तया कुळी मीच जन्मलों रे साच ॥ ॥ रक्षी आतां तूंच मजलागीं ॥ तयाची संतती मींच रे निश्चि. ॥ ती ॥ तरी रमापती बोले स्मरे ॥ आतां जाई वरे शिवासी ॥ कथिरे ॥ मल्ल तो आलारे युद्धालागीं ॥ तयासी मारीन कीं ॥ वा मी मरेन ॥ परि अभिमान सोडिना मी ॥

ही मल्लासुराची भाषणें ऐकतांच विष्णु फार त्वरेनें उठून जाण्यास निघाले असतां मल्लसुरानें वंदन केले, नंतर विष्णूनी त्यास असे सुचविलें कीं, तूं माझे वचनास मान देत नाहींस, असनु कांहीं चिंता नाहीं तू आतां समयाचे वेळेस माझे स्मरण करून मार्तंड भैरवास शरण जा म्हणजे मुक्त होशील, या प्रकारे विष्णूनीं मल्लासुरास सांगितले नंतर गरूडावर बसून शिवाकडे जाण्याकरितां निघाले. इकडे मार्तंड भैरव आपले वीरासहीत मोठे

आनंदात बसले आहेत, व भैरवाचे गण भैरवास नाना प्रकारचे उपचार करताहेत आणि जिकडे तिकडे ब्रम्हानंद होऊन गेला आहे. अशा समयीं मल्लासुराकडून विष्णु प्राप्त झाले असतां मल्लासुराकडील विष्णु काय वर्तमान सांगताहेत, हे ऐकण्या करितां सर्वांची मनें उत्सुक्त झाली व ते सर्व वीर अव्यग्र मनानें शिव विष्णूकडे लक्ष लाऊन बसले, नंतर विष्णूनीं मार्तंड भैरवास हात जोडीले व बहू विनितनें मल्लासूराकडील वर्तमान सांगण्यास आरंभ केला.

॥ अभंग ॥ दी०

॥ विष्णु शिवाप्रती, वार्ता कथिताती ॥ मल्ल युद्धाप्रती येत असे ॥
॥ अनेक प्रकारे बोधिले असूरे. ॥ परी व्यर्थ सारे झाले असे ॥
॥ माझे ते वचन देवादिका मान्य ॥ तोचि हे अमान्य मल्लें केले ॥

ही विष्णूची भाषणें मार्तंड भैरवानीं श्रवण करतांच फार कोपायमान झाले, नंतर सर्व गणास युद्ध करण्या करितां आज्ञा केली ही भैरवाची आज्ञा होतांच ते सर्वत्र वीर, वीरशद्बानें गर्जना करूं लागले, व त्या रणभूमीचे ठायीं शत्रूची मार्गप्रतिक्षा करताहेत अशा समयीं मल्लासुर आपले सेनेसहवर्तमान धारातीर्थी प्राप्त झाला. नंतर पुढें त्या उभय सुरगणाचे समरास आरंभ झाला.

॥ अभंग ॥ दी०

॥ वीररथवारू, गज आणि वारू, चमु धुरंधरू अगाणित ॥

॥ तेणे भुमिकाती, थरारा कापती, चिंता शेषा प्रती पडलीसे ॥
॥ सांवरीत शीर निंघना तो धीर, ऐसा हा विचार झाला तेव्हां ॥
॥ सिंह नाद केले, शस्त्रे सावरीले, येकमय झाले, दोन्ही दळ ॥
॥ रणवाद्य फार दैत्यांचा जो पती करीतसे ख्याती, समरंगणी ॥
॥ शस्त्रे गण दूत, व्याकुळ ते होत, पडले मूर्छित भूमीवरी ॥
॥ तव महामारी कोपालिसे भारी, मग त्वरा करी शिव कन्या ॥
॥ पळत चालली अरीदळीं आली, ख्याती फार केली तियेनें हो ॥
॥ क्षण एक जाण माजविलें रण, केले हो कंदन राक्षसांचे ॥
॥ तिनें मल्लवीर केले बहुचूर, मग मल्लासूर धाविन्नला ॥
॥ शस्त्र अस्त्र सोडी धनु हस्तें ओढी, त्वरे बाण सोडी अनीवार ॥
॥ बाणाचा तो मार तेणे ज्यरज्यर परी अनिवार घृतमारी ॥
॥ मुख पसरिले, शस्त्रास्त्र भक्षिले, मग काय केले तियेनें हो ॥
॥ क्रोधानें धावली, मल्लापासी आली, काय करती झाली महमाया ॥
॥ अनिवार रूप, तेज ते अमुप, नटलीसे खूप विक्राळची ॥
॥ हृदयाहो वर मुष्टिचा प्रहार, करीत सत्वर, मल्लाच्याहो ॥
॥ तेणे तो भुपाळ, झालासे व्याकूळ, घायानें विव्हळ क्षणभरी ॥
॥ सावध तो झाला, क्रोधानें उठला, वर्षू हो लागला सायकांते ॥
॥ अनिवार वीर, सत्य मल्लासुर, सोडीतसे शर, असंख्यात ॥
॥ घृतमारी जाण, मल्लानें देखून, क्रोधाय तो मान, झाला असे ।
॥ अर्ध चंद्रबाण, त्वरेनें काढून, गुणासी लाऊन सोडीतसे ॥
॥ बाणाच्या हो नादें, खग सर्व कोंदे, मोडले ते सांधे, विराटांचे ।

तो अर्ध चंद्रबाण घृतमारीचे वक्षस्थळ भेदून गेला त्या मुळें

घृतमारीचा देह भुमीवर अचेतन पडला असतां मल्लासुरानें तिचे जिव्हेवर तरवारीचा वार केला. घृतमारी विव्हल होच्छाती रणांत मुर्छा येऊन पडली, हे भैरवानें पाहून फार कोपायमान झाले, व मल्लासुरावर धाऊन गेले. हे भैरव कृत्य मल्लानें पाहून भैरवास बोलता झाला.

॥ पद ॥ मा०

॥ मल्लासुर झाला क्रोधीत, आला रणांत, मग बोलत सदाशिवासी॥
॥ व्यर्थ आलास येथे युद्धासी ॥ मजपुढे आहेस किटक भूतनायक,
॥ मागसी भिक स्मशानीं वास ॥ आहे तव चित्त सदा उदास ॥
॥ आवलेचे अधिन आहेस, राख आंगास, मुंडमाळेस केले धारण ॥
॥ सर्व आंगासी नागभूषण ॥ भिक्षेकरी, आहेस निर्बळी संगे
॥ भुतावळी, बहू जमविली, तेणे दैत्यास ॥ झाला बहूत आहेरे त्रास॥
॥ जोगड्या बंधुतीं रणीं मारसी , आतां मजसी करीरे समर ॥
॥ क्रोधे गर्जुनी सोडिले शर ॥ भैरवाचे आंगीं भिनले बहुत्रासिले
॥ मग पाहिले क्रोधे मल्लाला ॥ भाललोचन बहू कोपला ॥ त्रीशूळ
॥ फेकी सत्वर तेणें आसुर, झाले कीं चूर रक्ताचे पूर ॥ बहु चा-
॥ लले वाहती वीर ॥ दोन्ही दळे एकमय होती, अरोळ्या देती
॥ शस्त्रे तोडिती एकमेकाशीं ॥ बहु कोंदला नाद आकाशी ॥ शंक-
॥ रे मांडिलें ठाण सोडिले बाण तेणें रानोरान दैत्यहोपळती ॥
॥ चरणीं धरूनी गणआपटीती ॥ मल्लासूर आला धाऊनि शिवा-
॥ स लक्षुनि, शक्तिकाढुनि क्रोधानें सोडी ॥ शक्ति अनिवार श-

॥ खाशी तोडि ॥ अहाकार दोहिकडे झाला मग तो भोला त्वे
॥ धावला, तोडि शक्तिला ॥ शस्त्रे ताडित तया मल्लाला ॥ ख
॥ ज्याचे घायअनिवार झाला बेजार, परि तो वीर बोले शिवाशी ॥
॥ आहे एक इच्छा मम मानशी ॥ शस्त्रहीन आहे मी खरा ना
॥ ण शंकरा आतां तुह्मी करा मल्लयुद्धास॥मग पाहीन तवबळास॥

माझे बरोबर मल्लयुद्ध करावे असें मल्लासुराचें भाषण शंकराने श्रवण करतांच फार उत्तम आहे असें ह्मणून मल्लयुद्ध करण्यास सिद्ध झाले, पुढें त्या दोघांचे मल्लयुद्ध चाललें असतां एकमेकास धडका देईत व वक्षस्थळावर प्रहार करीत, त्या योगानें मोठे आ वाज होऊं लागले, व भुमीकंप होऊं लागला; आणि ते उभय वीर वारंवार गर्जना करीत त्यामुळें सर्व आकाश कोंदून गेले, व भैरव सैनेंत रणवाद्यें वाजविण्यास आरंभ झाला. येळ कोट गण घे घे शद्बानें नाचूं लागले सर्वत्र सुरवर विमानांत बसून स्वर्ग लोकाहून मल्लासूराचे व मार्तंडभैरवाचें मल्लयुद्ध अ वलोकन करताहेत, आतां इकडे मल्लाचे व भैरवाचे मोठें निक राचें युद्ध चाललें आहे. व एकमेकाचे मर्म लक्षून एकमेकां प्रहार करताहेत, या युद्धांत मल्लानें फार शिकस्थ केली परं भैरवापुढें त्याचा उपाय चालेना, शेवटीं भैरवांनीं त्रितीय नें उघडून व मोठया क्रोधांत येऊन मल्लाचे वक्षस्थळावर प्रहार केला त्या योगानें मल्लाचे मुखांतून आशुद्ध वाहूं लागले व चक्राकार फि रूं लागला. आणि ज्या प्रमाणें एखादा वृक्ष वाऱ्यानें उन्म

न पडतो, त्या प्रमाणें मल्लासुरास होऊन गेले व तो स्मृती रहीत झाल्यामुळें भूमीवर अचेतन पडला. जेवेळेस मल्लासूर पडला ते वेळेस, मार्तंड भैरवाचे पायावर शीर व भूमीवर धड, या प्रमाणें तो पतन झाला असतां त्याचे नेत्रांतून नीर वाहूं लागले त्या योगानें मार्तंडाचे चरण क्षालन झाले. हे मार्तंड भैरवानी पाहिले असतां त्यास मोठा आनंद प्राप्त झाला. म्हणून त्यानें मल्लासुरास कृपादृष्टीनें अवलोकन केले. भैरवकृपा होतांच मल्लासुरास मोठे ज्ञान उत्पन्न झाले द विष्णूनी सांगितलेले गोष्टीचें स्मरण ही झाले. नंतर तो अनन्य भावानें भैरवास शरण गेला.

॥ दिंडी ॥

॥ सदाशीवाचे चरणीं लीन झाला ॥ प्रेमभावानें स्तव आरंभिला ॥
॥ चरणी पादुका शोभती शिवराया ॥ वाम अंकीं ती शक्ति तुझी
॥ जाया ॥ चिताभस्म तें लेपिले सर्व आंगीं ॥ स्मशानवासी तूं
॥ सदाशिवभंगीं ॥ गळा शोभे तो रुद्र रुंड हार ॥ पंचवदन
॥ शोभती दश कर ॥ चंद्र शोभतो सदाशिवभाळीं ॥ भक्ता ला-
॥ गोनि तूंचि प्रभु पाळी ॥ विराजीत मस्तकीं जटाभार ॥ त्यांत
॥ शोभती गंगा शुद्ध नीर ॥ गजचर्माचे तुज परिधान ॥ व्याघ्र
॥ चर्माचे असे कडासन ॥ निळकंठारे कृपा करी आतां ॥ तुच अ-
॥ ससी दिना लागी त्राता ॥ भव अद्रिनें त्रासलों आतांफार ॥
॥ लीन झालोंरे प्रभु आतां तार ॥ दास धरिहो दृढ प्रभु पाय ॥
॥ सत्य जगतांचा प्रभु बापमाय ॥

॥ पद ॥

॥ महाराज शिवशंकर भक्तप्रियकर कृपा ती कर दासाहोवरती ॥
॥ द्यावी अंःतकळीं प्रभुनेंस्फुर्ती ॥ मजसाठीं धरि अवतार
॥ दशी फार बहु अनिवार रुपसुंदर ॥ अर्धंगाशीं म्हाळसा नारी
॥ मंदिल शिरी बांधिला टिळक रेखिला आणिक शोभला भाळीं
॥ भंडार ॥ कंठीं शोभला पुष्पाचा हार ॥ तव नेत्र सूर्य आणि
॥ चंद्र करितो इंद्र दिनाचे भद्र करि सत्वर ॥ जन्ममृत्यूस त्रा
॥ सलों फार ॥ चतुर्भुज प्रभु महाराज ऋषींचे काज पुरवि
॥ आज धरुनिखंडा ॥ बहु केलीस ख्याती मार्तंडा ॥ अश्वाव
॥ स्वार होउनी आलासी रणीं युद्ध करुनि फार शिणलाशी
॥ भावे नमितो तव चरणाशी ॥ म्हाळसापति भैराळा
॥ णाचा मेळा करुनि गोळा मजतारिलें ॥ जन्ममृत्युचें बं
॥ तोडिलें ॥ तरी आतां दीन प्रार्थना आणावी मनां या त्रि
॥ भुवना मधे तूं श्रेष्ट ॥ मम वासना होती जी दुष्ट ॥
॥ येचा नाशकरुनि मजलागुनि त्वरे तारुनि ख्याती केलीस ॥
॥ रि मानशी आहे एकआस॥मल्लाचा अरि तुजप्रति भावे वदता
॥ तयाहो प्रति स्वये तारुनी ॥मुक्तकरावे भाललोचनी ॥ मल्हा
॥ नामें तुज स्मरती तयाहोवरती कृपातीपुरती केली पाहिजे ॥
॥ नामाने प्रभू तूं गाजे ॥ अभंग नमोनमोनमो शिवा तुजनमो
॥ गुतीरे नमो अनन्यची ॥ बुद्धिरूपी दयारूपीदेव तुची



॥ भिन्नव तूजनमो ॥ कामरूपी हार जगाचा उध्दार धर्म तूं शंकर
॥ तूज नमो ॥ कर्ताहर्ता भोळा नमितो मी त्याला स्फुर्तीहि मज-
॥ ला तुची देतां ॥ आहं ब्रह्म स्फुर्ती पावला आहंती निर्मिली
॥ शक्ती ती अदिमाता ॥ मग तीन गुण निर्मिले सगुण शक्ती
॥ तयातीन तूची दिल्या ॥ चौदा भुवनाला अकार आणिला तू-
॥ चि सर्व ठेला बाह्यांतर ॥ ह्मणूनि नमीतों चरण धरितों स्तवन
॥ करितो शक्ती तूझी ॥ प्रपंची वर्तत तयावीरहीत सदा तूं नांदत
॥ आससीरे ॥ नमो विष्णूरूपा, नमो शिवरुपा, लिला ह्या आमुपा
॥ तुझ्याचीरे ॥ परमहंसाय, नमितो शिवाय, चिन्मात्र मुर्तय तूज-
॥ नमो ॥ व्यक्ती वीरहित सदाहो वर्तत परी लिप्ततींत आससीरे॥
॥ मी तो कांय मूढ, तवगुणगूढ व्यर्थ बडबड करीतसे ॥ स्तोत्र
॥ मल्लासूर करीत सुंदर तेणें तो शंकर तोषलारे ॥

ही मल्लासुराची स्तवरूपी भाषणें शुद्ध अंतःकर्णा पासून नि-घालीं. ती शंकरांनीं श्रवण केलीं नंतर मोठ्या प्रसन्नतेनें मल्ला-सुराशीं बोलूं लागले कीं, ह्या वेळेस तुला जी इच्छा असेल ते मागून घे. मी देण्यास सिद्ध आहे, हे मार्तंडभैरवाचें अभय भाष्य मल्लासुरानें श्रवण करतांच बोलूं लागला.

॥ अभंग ॥

॥ तुझा मीरे दास प्रतापि विशेष, न्यून या दासास नसे कांहीं ॥
॥ मृत्युलोकीं वास नाशिवंत खास, कळले मनास सत्य माझ्या ॥
॥ ग्रहधनदारा व्यर्थ हा पसारा, मृत्युरणीं वीरा हेंचि योग्य ॥ इह

॥ लोकीं किर्ती रणीं ज्याची ख्याती, मुक्ति तयाप्रती बोले वेद
॥ विश्वाचा अधार तयाबरोबर, युद्ध अनिवार केलें स्वयें ॥ इच्
॥ मजप्रति एक उमापति, मम नामाप्राति आरि होई ॥ अधी ग
॥ नाव मग नामतव, येवढें पुरीव मनोरथ ॥ पायाखालीं तव रा
॥ मम शव, मार्तंडभैरव मल्हारि तूं ॥मम मुखींस्तोत्र झालें जें
॥ चित्र, भावें जे पवित्र वाचिताती ॥ तयाचा मानस पुर्वावा
॥ त्रास, न करी आळस प्रभुराया ॥

हें मल्लासूराचें औदार्य पाहून, मार्तंडभैरवांनीं हास्य वदन के
लें. व मल्लासुरास आनंदोक्त बोलते झाले कीं, जी जी तुझ
मनीषा होती, ती ती मी सुप्रसन्न मनानें पूर्ण केली आहे. है
मार्तंडभैरवाचें मुखांतून भाषणें निघताहेत इतक्यांत मल्लासुराचे
मुखांतून आत्मस्वरूपाची ज्योती निघून भैरव मुखीं प्रवेश करती
झाली. हा अघटित चमत्कार पाहून सुरगणांनीं वीर शब्दानें
जयजयकार केला, व जयवाद्यें सुरू झालीं, सुरवृंद पुष्पवृष्टी कर
लागले. अशा प्रकारचा त्या स्थळीं एकच ब्रह्मानंद होऊन राहि
ला आहे, आतां इकडे मल्लासुराचें पांच पुत्र होते त्यांची नावें
प्रथम कुंभ, दुसरा सुशील, तिसरा देवगंधर्व, चौथा लोहर्गल,
पांचवा माहाबाहु. हे मल्लासुराचें पांच पुत्र, यांजला मल्लासुर
रणांत पडला हें वर्तमान समजतांच तें पांचही बंधु मोठें क्रोधा
विष्ट झालें व ज्यानें आपले पित्याचा वध केला, त्याचा सूड उग
विला पाहिजे असा विचार करून तें तेथून फार त्वरेनें निघाले
आणि भैरव ज्या स्थळीं होते त्या स्थळीं ते येऊन प्राप्त झाले.



हें मार्तंडभैरवांनीं पहातांच तुह्मी पर्वत व्हाल, असा शाप दिला असतां, तें तात्काळ पांचहि बंधू पर्वत होऊन पडले. नंतर मार्तंड भैरवांनीं सर्व सुरगणास आपआपले स्थानाप्रत जावयास सांगितलें, व ब्रह्मवृंदाचा मोठा आदर केला आणि मी पुढें या स्थळीं प्रगट होईन, असें सांगून मार्तंडभैरव तात्काळ गुप्त झाले. हें चरित्र कृतयुग लागल्यापासून तीन लक्ष वर्षांनीं झालें असें जयाद्री माहत्मीं वर्णिलें आहे. पुढें मार्गशीर्ष शुद्धशष्टी रविवार शततारका नक्षत्रावर मणिचूल पर्वताचे नजिक पृथ्वींतून दोन धनुष्याकृती लिंगें निघालीं; हें ब्रह्मदेवानीं पाहून मार्तंडभैरवाचें मृण्मयध्यान केलें, व वेदोक्त षोडशोपचारें पुजा केली नंतर सप्तऋषीनीं स्तुतीस आरंभ केला.

॥ **श्लोक** ॥ अनुष्टुपछंद.

॥ नमस्ते गिरजानाथा, शंकरा भस्मलेपना ॥ नंदीवाहन सर्वेशा, नि·
॥ लकंठा सदाशिवा ॥ गंगाधरा भालनेत्रा, गजचर्म परिधानका ॥
॥ निलकंठ विराजेतो, रुद्र अवतार साजीरा॥रुंडमाळा गळा शोभे,
॥ त्रिपुरासुरमर्दना ॥ वटवृक्षस्थळीं बैसे, शाश्वत परिधानके ॥ पं·
॥ चवक्र पहा कैसे, वामांगीं पार्वतीवसे ॥ दशपाणी विराजती,
॥ आयुधे दशहस्तकीं ॥ त्रिशूलडमरु आणि, नरकपाल तेधवा ॥
॥ चिताभस्म सर्वअंगीं, गौरवर्ण विराजसे ॥ कद्रुतनय संभूता,
॥ दक्षमख विध्वंसना॥ सागर सूत मारितां, बिल्ववृक्ष करि राक्षसा॥
॥ भिल्लीभवानी कैसीती, ब्रह्मचारी सदाशिवा ॥ मदनांतक कैसा
॥ तूं, छेदिलें ब्रह्मशीर हे ॥ गजासुरा मर्दुनिया विजयी सर्वकाळहो,

॥ बाणरावण च्यंडिश भक्त हे तुज उत्तमा ॥ पार्वती दिधली कै
॥ स्थापिसी भद्रकाली ती, आत्मलिंग देउनिया, तोषवीभक्तत्र्च
॥ ला ॥ वामदेवा तारुनिया, स्वपददाविले कसे ॥ तवभक्ता ज
॥ इच्छा पुरविसी गिरजापती ॥ तवगुण वर्णाया, शेष हा थक
॥ असे॥ तथें मी मतीहीन, वर्णु कसे तवगुणहे ॥ चार सहा आठ
॥ राहे, शिणले बहुवर्णिता, तुझी अगम्य लीलाही, कर्ता तूंच
॥ असे ॥ कर्ताकरवितां तूंचि, निमित्य प्राणीमात्र हे, ऐसा दिना
॥ चा तूं नाथ, रक्षसी शरणांगत ॥ काय वर्णूमतीहीन, षड
॥ त्रासीतीबहु, कृपा करी आतां तूंचि, बाल हा शरणांगत ॥

॥ ध्यान ॥

॥ ध्यायेन मल्हारि देवं, कनक गिरिनिभं, म्हाळसा भुषितांकं
॥ श्वेत अश्वं खड्गहास्तं, विबुधबुध गणै: शेव्यमानं कृतार्थै
॥ युक्तांघ्रि दैत्यमुर्ध्नी, डमरूविलसितं, नैश्य चुरणांभी रामं
॥ नित्यं भक्तेसीतुष्टं, स्वगण परिवृत्तं, नित्य मोंकारगम्यं ॥

॥ अभंग ॥

॥ प्रेतप्रिय शिवा मार्तंडभैरवा, देवा आधिदेवा तूज नमो
॥ त्रिपुरमर्दना, काम तूं दहना लिला तुझ्यानाना, तूजनमो
॥ मल्लासी मारुनि, विजयी तूं रणीं सर्वांचा तूं धनी, तूजनमो
॥ मल्ल बंधुप्रती, दिली त्वा गती, ऐसा उमापती, तूजनमो
॥ मयराळा आतां शिणलो स्तवीतां तुचि सर्व सत्ता तूजनमो
॥ करुणा सागर, मार्तंड साचार, जगाचा अधार तूजनमो
॥ ऐसे लीन झाले, प्रभुसंतोषले, मग प्रगटले पार्थिवांत ॥



जी धनुष्यकृती लिंगें प्रगट झाली होती, ती अदृश्य होऊन
ऋषिनीं मृणमय मूर्त केली होती, त्या मूर्तीत मार्तंडभैरव प्र-
ट झाले. नंतर मार्तंडभैरवांनीं हास्यवदन करून सर्व ब्रह्मवृं-
ास अभय वचन दिले, पुढें सर्व ब्रह्मवृंदांनीं मार्तंडभैरवाची
जोपचार पुजा केली. नंतर पात्र घेऊन त्यांत श्रीफळ व रजनीं
र्ण ठेवलें, आणि हातांत दिवटी घेऊन व तळीका देवीची पू-
ा करून मुखानें येळकोटभे असा शब्द केला. व सर्वांनीं त्या
त्रास हात लाऊन तें पात्र वर उचलून पुन्हा खालीं ठेविलें,
ाणि मार्तंडभैरवाचे चरणावर तें सर्व ब्रम्हवृंद लिन झालें असतां
ार्तंडभैरव बोलते झाले.

॥ अभंग ॥

मग शिव बोले, तुम्हीं वृत केले तेणें मन धाले, माझे साच ॥
ऐसे जे वर्तती, स्वयें तयाप्रति, रक्षीन कल्पांती, सत्य जाणा ॥
विप्रते बोलती, केली तव स्तुती, भावें जे गाताती तया रक्षी ॥
अवतार चरित्र, तुझे हे विचित्र, वाचिती पवित्र, तया तारी ॥
दारापुत्र धन, गज अश्वजाण, इच्छिले देऊन, भक्ती लावी ॥
रणामधी जय, अंति तया ठाय, दावी देवा पाय, स्वयें तूंची॥ रोग
दूर करी, स्वयें तूंचि तारी, भावें जो उपच्यारी, माहात्माते ॥
माहत्म वाचिती, तुज जे भजती, तया हो वरती, कृपा करी ॥
अंति मोक्षाप्रती, नेई उमापती, कारितसे स्तुति, मंदमती ॥
यक्षराक्षसाची, ब्राम्हाती भुताची, पिडा पिशाच्याची नोव्हे कदा ॥
ग्रंथ रक्षिताती, लेखन करिती, रक्षी तया प्रती, मयराळा ॥

॥ सुख देई त्याला. नमितो चरणाला, तुची सर्व ठला ब्राह्मअ
॥ व्याघ्र आदि क्रुर, श्वापदे अपार, होताती किंकर नामापु
॥ पुरवावे देवा, सर्व मनोरथ, दिनाचा तूं नाथ, सत्य स्व

हा ब्रह्मवृंदाची स्तुतिपर भाषणें ऐकून, मार्तंडभैर परमानंद झाला. नंतर सुप्रसन्न वदनानें त्या ब्रह्मणा बेलू लागले, तुम्हीं जे जे मागितलेंत तेते मी सर्व तुम्हांस आहे, व जे मार्तंडभैरव, मल्हारि, मैराळ, मंगनाथ, म्हाळसा या नामें करून मला भजतील, त्यांचा सर्व प्रकारे मी सां करीन, असें वदून मार्तंडभैरव गंगाम्हाळसेसह, त्या नंदी मृणमय मूर्तींतच गौप्यरूपानें राहते झाले. नंतर ब्रह्मवृंद आपले अश्रमास जाते झाले. त्या स्थळास हाल्लीं प्रेमपूर मैलार असें म्हणतात. आतां इकडे नेवास मुकामीं तीमशेट नांवचा एक मनुष्य जातीचा लिंगायीत वाणी रहात होता, घरीं गजांत लक्ष्मी असून. तो फार संभावित व सात्वीक होता. परंतु त्याचे पोटीं कांहीं संतान नसल्यामुळें तो रात्रंदि चिंता करीत असे. आस्तु, पुढें आपल्यास संतान व्हावें त्यानें कोट्यावधी रुपये धर्म खर्च केला, व जागा जागीं दिरांत अनुष्टानें बसविलीं. आणि आपण स्वतां रात्रौ अ मनानें शिव शक्तिची पुजा करीत असे, आतां इकडे प्रेमपुरी ऋषींनीं नंदीवाहन मृणमय मूर्तींत गुप्त रूपानें असतां, शि शिवास विनंती केली कीं, महाराज आपले तर अवतार होऊन कर्तव्यकर्महीं झालें. मजविषयीं कांहींच काळजी क



नाहीं, तरी मी असें गुप्त रूपानें किती दिवस रहावें. ही म्हाळसेची भाषणें ऐकतांच मार्तंडभैरव बोलूं लागले, आपण नेवास मुकामीं तीमशेट वाण्याचे घरीं अवतार घ्यावा म्हणजे त्या स्थळीं येऊन तुझे पाणी ग्रहण करीन. ही भाषणें ऐकतांच शक्ति भैरवाची आज्ञा घेऊन निघाली. इकडे तीमशेटी नित्याशा: प्रमाणें रात्रौ अव्यग्र मनानें शिव शक्तिची पुजा करित असतां, त्या स्थळीं अदिमाता जी म्हाळसा ती प्रगट होऊन, तिमशेटास दिव्य चक्षु दिलें, व पुढें लिहिल्याप्रमाणें बोलती झाली. वत्सेहि, तीमशेटा जी तुला मनेच्छा असेल ती श्रुत कर, मी ती पुरविण्यास समर्थ आहे. हे देवीचे भाषण तिमशेटानें श्रवण करतांच, माते आपले कृपावलोकनें करून या दासास कांहीं न्यून नाहीं, परंतु पोटीं संतान नाहीं तरी आपण कृपाकरून मला ससुत करावें, याशिवाय मला दुसरी इच्छा नाहीं. ही तिमशेटीची भाषणें शक्तिनें ऐकतांच त्यांस सांगितलें कीं, बापा तुझे पोटीं पुत्र संतान नाहीं परंतु तुझी भक्ति पाहून शिवास दया आली, व त्यानें तुजविषयीं मला आज्ञा केली आहे. तस्मात तूं आतां नेत्र झांक, असे शक्तिचे शब्द ऐकतांच तिमशेटीनें नेत्र झाकिलें. नंतर अदिमातेनें बालस्वरूप धारण केलें, व रुदन करण्यास आरंभ केला. तें बालक जे वेळेस रडूं लागलें, ते वेळेस तिमशेटीनें नेत्र उघडले. आणि चोहिकडे पाहतो तंव देवी दिसत नाहीं, परंतु त्याचे समोर त्याचे दृष्टीस तें बालक पडलें, ते पाहून तो तात्काळ उठून गेला. व प्रेमभरानें त्या बालकास उचलून उरा-

सी धरिलें. नंतर परमेश्वरानें आपल्यावर कृपाकरून हें क
रत्न प्रसाद दिला आहे, ह्मणून मोठा अभारी झाला, व परमे
चा स्तव करूं लागला. पुढें त्या कन्येचे तीम शेटी मो
प्रीतीनें लालन पालन करूं लागला व त्या कन्येचें नांव त
म्हाळसा असें ठेविलें. नंतर कांहीं दिवसांनी ती कन्या मो
झाल्यावर मार्तंड भैरवाची भक्ति करूं लागली. हे तीमशेटी
पाहून त्यास फारच आश्चर्य वाटलें व त्याचे प्रेम त्या कन्ये
दिवसें दिवस विशेष वाढत चाललें. म्हाळसा तीम शेटीचे दृष्टि
क्षणभर न पडली तर त्यास चैन पडत नसे. पुढें दिवसांदि
म्हाळसा उपवर होत चालली तसतसी मार्तंड भैरवाची दृढ
क्ति करूं लागली. आतां ती कन्या उपवर झाली असतां ती
शेटीचे मनांत तिचे स्वयंवरा विषयीं वारंवार विचार होऊं ला
ला. पुढें एके दिवशीं तीमशेटीनें कन्यकेस जवळ बोलावि
आणि मोठ्या प्रीतीनें मांडीवर बसविलें, व मुख कुरवाळून हा
हांसत बोलूं लागला, बाई आतां तुझें लग्न कर्तव्य आहे या
तुला वर कोणचे प्रकारचा पाहिजे तो मला सांग. ही ती
शेटीची भाषणें म्हाळसेनें श्रवण करून तीमशेटीस मोठी मा
दाखविली व लाडे लाडे हांसत हांसत बोबडे बोलानें आपले
त्यासी बोलूं लागली. ताता, ज्याचे मी रात्रंदिवस चिंतन क
तोच माझा पती होय, यास्तव तूं माझे स्वयंवराची काळजी क
नकोस, ही कन्येची भाषणें ऐकून तीमशेटी त्या कन्येस पु
विचारताहेत. मार्तंड भैरव जातीचे कोण, व राहतात कोठें, आ



णि ते तुझे पती असे तुला कशावरून समजलें, तें सर्व वर्तमान मला निवेदन कर, वगैरे मजकूर विचारला असतां म्हाळसानें सांगण्यास आरंभ केला.

॥ साकी ॥

॥ मणि मल्ला ते मर्दन करण्या, धरिला शिवें अवतार ॥
॥ प्रभु मल्हारी मार्तंड भैरव, तोचि मम भ्रतार ॥

ताता, त्या प्रभूला जे वेळेस माझी करूणा येईल ते वेळेस आपोआप या स्थळी येऊन माझे पाणी ग्रहण करतील, ही कन्येची भाषणें तीमशेटीनें श्रवण करतांच त्यास मोठा आनंद झाला व पुढे तोही मार्तंड भैरवाची दृढ भक्ति रात्रंदिवस करूं लागला. पुढें मार्तंड भैरव कांहीं दिवसांनी एके दिवशीं रात्रीं तीमशेटीचे स्वप्नांत आले. आणि मी तुझा जामात आलों आहे, तस्मात आतां तुझी कन्या मला दे. परंतु तूं आपली कन्या घेऊन सहकुटुंब सहपरिवारे मुक्काम पाली येथें यावें म्हणजे त्या स्थळीं मी म्हाळसेचे पाणी ग्रहण करीन, असें तीमशेटीस सांगून मार्तंड भैरव तात्काळ गुप्त झाले. नंतर तीमशेटी जागा होऊन स्वप्नाचे मोठें आश्चर्य करूंलागला. पुढें उजाडल्यावर तीमशेटीनें कन्यकेस जवळ हाक मारून रात्रीं स्वप्नांत झालेला मजकूर तिला सर्व निवेदन केला. नंतर सर्व तयारी करून सह परिवारे मोठ्या समारंभानें कन्यकेचे लग्न करण्या करितां निघून पाल मुक्कामीं येऊन दाखल झाले. आतां इकडे मार्तंड भैरव तेहतीस कोटी देवते सहवर्तमान लग्ना करितां प्रेम पुराहून नि-

घाले आणि मोठ्या समारंभानें पाल मुक्कामी येऊन दाखल
ले. नंतर तीम शेटीस बोलाऊन आणिले, पुढें ब्रम्हदेवानें मा
भैरवाचे व म्हाळसेचे घटीत पाहिलें तो छत्तीस गुण बरोबर उ
रले, मग पौषी पौर्णिमेचे दिवशीं सिंह लग्नावर सुमुहूर्त पाहून
वालग्नावर मार्तंड भैरवाचे व म्हाळसेचे लग्न लागले. ब्रम्हदे
अंतरपाट धरीला व बृहस्पतीनें मंगलाष्टकें म्हटलीं; काळानें
वधान गाईला अशा प्रकारे त्या शिवशक्तीचे पाणी ग्रहण झा
वर पुढें सोळा दिवस मोठे आनंदाचा सोहळा झाला. तीमशे
नें करोडो रुपये धर्म खर्च केला व मार्तंड भैरवास गज, अ
दास दासी वगैरे पुष्कळ आंदण दिलें, पुढें मार्तंड भैरवानीं
वांस मोठी देणगी देऊन व मोठ्या सत्कारानें सर्वांस बोळवि
नंतर तीमशेटीस मार्तंड भैरवानीं जाण्यास आज्ञा मागितली
सतां तीमशेटीनें मला आपला व कन्येचा विरह सहन होण
नाहीं अशा विषयीं विनंती केली, मग मार्तंड भैरवानी तीम
टीस समजून सांगितले कीं, आमचे कर्तव्य कर्म थोडे राहीलें अ
यास्तव तुम्ही आम्हांस येथें राहण्याचा आग्रह करूं नये. ही
माताची भाषणें ऐकून तीमशेटी निराश होऊन स्तब्ध झाला.
तर मार्तंड भैरवानीं तीमशेटीचे अनेक प्रकारें शांतवन कर
त्यास सहकुटुंब सहपरीवारे नेवाशाकडे रवाना करून दिलें.
म्हाळसा सहीत मार्तंड भैरव पालीहून निघाले आणि प्रेमपु
येऊन तीं विप्रानी नंदी वाहन मूर्त मृणमय केलीली त्या मूर्ती
मार्तंड भैरव गंगा म्हाळसा सहीत गुप्त रुपानें रहाते झाले



आतां इकडे पूर्वीं गंगा पार्वती सहीत कैलास पर्वती वास करीत
असतां गंगा पार्वतीचा नित्य कलह होत असे तेवेळेस पार्वतीची
सखी जयानामे होती, तीनें त्या दोघींची समजूत करीत असावी.
असे कांहीं दिवस चालूं असतां एके दिवशीं गंगा पार्वती सर्व
द्रूयीतभाव टाकून मोठे आनंदात येऊन गोडीची भाषणे करता-
हेत, अशा समयीं जयानामें जी परिचारीका तीही जवळच होती
पुढें त्या गंगा पार्वतीनीं विचार करून त्या जया स्त्रीस भाष
दिले ते असे कीं, सखे जे वेळेस आम्हीं दोघी आपआपसांत
कलह करतो ते वेळेस तूं आम्हां दोघींची समजूत करतेस, या-
स्तव आम्ही दोघींनीं शंकराचे तिसरे भार्यत्व तुला दिलें आहे.
ही गंगापार्वतीची भाषणें जयानें ऐकतांच, स्त्रियांचें भाषणाचा
नेम नाहीं, येवढ्याकरितां या गोष्टीस कोणी तरी साक्षीदार पा-
हिजे, हें जयाचे वाक्य पार्वतीनें ऐकतांच, बाहेर माझा पुत्र
गणपती आहे त्यास घेऊन ये, ही पार्वतीची भाषणें जयानें ऐ-
कतांच बाहेर जाऊन गणपतीस बोलावून आणलें. गजाननानें
येतांक्षणीं उभय मातेस वंदन करून, काय आज्ञा आहे म्हणू-
न विचारलें असतां, गंगा पार्वती गणपतीस सांगूं लागल्या कीं,
ज्याप्रमाणें शंकराच्या आह्मीं उभय स्त्रिया आहोंत, त्याप्रमाणेंच
आह्मी दोघींनीं या जयेस शंकराचें तिसरे भार्यत्व दिलें आहे. या
गोष्टीस आह्मी तुला साक्षदार ठेविलें आहें. ही गंगा पार्वतीची
भाषणें गणपतीनें श्रवण करतांच, तुमचा स्त्रियांचा कांहीं नेम
नाहीं, यास्तव तुह्मी मला पत्र लिहून द्या, ह्मणजे ठिक पडेल, हे

गणपती वाक्य ऐकतांच पार्वती ह्मणूं लागली कीं, तूं पत्रले
कर आह्मी चिन्हें करून देतों. असें गंगा पार्वतीनें गणपती
सुचविलें असतां, गणपतीनें पत्र लेखन केलें. व गंगा पार्वती
हातची त्या पत्रावर चिन्हें करून घेतली. नंतर त्या जयेस वरा
घेऊन गणपती शंकराकडेस आले. व तें पत्र शंकरास दाख
न ही त्रितीय भार्या गंगा पार्वतीनें आपल्यास करून दिली आ
यास्तव इचा अंगिकार केला पाहिजे. ही गजाननाची भाष
ऐकून व तें पत्र पाहून, शंकरास मोठा आनंद प्राप्त झाला. पु
शंकर हांसत हांसत जयेस बोलूं लागले कीं, तुला माझी प
त्नी होण्याची इच्छा आहे काय? ही शीव भाषणें ऐकून जय
बोलूं लागली, माहराज मी आपले पायाची दासी आहे. आपण
कृपा कराल ती खरी. ही जयेची विनयपूर्वक व लिनतेची भा
षणें ऐकून शंकर मोठें सुप्रसन्न झाले: आणि त्या जयेस बोलू
लागले, पुढें मार्तंडभैरव अवतार धारण करूं ते वेळेस तुझा
आंगीकार करूं. ही शंकराची भाषणें ऐकून जयानें मला ज
न्मांतर करण्या विषयीं आज्ञा असावी असी विनंती केली अस
तां शंकरानी जयेस सांगितले कीं, पूर्वीं किरात अर्जूनाचे युद्धांत
अर्जूनाचा बाण माझे मस्तकीं लागला आहे तो हा बाण मी तुला
देतों व तूं हा बाण घेऊन मृत्यूभुवनीं बाणासूराचे उदरी या बा
णासह उत्पन्न होसील. पुढें मी मणिमल्ल मर्दन करण्या कारितां
मार्तंडभैरव रूप धारण करीन ते वेळेस मी स्वत: तुझे पाणी
ग्रहण करीन. ही शंकराची भाषणें ऐकतांच, जयेनें शंकरांची



आज्ञा घेऊन शंकरपाई देहांत केला, व मृत्यूलोकीं येती झाली.
आतां इकडे बाणासुराची स्त्री गरोदर होत्सातां नवमास पूर्ण झा-
ले नंतर ती राजस्त्री प्रसूत झाली असतां कन्या रत्न प्रसवली,
जे वेळेस जयाचे जनन झालें ते वेळेस शंकरांनीं दिलेला बाण
तिचे समवेतच होता, हा अघटीत चमत्कार पाहून त्या सर्वांस
मोठें आश्चर्य वाटलें. पुढें बाणासुरानें त्या कन्येचें नांव बाणा
असें ठेविलें. नंतर ती कन्या दिवस मास मोठी होत चालली
असतां, बाणासुरानें तिचे स्वयंवराचा विचार करून देवब्राम्हण,
सुर, नर कीन्नर, यक्ष, गण, गंधर्व, मानव अदिकरून प्राणीमा-
त्रांस स्वयंवरास पाचारण केले व मोठा विस्तीर्ण मंडप तयार
करविला, आणि सर्व प्रकारची तयारी केली. पुढें ते सर्व राजे
सुरवृंदादि आपआपले कटकासहित मोठें समारंभानें येऊन श्रो-
णितापुरा नजिक गांवाबाहेर तळ देऊन राहते झाले. नंतर बाणा-
सुरानें बाणेस पाचारण करून जवळ बोलाविलें आणि सांगितलें,
बाई आतां तुझे मनास येईल त्याला माळ घाल, त्याच्याशी तुझें
लग्न करून देतों. ही भाषणें त्या कन्यकेनें ऐकतांच बाणासु-
रास विनंती केली कीं, ताता, एक उत्तम प्रकारचे प्रती कैलासा-
समान स्थळनिर्माण करावे, म्हणजे मी त्या स्थळीं जाऊन बसेन
मग एकेक राजानें माझे दर्शनास यावें, त्यांस मी विडा देईन
तो घेउन त्यानें परत जात जावे, त्यांतील जो पुरूष माझे मनांत
भरेल त्यास मी माळ घालीन त्यानें मात्र शहरांत राहवें. ही क-
न्यकेची भाषणें ऐकतांच बाणासुरानें एक उत्तम प्रकारचे मंदीर

तयार केलें. पुढें ती बाणा त्या मंदिरांत जाऊन बसल्या एकेक वीरानें कन्येकेचे दर्शनास जावे, असें बाणासुरानें सर्वां सुचविलें असतां, एकेक वीर तिच्या महालांत जाऊन, विडा घे ऊन परत येई; असे कोट्यावधी वीर परत गेलें परंतु त्या कन्ये मनास त्यांतील एकही पुरुष आला नाहीं. पुढें असा क्रम चा असतां, एके दिवशीं मूरनामा दैत्य त्या कन्यकेच्या मंदिरांत गेल तो फारच सुस्वरूप होता, तें बाणेनें पाहून त्याचे कंठांत माळ घातली. हें कृत्य बाणासुराचा प्रधान कुंभक नामें होता त्यानें पाहिलें असतां, मूरदैत्याजवळ येऊन विनंती करूं लागला कीं, महाराज आपणही गळ्यांतील माळ तूर्त काढून ठेवावी, कारण ही माळ कंठांत घालून तुम्ही बाहेर गेला तर सर्व राजे यु द्धास प्रवर्त होतील, तर असे न होता आपले कार्य निर्विघ्नपणे शेवटास जावें, म्हणून मी सांगत आहे, इतक्यावर मर्जी आपली. ही प्रधानाची भाषणें ऐकून त्या मूर दैत्यानें ती बाणेनें कंठांत घातलेली माळ स्वहस्तानें काढून कुंभक प्रधानाचे स्वाधीन के ली, व मोठ्या आनंदानें बाणेकडे पाहत पाहत त्या महालांतून निघून गेला. पुढें नित्यशः नृपती कन्यकेचे दर्शनास येतच होते, त्यांतच एके दिवशीं श्रीकृष्ण शोणीता पुरास आले, व त्या क न्यकेचे भेटीस्तव तिचे महालांत गेले, कृष्ण आपले महालांत आले हे बाणेनें पाहून त्यांचा मोठा सन्मान केला, व त्यांस आ पले स्वहस्तानें त्रयोदशगुणी विडा दिला. नंतर कृष्णानीं आप ली वाजविण्याची मुरली त्या कन्यकेच्या नजीक ठेऊन आपण

तेथून निघून गेले. पुढें कृष्ण निघून गेल्यावर घटके अर्ध घटकेनें ती मुरली त्या कन्यकेचे दृष्टीस पडली असतां त्या बाणेनें त्या मुरलीस विचारले कीं, तूं कोणाची कोण आहेस व तुझे नांव काय ? आणि या स्थळीं येण्याचे कारण वगैरे सर्व मजकूर सांग. ही बाणेची भाषणें ऐकतांच मुरली उत्तर देती झाली.

॥ ओवी ॥

॥ मी सत्य स्वर्गींची रंभा जाण ॥ तिलोत्तमा हे नामाभिधान ॥
॥ मजला गर्व झाला म्हणून; देवेंद्राने शापिले ॥ तू मृत्यूभुवनी
॥ जाऊन; नृत्य करसी सत्य प्रमाण; मग मी इंद्र स्तुती करून;
॥ उशाप त्याते मागीतला ॥

नंतर द्वापार युगांत तु मुरली रूपे कृष्णाची प्रिय सखी होशील, व स्त्रियांची मनें हरण करण्या विषयीं तूं कृष्णास पूर्ण साह्य करशील, पुढें बाणासूराचे कन्येचा व तुझा संग होईल, ते वेळेस ती तुला शाप देईल, मग मार्तंड भैरव अवतार होईल, ते वेळेस तूं शाप मुक्त होऊन स्वर्गास येशील. हा देवेंद्रानें उशाप दिल्यावर मग मी मृत्युलोकीं आले. आणि कृष्णास साह्य करून हल्लीं तुझे गृहीं आले आहे. आतां तू मूर दैत्यास वरणार, परंतु त्याचा मृत्यू श्रीकृष्ण हस्तें आहे, हीं त्या मुरलीची भाषणें त्या कन्येनें श्रवण करतांच तिला पूर्व आठव झाला. नंतर फार क्रोधाविष्ट होत्साती तूं मार्तंड भैरवाचे आंगणांत स्त्री होऊन नर्तन करशील असा त्या बाणेनें त्या मुरलीस शाप देतांच ती

मुरली स्त्रीरूप धारण करून बाणेची आज्ञा घेऊन तेथून निघाली आणि मैलारास येऊन मार्तंड भैरवाचे आंगणांत नरतन करून रहाती झाली, या प्रमाणें मुरळीची उत्पत्ती झाली.

पुढें बाणासूर आपले कन्येचे महालांत येऊन आतां तुझा मूर दैत्याशीं विवाह करून देतो, असें बाणासुराचें वाक्य बाणेनें ऐकतांच बाणा बाणासुराशीं बोलूं लागली.

॥ ओंवी ॥

॥ मूरदैत्याचा देहांत ॥ कृष्ण हास्ते आहे खचीत ॥
॥ यास्तव विवाह करणें उचित ॥ हे मजला न दिसे बरें ॥

तस्मात उदयीक मूरदैत्यानें कृष्णाशीं समर करावें, त्या समरांत जर मूरदैत्यानें कृष्णास हातविर्य केलें तर मग मात्र मी मूरदैत्याशीं वरीन. ही कन्येची भाषणें ऐकून बाणासूर बाहेर आला. आणि मूरदैत्यास सांगितलें कीं, तूं जर कृष्णाला संग्रामांत जिंकशील आणि जय प्राप्ती करून घेशील तर मात्र ही कन्या तुला अर्पण करूं. नंतर त्या मूरानें उत्तम आहे असें उत्तर देतांच, बाणासुरानें मूरदैत्याशीं संग्राम करण्या करितां यावे म्हणून कृष्णास पत्र पाठविलें. तें बाणासुरा कडून पत्र आलेले कृष्णांनीं पाहातांच आपले परिवारासह निघून श्रोणीता पुरास आले. व आपला दूत मूरदैत्याकडे पाठविला.

मग तो दूत मूरदैत्याकडे जाऊन तुला ही बाणा योग्य नाहीं व तूं कृष्णाशीं समर करण्याची इच्छा धरूं नकोस वगैरे मजकूर

बोलत असतां मूरदैत्यास मोठा क्रोध आला, व तो आपले सेनेसह कृष्णावर धाऊन गेला. पुढें ती दोन्ही दळें एकत्र होऊन संग्राम चालू असतां, शंकर कृष्णाला साह्य करण्या करितां कैलासाहून धाऊन आले. देवदानवांचें तुंबळ युद्ध झालें, त्या युद्धांत मूरदैत्याचे शीर कृष्णांनीं सुदर्शन चक्रेंकडून उडविलें असतां, मूरसेनेंत आहाकार होऊन गेला. कृष्ण सैनेंत जय वांद्यें वाजूं लागलीं. व मोठा आनंद होऊन राहिला आहे. हे वर्तमान वाणासुरानें आपले कन्येस कळविलें असतां, ती कन्या बाणासुरास बोलती झाली कीं, मी आतां कृष्णास वरणार नाहीं, माझा भर्ता मार्तंडभैरव आहे. यास्तव मी त्याच्याशीं विवाह करणार. आतां तुला येथून पुढें पाचवी कन्या उषा या नामें होईल, तिला कृष्णाचा पौत्र वरील. आणि आपला पूर्वजन्मीचा वृत्तांत बाणासुरास विदित केला, व तपास जाण्याविषयीं आज्ञा मागितली. नंतर बाणासुराची आज्ञा घेऊन ती कन्या निघून नर्मदा व कावेरि या उभय नदींचे सगमीं आली, नंतर लजरूप धारण करून ती बाणा तपकरूं लागली. आतां इकडे मणिमल्ल मर्दनास्तव शिवांनीं मार्तंडभैवर अवतार धारण केला, व प्रेमपुरीं त्या मृणमय मूर्तींत, गंगा म्हाळसेसहित गुप्त रूपानें राहिले आहेत, हें मागें सांगितलेंच आहे. आतां इकडे नर्मदा कावेरी संगमाहून कांहीं ब्राम्हण मार्तंडभैरवाचे यात्रेस निघालें. व प्रेमपुरास येऊन दाखल झाले, नंतर मार्तंडभैरवाचे षोडशोपचारें पूजन केलें व सर्व विधीपूर्वक यात्रा करून मार्तंडभैरवास बाणेचा सर्व वृत्तांत निवेदन केला. व ती आज शंभर

दर्षे नर्मदातीरीं आपल्या करितां तप करित आहे वगैरे मज
सांगून तें ब्राम्हण मार्तंडाची आज्ञा घेऊन निघून गेले. पुढें
ब्राम्हण निघून गेल्यावर मार्तंडभैरवांनीं गंगाम्हाळसेला त्या ठि
णीं ठेऊन आपण फार त्वरेनें निघून कावेरीसंगमीं आले. म
डभैरव आपल्या करितां आले हे व्राणेनें पाहून जलरूप सोडि
व स्त्रीरूपी होतसाती मार्तंड भैरवाचे दृष्टीस पडली नंतर मार्तं
भैरव तिला बोलताहेत, तुला ज्या प्रमाणें वचन दिलें होते त
प्रमाणें मी प्राप्त झालों आहे. आतां तूं नळराजाचे न
रासमीप येऊन रहा कारण तो नळराजा माझा भक्त आहे त्य
स्थळीं तुझे माझे पाणी ग्रहण होईल, असें बोलून मार्तंड भैर
निघून गेले. पुढें ती व्राणा त्या स्थळाहून निघून नळराज्याचे प
चक्रोशींत आली, नंतर एका चंदन वृक्षाखालीं ती बाणा वा
रुपानें रहाती झाली. ज्या चंदन वृक्षाखालीं बाणा राहिली त्य
वृक्षा नजीकच कांहीं धनगर मेंढवाडे घालून वस्ती करून राहि
होते, आतां इकडे मार्तंड भैरव चंद्ररूपी अश्वावर बसून व बरोब
सारमेय म्हणजे कुत्रीं घेऊन ज्या चंदन.वृक्षाखालीं बाणा वायुरू
पानें राहीली होती त्या चंदन वृक्षाखालीं मार्तंड भैरव येऊन उ
तरले, हे एका वृद्ध धनगरानें पाहिले, व हा कोणी तरी ईश्व
रूपीच आहे असा भाव कल्पून त्या धनगरानें मार्तंड भैरवाल
एक मेंढी अर्पण केली. इतक्यांत त्या स्थळीं कांहीं व्याघ्र येऊन
त्या गरीब धनगराच्या मेंढ्या धरून घेऊन चालले असतां मार्तंड
भैरवाचे श्वानांनीं त्या व्याघ्रावर चाल केली आणि त्या व्याघ्रापासू



न सर्वत्र मेंढ्या सोडविल्या; नंतर त्या व्याघ्रास आडऊन आणिलें व मार्तंड भैरवाचे पुढें उभे केले असतां त्या व्याघ्रास सुबुद्धि उत्पन्न झाली व ते व्याघ्र मनुष्य वाणीनें बोलते झाले कीं, महाराज आम्ही आपले दास आहोत, आपल्यास आनन्यभावानें शरण आलों आहोंत आतां ज्या प्रमाणें प्रभू आज्ञा करतील त्या प्रमाणें आम्ही वर्तणूक करूं. ही स्तुतीपर व्याघ्रांची भाषणें ऐकून मार्तंड भैरव मोठे सुप्रसन्न झाले. नंतर व्याघ्रास बोलूं लागले कीं, हा क्रूर देह तुम्हांस प्राप्त झाल्यामुळें तुम्हांपासून पुष्कळ पातकें घडली, त्यात व श्वानाची भिती दूर होण्यास तुम्हांस मी एक इलाज सांगतो, असें म्हणून मार्तंड भैरवानीं हरिद्रा चूर्ण त्या व्याघ्रास चर्चन करण्या करितां दिले असतां त्या व्याघ्रानीं सर्व आंगास भंडार चर्चन केल्याबरोबर ते व्याघ्र तात्काळ मनुष्यरूपी झाले व परमेश्वराची स्तुति करूं लागले. नंतर मार्तंड भैरवानीं सर्वांस सांगितले कीं, तुम्ही सर्वत्रानीं माझे पुढें कुत्र्यासारखें भुंकावे व कांबळे पांघरावे आणि लोहाचे सारवळदंड कंठीं धारण करावेत, व्याघ्र चर्माच्या भंडाऱ्या करून गळ्यांत घालाव्या, हारिद्रा चूर्ण आंगास लावावें, आणि माझे सन्निद्ध वास करावा जन तुम्हांस वाघे म्हणतील. या प्रमाणें वाघ्यांची उत्पत्ती झाली. हे कृत्य त्या धनगरानें पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटले. पुढें त्या धनगरानें आपले सर्व मेंढ्यास जवळ हाक मारून सांगितले कीं, तुमचे प्राण मार्तंड भैरवानीं वांचविले यास्तव त्यांचा उपकार तुम्ही कांहीं तरी फेडला पाहिजे, ही त्या धनगराची भाषणें ऐकून त्या संपूर्ण

आज्या मनुष्यवाणीनें बोलूं लागल्या कीं, देवाला आमचा हावि
ग विधीपूर्वक अर्पण करावा, ब्राम्हणांनी पशूयज्ञ करून दे
पशूचा हविर्भाग अर्पण करावा, व शुद्रांनी पशूला स्नान घा
पुजा करावी, व देवाचे पुढे ठेऊन देवा हा तुझा भाग आहे
से म्हणून देवाला तिन प्रदक्षणा कराव्या. नंतर पशूचा
करावा म्हणजे पातक नाहीं, हे आज्यापाळा तूं या प्रमाणें
म्हणजे आम्ही देवाचे उपकारा पासून मुक्त होऊं. या प्रमाणें
सर्व मेंढ्यानी आज्यापाळास सांगितले असतां त्या वृद्ध धनगरा
विधीपूर्वक एक आज्या मार्तंड भैरवास अर्पण केली, नंतर
स्थलाहून मार्तंड भैरव निघून जाते झाले. पुढें त्याच रात्रीं
धनगरास बाणा प्रत्यक्ष दर्शन देती झाली. आणि म्हणाली
माझा धर्म पीता आहेस, व मी तुझी धर्म कन्या आहे तस्मात मा
तंड भैरवाचा व माझा विवाह करून दे, ही बाणेची भाषणें ऐक
तांच तो धनगर बोलूं लागला कीं, मी दरिद्री आहे ही गोष्ट मा
झे हातून कशी होईल तत्रापि माझे भाऊ बंद नळदुर्ग शहरीं पु
ष्कळ आहेत त्या सर्वांस विचारून मग काय तें मी तुला सांगेन
ही त्या धनगराची भाषणे बाणेनें ऐकून ठीक आहे असे म्हणून
ती बाणा गुप्त झाली. पुढे उजाडल्यावर तो धनगर नळदुर्गास
गेला व रात्रीं झालेला वृत्तांत आपले सर्व जातीस विदित केला.
नंतर हे कर्म राजा शिवाय होणार नाहीं यास्तव नळ राजाला
जाऊन ही हकिकत सांगू असा त्या सर्व धनगरानीं विचार करून
राजवाड्यांत आले. नंतर नळराजास भेटून बाणेचे सर्व वर्तमा



न त्या धनगरांनीं राजास विदीत केलें, ही धनगराची भाषणें
नळराजानें ऐकतांच बहूत उत्तम आहे असें म्हणून सर्व तयारी
करविली व मोठया समारंभानें निघून त्या धनगरा समवेत त्या
चंदन वृक्षाजवळ प्राप्त झाले. पुढे त्या वृद्ध धनगरानें मा-
तोश्रीं आतां प्रत्यक्ष दर्शन द्यावें अशी प्रार्थना करतांच बाणा स्त्री
रूप धारण करून सर्वांस प्रत्यक्ष दर्शन देती झाली. नंतर नळ
राजानें बाणेचा मोठा आदर करून व सिबिकेंत बसऊन मोठया
समारंभानें त्या बाणेस नळराजा आपले नगरांत घेऊन गेला.
व कन्येपेक्षांही जास्त तिचें लालन पालन करूं लागला.
पुढें तेच दिवशीं रात्रीं नळराजाचे स्वप्नांत मार्तंडभैरव आले, व
बोलूं लागले कीं, तुझी मानलेली कन्या बाणा ती आम्हांस विवा-
ह करून दे, ही भाषणें नळानें ऐकतांच उत्तम आहे असें झणून
मार्तंडभैरवाचा व बाणेचा विवाह नळराजानें स्वप्नांत करून दि-
ला. नंतर तो तात्काळ जागा झाला. पुढें प्रात:काळ झाल्या-
वर नळराजानें दमयंतीस हाकमारून रात्रीं स्वप्नांत झालेला मज-
कूर सर्व निवेदन केला असतां, मलाही असेंच स्वप्न पडले झणून
दमयंतीनें विनयपूर्वक नळास सांगितले, पुढें नळराजानें प्रधाना-
स बोलाऊन सभा भरविली असतां, त्या स्थळीं बाणायुक्त मार्तंड
भैरवाचें लिंग, नळराजाचे दृष्टिगोचर झाले. मग फार त्वरेनें
ब्राम्हणांस बोलावून त्या मार्तंड लिंगाशीं बाणेचा विधियु-
क्त विवाह करून दिला असतां, मार्तंडभैरव त्या लिंगांतून प्रगट
झालें व सर्वांस दर्शन दिलें. नंतर नळराजानें नमस्कार क

रून आज मी धन्य आहे, व आपले दर्शन करून मी आज
तकृत्य झालों, अशी बहुत प्रकारें नळराजानें मार्तंडाची स्तु
केली. पुढें बाणेसहित हे माझे लिंग या स्थळीं असूं दे, व
नित्यशः या लिंगाची पुजा करित जा, आह्मी आतां बाणेला
ऊन निरा व भीमरथी या दोहींचे मध्यभागीं जयाद्रीक्षेत्र आहे
क्षेत्रीं जातो, हे मार्तंड भैरवानीं नळ राजास सांगितले व बा
ला घेऊन ते तेथून फार त्वरेनें निघाले. मार्तंड भैरव बाणेसहि
नळ दुर्गाहून निघाले ते जयाद्री आले व पर्वताचे मध्यभा
येऊन मार्तंड भैरवानीं त्या स्थळीं बाणेची स्थापना केली,
गणनामा कोणी एक सरदार होता त्यास बाणेचा
प्रकारें बंदोबस्त ठेवण्या विषयीं आज्ञा केली, व जे को
यात्रेस येतील त्यांनीं प्रथम बाणेची पूजा करावी. नंतर मा
पूजा करावी, बाणेची पूजा न करितां आगोदर माझी पू
केली तर ती पूजा अमान्य आहे. असें ह्मणून मार्तंड भै
जाण्यास निघाले असतां, बाणेनें विचारलें कीं, माझी या
ळीं स्थापना करून, आपण येकटेच कोठे जातां, मला आप
वियोग सहन होणार नाहीं. अशी विनंती करतांच मार्तंड भैर
नीं त्या बाणेचे पृष्टभागीं येक मोठी दगडाची शिळा हो
त्या शिळेवर तो बाण टोंचिला असतां त्या शिळेस मो
छिद्र पडलें. नंतर मार्तंड भैरव बाणेस सांगते झाले कीं
मी नित्य रात्रीं या मार्गानें तुझे मंदिरांत येत जाईन, व रविवा
या मार्गानें तुला भंडार पोचवीत जाईन, ही मार्तंड भैरवा

भाषणें ऐकून बाणा बोलली कीं, फार उत्तम आहे ह्र्चेल तिक-डे जावें, ही बाणेची आज्ञा होतांच, मार्तंडभैरव पर्वतावर चढून गेले. व पूर्वी मल्लासुराचे असन केले होतें ते असन पंचलिं-गाचें समीप टाकून मार्तंडभैरव त्या असनावर बसले. व गण-पतीस हाकमारून सांगितलें कीं, तूं प्रेमपुरास जा, तेथें आमच्या उभय भार्या गंगा म्हाळसा ह्या आहेत, त्यांजला येथें घेऊन ये, हें मार्तंडभैरवचें भाषण गणपतीनें श्रवण करतांच, गणपती प्रभूची आज्ञा घेऊन प्रेमपुरीं जाण्याकरितां निघाले, व प्रेमपुरीं येऊन दाखल झाले. पुढें गणपतीनें त्या मृणमय मूर्तींचें आंगभूत गंगा म्हाळसाचे षोडशोपचारें पूजन केलें, नंतर हात जोडून विनंती करित आहे. हें उभय मातोश्री, आपल्यास मार्तंडभैरवांनीं जयाद्रीक्षेत्रीं घेऊन यावें ह्मणून मला आज्ञा केली आहे. तरी आतां मजसमवेत तुम्ही जयाद्रीक्षेत्रीं चलावे, ही ग-णपतीची भाषणें ऐकतांच फार उत्तम आहे, आतांच चलावें असें म्हणून गंगा म्हाळसा दोघीजणी गणपती समवेत निघून जयाद्रीक्षेत्रीं पंचलिंगाचें समीप ज्या स्थळीं मार्तंडभैरव होते त्या स्थळीं प्राप्त झाल्या. नंतर गंगा म्हाळसेला मार्तंडभैरवांनीं अवलोकन करतांच मोठे प्रेमानें दोघी स्त्रियांस दोही बाजूस बसविलें व आपण मध्यभागीं बसले. नंतर उभय स्त्रीयांसाहित मार्तंड भैरवानीं वस्त्रें परिधान केलीं. व नाना प्रकारचे अलंकार धार-ण केले. आणि षोडशोपचार व नाना प्रकारचे विलास चालू आहेत अशा समयीं ह्माळसेनें मार्तंड भैरवास विनयपूर्वक विचार-

ले कीं महाराज स्वर्ग सुखापेक्षांही भूलोकचे सुख मला विशे वाटतें. ते वेळेस मार्तंड भैरव बोलले कीं तुझी बोलला हें सत्य आहे, देव लोकापेक्षां भूलोकच श्रेष्ठ आहे तथापि या लोकीं अथवा परलोकीं तीन गोष्टी मुख्य आहेत, प्रथम व्रत धरावे तें सोडूनये, दुसरें एक विधाभक्ती करावी, व चित्तास संतोष असावा ही तिसरी गोष्ट, ह्या तिन्ही गोष्टी ज्यास अनकूळ आहेत तो परमेश्वराहूनही श्रेष्ठ आहे. हें मार्तंड वाक्य, गंगा म्हाळसेनें श्रवण करून, महाराज खरी गोष्ट आहे, असें म्हणून स्तब्ध झाली. इतक्यांत गणपती येऊन मार्तंडभैरवांस व गंगा म्हाळसेस साष्टांग प्रणिपात करून खिन्न वदन केलें, व एकीकडे जाऊन बसले. हें मार्तंडभैरवांनीं पाहून, बाळा, असें मौन्य धरून कां बसलास? तुला कोणती चिंता प्राप्त झाली आहे तें मला निवेदन कर, हें मार्तंडाचें वाक्य गणपतीनें ऐकतांच बोलण्यास अरंभ केला. ताता गंगा म्हाळसा उभय स्त्रिया आपले समीप बसल्या आहेत, परंतु जी पटाख्य तृतीय भार्या ती कोठे दिसत नाहीं, ह्मणून मला फार चिंता प्राप्त झाली आहे. ही गणपतीची भाषणें मार्तंडभैरवांनीं ऐकून घेतली, व ही गोष्ट गंगा म्हाळसेला विचार, असें मार्तंडभैरवांनीं गणपतीस सांगितलें असतां गणपतीनें गंगा म्हाळसेस विचारलें कीं, या प्रश्नाचें उत्तर द्या, स्तब्ध कां बसलांत अशी विनंती केली असतां, म्हाळसा बोलती झाली कीं, ती माझी जया नामाची सखी होय तिला मी उगीच विनोदानें तूं मार्तंडभैरवाची भार्या हो, असें म्हटलें म्हणून ती भैरवाची भार्या

ईल कीं काय? ही म्हाळासाची भाषणें ऐकतांच गणपती बोलूं
ागलें कीं, हे मातोश्री तुम्हीं तिला पत्र लिहून दिलें, व मला
ाक्षीस ठेविलें असतां आतां तुम्हीं नाकबूल होतां परंतु पंचायीत
ाडली तर प्रथमत: पत्र प्रमाण, व पत्र नसेल तर साक्ष प्रमाण,
ात्र व साक्ष दोन्ही नसतील तर दिव्य करावें असा ईश्वरी नेम
आहे, आणि या गोष्टीस तर साक्षीदार व पत्र अशीं दोन प्रमाणें
आहेत, या वरून ती जया मार्तंड भैरवाची भार्या सत्यसत्य झाली
यांत तिळमात्र संशय नाहीं, ही गणपतीची भाषणें गंगा म्हाळ-
सेनें श्रवण करून त्या दोघीजणीं गज्याननास प्रतीउत्तर देत्या
झाल्या कीं पत्रानें किंवा साक्षीनें स्त्री होत नाहीं स्त्री होण्यास वे-
दी पाहिजे, व वेद श्रुती मंत्र शास्त्र आणि पुराणोक्त मंत्र पाहिजे-
त, व ते मंत्र ब्राम्हणानीं मुखानें उच्चारण केले पाहिजेत, तेव्हां
भार्यत्व प्राप्त होतें; पत्रानें भार्यत्व प्राप्त होत नाहीं. हे गंगा म्हा-
ळसेचे वाक्य गणपतीनें श्रवण करून फार उत्तम आहे असें
म्हणून तें पत्र हातांत घेतलें आणि हा आपण पूर्वीं दिलेला
लेख परत घेऊन फाडून टाकावा असे म्हणून ते
पत्र म्हाळसाचे पुढें ठेविलें असतां म्हाळसानें रागावून
ते घेऊन फाडून टाकिलें, हे गणपतीनें अवलोकन करतांच गजप-
तीस फार वाईट वाटलें, नंतर ते तेथून निघून गेले, म्हाळसेनें
पत्र फाडून टाकिलें व गणपती रागानें उठून गेला हे मार्तंड
भैरवानीं पाहून मोठे क्रोधाविष्ट होच्छाते आसनावरून उठले आणि
बाहेर येऊन तात्काळ गुप्त झाले. गणपती निघून गेला व

ले कीं महाराज स्वर्ग सुखापेक्षांही भूलोकचें सुख मला विशे
वाटतें. ते वेळेस मार्तंड भैरव बोलले कीं तुली बोलला है
सय आहे, देव लोकापेक्षां भूलोकच श्रेष्ठ आहे तथापि या लो
कीं अथवा परलोकीं तीन गोष्टी मुख्य आहेत, प्रथम व्रत धा
वे तें सोडूंनये, दुसरें एक विधाभक्ती करावी, व चित्तास संतो
असावा ही तिसरी गोष्ट, ह्या तिन्ही गोष्टी ज्यास अनकूळ आहेत तो
परमेश्वराहूनही श्रेष्ठ आहे. हें मार्तंड वाक्य, गंगा म्हाळसेनें श्रवण
करून, महाराज खरी गोष्ट आहे, असें म्हणून स्तब्ध झाली. इतक्यांत
गणपती येऊन मार्तंडभैरवांस व गंगा म्हाळसेस साष्टांग प्रणिपात
करून खिन्न वदन केलें, व एकीकडे जाऊन बसलें. हें मार्तंडभै
रवांनीं पाहून, बाळा, असें मौन्य धरून कां बसलास? तुला
कोणती चिंता प्राप्त झाली आहे तें मला निवेदन कर, हें मा
र्तंडाचें वाक्य गणपतीनें ऐकतांच बोलण्यास अरंभ केला. ताता
गंगा म्हाळसा उभय स्त्रिया आपले समीप बसल्या आहेत, परंतु
जी पटाख्य तृतीय भार्या ती कोठें दिसत नाहीं, ह्मणून मला
फार चिंता प्राप्त झाली आहे. ही गणपतीची भाषणें मार्तंडभै
रवांनीं ऐकून घेतली, व ही गोष्ट गंगा म्हाळसेला विचार, असें
मार्तंडभैरवांनीं गणपतीस सांगितलें असतां गणपतीनें गंगा म्हा
ळसेस विचारलें कीं, या प्रश्नाचें उत्तर द्या, स्तब्ध कां बसलांत
अशी विनंती केली असतां, म्हाळसा बोलती झाली कीं, ती मा
झी जया नामाची सखी होय तिला मी उगीच विनोदानें तूं
मार्तंडभैरवाची भार्या हो, असें म्हटलें म्हणून ती भैरवाची भार्या



होईल कीं काय? ही म्हाळसाची भाषणें ऐकतांच गणपती बोलूं
लागलें कीं, हे मातोश्री तुम्हीं तिला पत्र लिहून दिलें, व मला
साक्षीस ठेविलें असतां आतां तुम्हीं नाकबूल होतां परंतु पंचायीत
पडली तर प्रथमतः पत्र प्रमाण, व पत्र नसेल तर साक्ष प्रमाण,
पत्र व साक्ष दोन्ही नसतील तर दिव्य करावें असा ईश्वरी नेम
आहे, आणि या गोष्टीस तर साक्षीदार व पत्र अशीं दोन प्रमाणें
आहेत, या वरून ती जया मार्तंड भैरवाची भार्या सत्यसत्य झाली
यांत तिळमात्र संशय नाहीं, ही गणपतीची भाषणें गंगा म्हाळ-
सेनें श्रवण करून त्या दोघीजणीं गज्याननास प्रतीउत्तर देत्या
झाल्या कीं पत्रानें किंवा साक्षीनें स्त्री होत नाहीं स्त्री होण्यास वे-
दी पाहिजे, व वेद श्रुती मंत्र शास्त्र आणि पुराणोक्त मंत्र पाहिजे-
त, व ते मंत्र ब्राम्हणानीं मुखानें उच्चारण केले पाहिजेत, तेव्हां
भार्यत्व प्राप्त होतें; पत्रानें भार्यत्व प्राप्त होत नाहीं. हे गंगा म्हा-
ळसेचे वाक्य गणपतीनें श्रवण करून फार उत्तम आहे असें
म्हणून तें पत्र हातांत घेतलें आणि हा आपण पूर्वीं दिलेला
लेख परत घेऊन फाडून टाकावा असें म्हणून तें
पत्र म्हाळसाचे पुढें ठेविलें असतां म्हाळसानें रागावून
तें घेऊन फाडून टाकिलें, हे गणपतीनें अवलोकन करतांच गणप-
तीस फार वाईट वाटलें, नंतर ते तेथून निघून गेले. म्हाळसेनें
पत्र फाडून टाकिलें व गणपती रागानें उठून गेला हे मार्तंड
भैरवानीं पाहून मोठे क्रोधाविष्ट होच्छाते आसनावरून उठले आणि
बाहेर येऊन तात्काळ गुप्त झाले. गणपती निघून गेला व

याचे मागे भैरव निघून गेले म्हणून गंगा म्हाळसा उठून फार
रेनें बाहेर आल्या, नंतर गणपतीचा व भैरवाचा शोध पुष्कळ
ला. परंतु कोठे ठिकाण लागला नाहीं; शेवटीं गंगा म्हाळ
निराश होऊन विचार करत्या झाल्या तो असा कीं, गंगा म्हाळ
मत सांगती झाली; आतां तूं अन्नपूर्णा या नामाचे दुसरे स्वरू
धारण करून पंचलिंगाचे उत्तरेस आंश रूपानें रहावे, ही म्हाळसे
नें गंगेची भाषणें ऐकतांच अन्नपूर्णा रूप धारण केले. पुढें
त्या गंगा म्हाळसेनें पंचलिंगाचे उत्तरेस त्या अन्नपूर्णा देवीची
स्थापना केली व तिचे संरक्षणार्थ रेणूका या नांवाची स्त्री उत्प
न्न करून ठेविली, नंतर त्या दोघी जणी पर्वता वरून खालीं उ
तरून उत्तर दिशेस आल्या नंतर गंगा जलरूप झाली, व म्हाळ
सेस सांगितले कीं, तूं माझे जलांत तप करीत बैस, ही गंगेची
भाषणे ऐकून म्हाळसा त्या गंगा जलांत तप करीत बसली. आ
तां इकडे गणपती निघून आपले स्थानीं जाऊन तपश्चर्या करीत
बसले. व मार्तंड भैरव त्याच पर्वती ईशान्य कोनावर विवरांत
गुप्त रूपानें रहाते झाले. पुढे ऐके दिवशीं नारदस्वामी, मार्तंड
भैरवाचे दर्शनास जयाद्री पर्वतावर आले असतां मार्तंड भैरव
आपले आसनावर नाहींत हे नारदानें पाहून मोठे वि
चारांत पडला. इतक्यांत त्या स्थळीं नंदी येऊन नारदास भे
टला. आणि तुम्हांस मी भैरव दर्शन करवितों तुम्ही माझे बरा
बर या, असें बोलला असतां नारदानीं फार उत्तम आहे असें
म्हणून नंदी बरोबर जाण्यास निघाले. नंतर नंदी नारदास घे



ऊन भैरव आसनाचे ईशान्य कोनास आले, त्या स्थळीं एक
शिळा होती ती शिळा नंदीनें शृंगानें काढून नारदासह नंदीनें
त्या विवरांत प्रवेश केला. पुढें थोडें दूर गेल्यावर मोठा प्रकाश
पडला, व नारदास वाणेसहित त्या स्थळीं मार्तंडभैरवाचें दर्शन
झालें. नंतर एकमेकांचे आगत स्वागत झाल्यावर मार्तंडभैरवांनीं
पूर्वीचा मजकूर; गंगा पार्वतीनें विचार करून जयेला पत्र करून
दिलें, व गणपतीस साक्षी ठेविलें. आणि त्या दोघींनींच मला
तिसरी भार्या करून दिली, व आतां नाकबूल होऊन कलह
करितात, वगैरे सर्व हकीगत मार्तंडांनीं सांगितली, व आ-
तां तुला ज्याप्रमाणें कळेल त्याप्रमाणें कर, तुझें वचन आम्हांस
मान्य आहे, हें मार्तंडभैरवाचें वाक्य नारदांनीं श्रवण करतांच
बोलूं लागले कीं, महाराज आपण स्वस्थ असावें, या गोष्टीचा वि-
चार मी करतो असें ह्मणून मार्तंडभैरवाची आज्ञा घेऊन, नारद
स्वामी तेथून निघाले आणि गणपतीचे आश्रमीं येऊन दाखल
झालें, नंतर एकमेकांचे अतिथ्य झाल्यावर नारद व गणपती दो-
घे निघून पर्वतावर येते झाले. नंतर गंगा म्हाळसेचा शोध
त्यांनीं त्या पर्वतीं पुष्कळ केला, परंतु त्यांजला त्यांचा शोध लाग-
ला नाहीं, पुढें नारद व गणपती त्या पर्वताचे उत्तर बाजूस उ-
तरून खालीं आलें असतां, त्या उभयतांस एक स्त्री भेटली. नं-
तर त्या स्त्रियेस नारदांनीं तूं कोण कोणाची आहेस, आणिं
तुझें नांव व राहणार कोठली वगैरे सर्व मजकूर सांग, असें वि-
चारलें असतां ती स्त्री प्रत्युत्तर देती झाली कीं, मी म्हाळसेची

सखी आहे, येथून जवळच गंगातीर्थ आहे त्या जलांत म्हाळसा सूर्योदया पासून सूर्यअस्त होई तोंपर्यंत तप करित असते, व निशी समयाचे ठायीं म्हाळसा माझे घरीं येऊन राहत असते, या प्रमाणें त्या स्त्रियेनें नारदास सांगून ती स्त्री निघून गेली. नंतर नारद व गणपती निघून त्या गंगातीर्था जवळ येते झाले. पुढें नारदांनीं तर्क बांधून गणपतीस म्हणाले कीं, गंगाही जलरूप होऊन राहिली आहे, व त्या जलांत म्हाळसा जलरूप होऊनच तप करीत आहे; यास्तव या तिर्थी प्रथमतः मी स्नान करतों, तूं मला विधी सांग, हे नारदवाक्य ऐकून गणपती बोलूं लागले कीं, तूं ब्रम्हपुत्र आहेस व विधी तुला ठाऊकच आहे, मी सांगावयास नको. हें वक्रतुंडाचें भाषण नारदांनीं श्रवण करून बोलते झाले कीं, या जयाद्रीक्षेत्रीं मार्तंडभैरवाचा राजयोग आहे. ह्मणून या तिर्थी क्षोर नाहीं व उपवासही नाहीं फक्त तिर्थ्यादि किर्तन करून सचैल स्नान करावे, नंतर नारदानें गणपतीनें त्या तिर्थी सचैल स्नानें करून मार्तंडभैरवास अर्घ्य दिलें. व दोघांनीं गंगा म्हाळसेला अर्घ्यप्रदान दिलें आणि त्रि‑वेणीलाही उभयता अर्घ्यप्रदान करते झाले. नंतर नारद व गणपती गंगा म्हाळसेची स्तुति करूंलागलें कीं, मातोश्री आतां आपण जलरूपाचा त्याग करून बाहेर या, व बाणा स्त्री भैरवाला करून दिली आहे तिचा अंगिकार करा, नाहींतर मी नांवाचा नारद त्याहें, तुमची त्रैलोक्यांत फजीती केल्याशिवाय राहणार नाहीं. ही नारदाची भाषणें ऐकतांच गंगा म्हाळसा स्त्रीरूप ध‑

त्न, दोघीजणी बाहेर आल्या व नारदाप्रति बोलूं लागल्या कीं, आम्ही तूं सांगशील तें ऐकतो व जिकडे नेशील तिकडे येऊं, परंतु आम्ही या तिर्थी तप केलें आहे, [illegible] काय ठेवावें हें [illegible] या तिर्थाचें नांव [illegible] ऐकून नारद बोलले [illegible] कीं, [illegible] प्रयागी [illegible] स्नान, दान, तप, होम, करावा, [illegible] हा तीर्थमहिमा नारजें पुण्य आहे तेंच पुण्य येथें प्राप्त होईल. [illegible] व त्या जननी तिर्थाचे दक्षण दांनीं गंगा म्हाळसेला सांगितला. पुढें ते चतुरवर्गांचा मेबाजूस जननी देवीची स्थापना केली. नंतर नारद गणपतीप्रति बोलते ज्या त्या पर्वतावर चढून गेला. तेव्हां मला ठाऊक नाहींत झाले कीं, मार्तंडभैरव कोठें आहेत, असें गणपतीनें नारदास सांगितलें तुम्ही गंगा म्हाळसेला विचारा असें गणपतीनें नारदास सांगितलें. पग नारदांनीं गंगा म्हाळसेस विचारलें असतां, त्यांनीं सांगितलें कीं, प्रथमतः गणपती उठून गेला, त्याचे मागून भैरव कोधानें उठून गेले, त्यांचा आम्हांस शोध नाहीं. ही गंगा म्हाळसेची भाषणें ऐकून नारद पुन्हा बोलते झाले कीं, आतां म्हाळसेनें जे अन्नपूर्णाभिधानें करुन स्थापन निर्मिलें आहे त्या स्थळीं म्हाळसानें आपले सखीस ठेवावें, हे मार्तंडभैरवाचे धनधान्याचें स्थळ होय, दुसरें गंगा म्हाळसानें आपले स्थानीं बसावें, मी मार्तंडभैरवास घेऊन येतों, ही नारदाची भाषणें ऐकतांच, म्हाळसेनें आपले सखीस त्या अन्नपूर्णा देवीजवळ ठेविलें, व गंगा म्हाळसा आपआपल्या जागीं बसत्या झाल्या. पुढें नारदानीं त्या

सखीस वस्तुमात्राचे संरक्षण करण्याविषयीं सांगितले, व ही स्त्रि‑ यांची राहण्याची जागा आहे, यास्तव येथें पुरुषानें राहूंनये, क‑ दाचीत राहिलातर तो पुरुषमूर्ख होईल. असें म्हाळसा सखीस सां‑ गून अन्नपूर्णांचे आंगभूत तिची स्थापना केली व गंगा म्हाळसेची स्थापना करून गणपतीचे जागीं गणपतीस बसविलें, नंतर नार‑ द मार्तंड भैरवाचे शोधास निघाले. पुढें नारद त्या पूर्वीं गेले त्या विवरांत गेले व मार्तंड भैरवास भेटून त्यास घेऊन पर्वतावर आले. नंतर नारदानीं मार्तंड भैरवास गंगा म्हाळसेच्या मध्यभागीं आसनावर बसविलें व त्या त्रिवर्गांचे सख्य करून दिलें. पुढें मार्तंड भैरवानीं गणपतीस बोलाऊन सांगितले कीं, तू माझे समी‑ प असावें व जो पुरुष तुझे साक्षीनें माझे मंत्राचा जप करील त्याला वांछित फळ प्राप्त होईल. हे मार्तंड वाक्य गणपतीनें श्र‑ वण करून आज्ञा प्रमाण असें म्हणून पंचलिंगाचे दक्षण बाजूस गणपती रहाते झाले; त्यास हल्ली साक्ष विनायक असें म्हणतात. नंतर मार्तंड भैरवास नारद पुन्हा विचारते झाले कीं, महाराज आपण पत्रविनाश पाहून ज्या स्थळीं गुप्त झाला त्या स्थळाचे नांव काय, असे नारद वचन ऐकून भैरव बोलते झाले, या जयाद्री क्षेत्री मी गुप्त झालों त्या स्थळाचें नांव गुप्त मल्लेश्वर. आतां ही दूर्गा सापत्न भावामुळें पूर्वीं गंगेसी कलह करीत होती, म्हणून गंगेला गौतमऋषीचे स्वाधीन केलें, त्यामुळेंच तिला गौतमी असें ह्मणतात, या प्रकारे गंगेची हावाल या म्हाळसेनें केली, व आ‑ तां या बाणेसी कलह करीत आहे. असा या दुर्गेनें माझ्याशीं

संदूस बांधिला, असो तिची मर्जी, आतां गंगेचा प्राणवल्लभ तो गुप्त मल्लेश्वर व म्हाळसेचा प्राणवल्लभ मी मार्तंडभैरव आणि गंगेचा प्राणपती भुवनेश्वर व रेणुकेचा प्राणनाथ पंचालिंगेश्वर अशीं नानारूपें करून, नानाभार्या वल्लभ मी आहे. कलह किमर्थ करितां, ही मार्तंडभैरवाची भाषणें ऐकतांच विष्णुभर्या जी लक्ष्मी ती तेथें आली, आणि मार्तंडभैरवाचा पल्लव धरून माझा प्राणवल्लभ या स्थळीं कोठें आहे, असें विचारतांच मार्तंड भैरव बोलते झाले कीं हे रमे तूं माझा पल्लव धरून कलह करण्यास उत्सुक झाली आहेस, अस्तु कांहीं चिंतो नाहीं, आतां तूं माझा पल्लव धरिलास म्हणून माझे मंत्राला तुझा पल्लव लाऊन माझे मंत्राचा लक्ष जप करावा, व जपाचे दशांश हवन करावें, घृतोक बिल्व पत्रें करून होम करावा, वांच्छित फळ प्राप्त होईल, व माझे तिर्था समीप तूं आपले तीर्थ कर, प्रथमतः मल्हारितीर्थांत स्नान करून लक्ष्मीतिर्थीं स्नान करावे, व पुन्हा मल्हारितीर्थांत स्नान करावे म्हणजे एक दिव्यस्नान होतें. याप्रमाणें तीन दिवस विधी करून, तुझा पल्लव लाऊन माझे मंत्राचा जो जप करील त्याला मी स्वप्नांत प्रत्यक्ष दर्शन देईन, ही मार्तंडभैरवाचीं भाषणें ऐकून लक्ष्मी मल्हारतीर्था जवळ आली, व मल्हार तिर्थाचें दक्षणेस आपले तीर्थ करून त्या तीर्थीं आपण अंशतः वास करती झाली. नंतर मार्तंडभैरवांनीं म्हाळसेस सांगितलें कीं आतां सर्व मनांतील विकल्प टाकून, तूं माझे अंकावर बैस, तें वेळेस म्हाळसा विनयपूर्वक बोलूं लागली कीं, महाराज या स्थळीं

गणेलाही घेऊन यावें, नंतर मार्तंडभैरव म्हणतात कीं, तूं ज्याणें
पत्र फाडून टाकिलेस, त्या पत्राची तूं पूजा कर, म्हणजे तिचे
क्रोध शांत होऊन ती तुझ्याशीं सख्य करील. अशा प्रकारें मा
र्तंडभैरवांनीं सर्वांची समजूत करून कलह मिटविला. नंतर त्या
स्थळीं मोठा महोच्छाह होऊन राहिला आहे, अशा समयीं इं
द्रदेवानें आपले लोकांकडून पुष्पवृष्टी करविली, नंतर सर्व सुरवृंद
आपआपले स्थानीं गेले. पुढें मार्तंडभैरवास नारदस्वामींनीं वि
चारिलें कीं, या स्थळास क्षेत्र असी संवज्ञा असून क्षौर व श्राद्ध
कां नाहीं, हे कृपाकरून दासाला विदित करावें मग मार्तंडभैरव
नारदास सांगूं लागले कीं, या स्थळीं माझा राजयोग आहे, म्ह
णून अशुभ कृत्य करूं नये, व गयेंत पिंडदान केलें असतां
भुक्तिमुक्ति प्राप्त होती, या स्थळीं जो प्राणी जाण्यास अशक्य अ
सेल, त्यानें भैरवाचे हातांत नरकपाल आहे,त्या नरकपालांत हिर
ण्य स्थापन करून भैरवाची पूजा करावी म्हणजे गया श्राद्धाचें
फळ प्राप्त होतें, दुसरें गयेत पिंडदान केलें असतां पुत्र पीतृ ऋ
णा पासून मुक्त होतो. व फल्गु तिर्थीं तर्पण केलें असतां पुत्र कृत
कृत्य होतो आणि स्वामी दर्शनानें मनुष्य जन्मास आल्याचें सार्थ
क होतें.

या तिहींचे फळ एक भैरव दर्शनें कडून प्राप्त होतें, या प्रमा
णें मार्तंड भैरवानीं नारदास सांगितले. व आणखी कांहीं विचार
ण्याची ईच्छा आहे काय? असें विचारलें असतां नारदानें विनंती
केली कीं, भैरव ध्यान हृदयस्त कसें करावे तें कृपा करून या

दासाला निवेदन केलें पाहिजे, मग मार्तंड भैरवानी नारदास सांगितले कीं, तुला भैरव ध्यान हृदयस्त करावयाची ईच्छा असेल तर तूं ब्रम्हदेवाकडेस जाऊन त्यांजला ही गोष्ट विचार म्हणजे ते तुझे मनांतील संशय दूर करतील, या प्रकारे नारदास सांगून मार्तंड भैरव तात्काळ अंतरध्यान पावले. मग लागलीच नारद निघून ब्रम्हदेवा जवळ आले, आणि विनंती करून विचारले कीं, महाराज भैरवध्यान हृदयस्त कसे लक्षावे तें कृपा करून या दासाला विदित करा, ब्रम्हदेव नारदाप्रति बोलते झाले कीं, तुला ज्योती स्वरूपाचे दर्शन करवितों, तूं माझे बरोबर चाल, मार्ग मोठा कठीण आहे माझी अंगुली धर, व पाया खालीं पाहून चल, इकडे तिकडे पाहू नकोस, इकडे तिकडे पाहशील तर खालीं पाताळीं जाऊन पडशील, चौऱ्याशी लक्ष पायऱ्या या मार्गाला आहेत, हा चौऱ्याशींचा मार्ग आहे राजमार्ग नव्हे, अंधार रूप मार्ग आहे असे ब्रम्हदेवानीं नारदास सांगून ब्रम्हदेव नारदासह निघाले, व वर सांगितलेल्या मार्गानें कडेपठारीं येऊन दाखल झाले. पुढें प्रज्यापतीनें नारदास मार्तंड भैरवाने मुख्य स्वरूप धनुष्याकृती ज्योतीर्मय जे ब्रम्हतेज तें दाखविले असतां नारद तन्मय होऊन त्या ब्रम्हानंदांत निमग्न झा[illegible]ला हे ब्रम्हदेवानीं पाहून नारदास बोलते झाले कीं, नारदा सावध हो, मी तुला हृदयस्त मार्तंड स्वरूप कसे लक्षावें ते सांगतो. हे विधीवाक्य नारदानें श्रवण करतांच तो देहावर आला व [illegible] काग्रचीत्त करून बसला असतां ब्रम्हदेव बोलूं लागले कीं, आतां

हृदयामध्यें हृदयकमल आहे तें आधोमुख आहे तें उर्ध्व मुख
नांत आणावे, व ते नार्भाच्या वरती असून प्रदीप्त आहे व त्याल
एक छिद्र आहे, आणि त्यांत अग्नि आहे तो अग्नि इंद्रीयें तपावि
तो आहे, त्या अग्निची ज्वाला ती शिखा होय ती पितवर्ण आहे
त्या शिखेचे आग्रभागीं परमात्मा वास करीत आहे. तेच निर्वि
कल्प ब्रम्ह होय, त्या ब्रम्हाची नित्य मानसोपच्यार पूजा करावी
म्हणजे ब्रम्ह साक्षात्कार लागलीच प्राप्त होतो, या प्रमाणें ब्रम्हदे
वानीं नारदास सांगून लागलीच प्रभूची आज्ञा घेऊन आपले
स्थानाप्रत निघून गेले. नंतर नारदानीं मार्तंड भैरवास साष्टांग
नमस्कार केला, व त्यांची आज्ञा घेऊन तो तेथून निघून गेला.
नंतर मार्तंड भैरव म्हाळसे सहीत त्या स्थळीं लिंगाकृती गुप्त रू
पानें रहाते झाले.

---

## भाग २ रा.

आंतां ईकडे वैशंपायन मुनि धर्म राजाला कृष्ण चरित्र कथ
न करताहेत पूर्वीं कृष्ण ब्राल अवस्थेत गोकुळामध्यें होते, ते वे
ळेस एके दिवशीं श्रीकृष्ण यशोदेस मला पय पिण्यास दे, म्ह
णून मागत असतां यशोदा बोलूं लागली कीं, बापा आज आप
ले कुळस्वामी मार्तंड भैरव त्यांचा चंपा शष्ठीचा कुळधर्म आहे
पय अनुच्छिष्ट आहे, देवास नैवेद्य अर्पण केल्या शिवाय मी

तुला देणार नाहीं. हे यशोदेचें भाषण ऐकतांच मार्तंड भैरव कोठें आहे तो मला दाखीव म्हणून कृष्णानें यशोदे जवळ आळ घेतली असतां, त्यास घेऊन ती देव घरांत आली व मार्तंड प्रतिमेकडे तर्जनी करून हे पहा कुलस्वामी त्यांजला नमस्कार कर, हे येशोदा वाक्य कृष्णानें श्रवण करतांच मार्तंड भैरवास नमस्कार केला. नंतर यशोदेनें कृष्णास देवाजवळ बसऊन आपण नैवेद्य आणावयास घरांत निघून गेली व नैवेद्य घेऊन परत देव घरांत आली आणि नैवेद्य देवापुढें ठेविला. तो इतक्यांत श्रीकृष्ण पुन्हा पय भक्षावयास मागूं लागले असतां यशोदा बोलूं लागली कीं, असे भलभलतेच हट्ट करूं नकोस देव तात्काळ चमत्कार दाखवील. ही मातोश्रीची भाषणें ऐकून कृष्णास मोठा राग आला नंतर मार्तंड भैरवाची प्रतिमा त्यानें हातांत घेऊन आंगणांत झोंकून दिली. जे वेळेस कृष्णानें प्रतिमा आंगणांत टाकली तेच वेळेस कृष्ण श्वानरूप होऊन पलायन करते झाले हे कृत्य त्या गोकुळवासी जनांनीं पाहून त्या सर्वांस मोठे आश्चर्य वाटलें. नंतर कृष्णास बलरामानीं धरून आणिलें व खांबासी बांधून टाकिलें. आतां कृष्ण कुत्र्या प्रमाणें लोकांचे आंगावर भुंकताहेत अशा समयीं त्या स्थळीं नारद प्राप्त झाले, नंतर नंद यशोदेनें झालेला मजकूर सर्व विदीत केला असतां नारद बोलते झाले कीं, मार्तंड भैरवास शरण गेल्या शिवाय श्री कृष्णास उतार पडणार नाहीं हे नारदभाषण ऐकतांच मार्तंड भैरव कोठें आहेत म्हणून नारद स्वामीस विचारलें; नंतर नारद बोलते झाले कीं, ते

सर्व व्यापक आहेत, परंतु अज्ञानामुळें आपल्याला ते दिसत ना-
हींत खरे तत्रापि हल्ली नळदुर्गास कपील महामुनी रहातात, ते
मार्तंड भक्त आहेत. व मार्तंड भैरवाची रहाण्याची जागाही त्यां-
जला ठाऊक आहे. यास्तव त्यांजला येथें घेऊन यावें, म्हणजे
ठीक पडेल. ही नारदाचीं भाषणें ऐकतांच नंदानें विनंती केली
कीं, महाराज आपण स्वतः रथांत बसून नळदुर्गास जावें व क-
पील महामुनीस घेऊन यावे, असें म्हणून सारथ्या करवीं रथ सि-
द्ध करविला हे नारदानीं पाहिलें. नंतर नळदुर्गास जाण्या करि-
तां नारद रथांत बसले असतां सारथ्याने रथ फार त्वरेनें चाल-
विला; तो माध्यान्हीचे सुमारास जयाद्री क्षेत्रा नजीक येऊन दा-
खल झाला. माध्यान्ह समय झाला हे नारदानें पाहून सारथ्यास आ-
ज्ञा केली कीं, रथ क्षणभर उभा कर, मला स्नान संध्या कर्तव्य
आहे. हे सारथ्यानें ऐकतांच आज्ञा प्रमाण असें म्हणून रथाचे
घोडे आवरिले, नंतर नारद रथाखालीं उतरले, व स्नान संध्यादी
कर्म करून मानसिक पूजा केली, व ध्यानस्त बसले असतां नार-
दास सुस्वर सनयाचे आवाज व दुंदुभीचे मधुर शद्ब ऐकूं येऊं
लागले तेणे करून त्यांची समाधी विसर्जन झाली पुढें नारदा-
नीं त्या सारथ्यास सांगितलें कीं, जिकडून दुंदुभी रव ऐकूं येत
आहे तिकडे रथ घेऊन चल, असें सारथ्यास सांगून नारदमुनी
रथांत बसले. नंतर सारथ्यानें रथ त्या दुंदुभीचे आवाजाचे
सुमारानें चालविला असतां त्या सह्याद्री पर्वता खालीं तो रथ ये-
ऊन दाखल झाला. नंतर नारद रथाखालीं उतरून त्या पर्व-

तावर चढत असतां नारदास अर्ध मार्गांत एक व्याघ्रांबरधारी म्हणजे वाघ्याच्या वेषानें एक पुरुष भेटला, नंतर नारदांनीं त्यास विचारलें कीं, तूं कोण आहेस व तुझें नांव काय? आणि तूं कोणाचा भक्त आहेस, हे साकल्य वर्तमान तूं मला सांग. हे नारदभाषण ऐकतांच तो व्याघ्रांबरधारी बोलूं लागला कीं, मी मार्तंड भैरवाचा भक्त आहे, व नारदा मी तुला ओळखतो, परंतु तूं कृष्णाचे मायेंत पडला आहेस म्हणून तूं मला ओळखीत नाहींस, असो तूं श्रेष्ठ आहेस, आतां हे रजनीचूर्ण घेऊन जा, आणि कृष्णाचे आंगास चर्चन कर, म्हणजे तो पूर्ववत होईल, मग तूं कृष्णास घेऊन माझे यात्रेस ये, असें सांगून भंडारींतील चूर्ण काढिलें, व नारदाचे स्वाधीन केलें. पुढें मार्तंडभैरवानीं जें हारिद्राचूर्ण दिलें, तें नारदानें मोठ्या आदरानें घेतलें, व प्रभूची आज्ञा घेऊन निघाले, ते फार त्वरेनें रथासह गोकुळास येऊन दाखल झाले. नंतर नारदांनीं तें हारिद्राचूर्ण, कृष्ण आंगीं चर्चन केलें असतां, कृष्ण पूर्व स्थितीवर आले, व हे लोक माझेजवळ कां बसले आणि मला रज्जूनें किमर्थ बांधिलें अशा विषयीं विचारीत असतां यशोदेनें सर्व झालेला मजकूर श्रीकृष्णास निवेदन केला ही आईच्या तोंडची भाषणें कृष्णानें श्रवण करतांच बहुत उत्तम आहे, मार्तंडाचे यात्रेस आतांच चलावें, नंतर श्री कृष्ण नंद यशोदा सहपरीवारें घेऊन मार्तंड भैरवाचे यात्रेस निघाले, व श्रीकृष्णांनीं नारदासही बरोबर घेतलें होते, पुढें श्रीकृष्ण

या भवसागरांतून तरून जाण्याविषयीं कांहीं तरी इलाज सांगावा, ही पार्वतीचीं भाषणें ऐकतांच भैरव बोलूं लागले कीं, मार्तंड भैरवाची भक्ती केली असतां मी त्यास भवबंधा पासून मुक्त करीन, ही मार्तंड भैरवाची भाषणें ऐकून पार्वतीस मोठा आनंद प्राप्त झाला. नंतर धर्मराज पुढें झाले व मार्तंड भैरवास नमस्कार करून विनंती केली कीं, महाराज कृपा करून या दासास मल्हारी चरित्र सविस्तर निवेदन करावें, ते वेळेस मार्तंड भैरव बोलते झाले कीं, तुझा देह शुद्ध झाल्या शिवाय मार्तंड चरित्र ऐकण्यास समर्थ नाहींस, नंतर धर्मराज पुन्हा विनंती करूं लागले कीं, महाराज देह शुद्ध कशानें होईल ते कृपा करून सांगावें, ते वेळेस भैरव बोलते झाले कीं यज्ञ केल्याशिवाय देह शुद्धता होणार नाहीं. या कारितां धर्मराजा तूं यज्ञ कर हे मार्तंड वाक्य धर्मानें ऐकून विनंती केलीं कीं, महाराज यज्ञ कोणते स्थळीं करावा, या विषयीं आज्ञा झाली पाहिजे. नंतर भैरव बोलले कीं तुला या पर्वतावर यज्ञ करावयास जागा नाहीं यास्तव तूं या पर्वताचे खालीं ईशान्य कोनास जाऊन त्या स्थळीं यज्ञ कर, ही मार्तंडाची आज्ञा होतांच त्या स्थळीं जळ नाहीं अशी धर्मराजानें विनंती केली असतां मार्तंड धर्मराजास पुन्हा बोलूं लागले कीं, ब्रम्हाद्रि पर्वतावर ब्रम्हदेव तप करीत बसले आहेत, त्यांची प्रार्थना करून त्यांचे कमंडलूतील, जल तुम्ही यज्ञार्थ मागून घ्यावें असें सांगून मार्तंड भैरव शंकराचे आंगांतून निघून गेले. नंतर धर्म

राजानें शंकरास विनंती केली कीं, यज्ञार्थ आपलेही येणें झालें पाहिजे, ते वेळेस शंकरांनीं धर्मास सांगितलें कीं, फार उत्तम आहे आम्ही त्या स्थळीं लिंगरूपें प्रगट होऊन तुमचा हेतु पूर्ण करूं. मार्तंड भैरवाचा पुराणिक गौतमनामें ऋषी आहे त्यास तुम्ही यज्ञार्थ घेऊन जावें. नंतर सर्व सुरवृंद व ब्रम्हा विष्णु महेश मार्तंड भैरवाची आज्ञा घेऊन निघून गेल्यावर ते कृष्ण प्रमुख पांडव, गौतममुनीस बरोबर घेऊन त्या पर्वताचे ईशान्य कोनास खालीं उतरून गेले आणि यज्ञार्थ कृष्णादि सर्व ब्रम्हवृंदास पाचारण केलें असतां तो सर्व ब्रम्हसमुदाय त्या स्थळीं येऊन दाखल झाला. पुढें श्रीकृष्णास धर्मराजानें सर्व मजकूर विदित केल्यावर श्रीकृष्णानें भीमसेनास जल मागण्या करितां ब्रम्हदेवाकडेस पाठविलें. नंतर भीमसेन निघून ज्या स्थळीं ब्रम्हदेव बसले होते त्या स्थळीं प्राप्त झाला, आणि पहातो तंव ब्रम्हदेव ध्यानस्त बसले आहेत म्हणून भीमानें ब्रम्हदेवाची बहूत स्तुती केली व कानाशी मुख लाऊन मोठ मोठ्यानें आरोळ्या मारिल्या, परंतु ब्रम्हदेव देहावर येत नाहींत हे भिमसेनानें पाहून तो फार निराश झाला. पुढें ब्रम्हदेवाचे आग्रभागीं ब्रम्हदेवाचा कमंडलु होता, तो भीमानें हातांत घेऊन ब्रम्हदेवाचे मस्तकावर ओतला असतां त्या कमंडलु जलाचा मोठा प्रवाह चालला व तो प्रवाह धर्मराज व कृष्ण ज्या स्थळीं होते त्या स्थळीं येऊन दाखल झाला. तो ओघ कृष्णानें पाहून धर्म राजास बोलते झाले

कीं, भिमसेनानें मोठा अनर्थ केला आहे, तो असा कीं, ब्रम्हदे-
वाचा कंमडलु ब्रम्हदेवाचे मस्तकावर ओतिला त्याचा हा ओघ
आहे. आतां ते सावध झाल्यावर भीमसेनास शाप देऊन भस्म
करतील. ही कृष्णमुखींचीं भाषणें ऐकतांच धर्मराजानें कृष्णा-
स विनंती केली कीं, महाराज आजपर्यंत जसें या पांडवांचें संरक्षण
केलें, त्याच प्रमाणें हल्लीं भीमसेनाचा सांभाळ केला पाहिजे, ही
धर्मस्तुति ऐकतांच, श्रीकृष्ण निघून ब्रह्मदेवाजवळ आले. आ-
णि भिमाचे हातांतील कमंडलु घेऊन खालीं ठेविला. व भीमसे-
नास बरोबर घेऊन पर्वताखालीं निघून आले, नंतर श्रीकृष्णानें
भीमाजवळ मातीचे गोळे दिले व सांगितलें कीं, तूं या ओघाचे
कडेनें मातीची लिंगें स्थापीत स्थापीत यज्ञशाळे पर्यंत ये, तोंप-
र्यंत मी अग्रभागीं जातों, असें भीमसेनास कृष्णांनीं सांगून श्री-
कृष्ण पुढें निघून गेले. नंतर भीमसेनही मागाहून शिवलिंगाची
स्थापना करीत करीत, यज्ञशाळेंत जाऊन दाखल झाला. आतां
इकडे ब्रह्मदेवांनीं समाधी विसर्जन केली असतां, तो कमंडलु
रिता झालेला त्यांचे दृष्टीस पडला. मग मोठ्या रोषानें आस-
नावरून उठले आणि पर्वताचे खालीं येऊन दाखल झाले. आ-
णि चोहूकडे अवलोकन करूं लागले तो त्यांचे दृष्टीस तीं भी-
मसेनानें केलेली शिवलिंगें दृष्टीस पडलीं. पुढें त्या शिवलिंगाचीं
पूजा करीत करीत ब्रह्मदेव पांडव आश्रमाजवळ प्राप्त
झाले. ब्रम्हदेव आले हें धर्म, कृष्णांनीं पाहून ब्रम्हदेवास सामोरे

गेले, व मोटया अदरानें ब्रह्मदेवास यज्ञशाळेंत घेऊन आले. नंतर धर्मानें ब्रह्मदेवाचे षोडशोपचारे पूजन केलें असतां, ब्रम्हदेव बोलते झाले कीं, माझा कमंडलु पालथा कोणी केला, ते मला सत्वर सांगावें. हे ब्रह्मभाषण ऐकतांच कृष्णांनीं भीमसेनास हातीं धरून ब्रह्मदेवाचें पायांवर घातलें. आणि विनंती केली कीं या वृकोदरानें अज्ञानामुळें हे कृत्य केलें आहे. तरी समर्थांनीं अपराधाची क्षमा केली पाहिजे, ही कृष्णाचीं भाषणें ऐकून ब्रम्हदेवाचा क्रोध शांत झाला. मग ब्रह्मदेव पुन्हा बोलूं लागले कीं, आतां या भीमसेनानें आपल्या करानें कमंडलु उचलून माझे मस्तकावर ओतिला, त्यामुळेंच या ओघाचें नांव मी करजानदी असें ठेविलें आहें. जो प्राणी या नदीचे स्नान करील, त्याला गंगास्नानाचें पुण्य प्राप्त होईल, हे ब्रह्मदेवाचे अभयवचन ऐकून सर्वांस मोठा आनंद प्राप्त झाला. नंतर धर्मराजानें ब्रम्हदेवाची आज्ञा घेऊन, यज्ञास अरंभ केला असतां, या करजानदीचे उत्तर तिरीं शंकर लिंगरूपानें प्रगट झाले. हे कृष्ण प्रमुख पांडवांनीं पाहून त्या लिंगाचे यथाभक्त्या पुजन केलें, व विनयपूर्वक बोलूं लागले कीं, हे प्रभो या सर्व ब्रम्हवृंदास व या शेवकास आपले प्रत्यक्ष दर्शन झाले पाहिजे. ही धर्मराजाची व कृष्णाची स्तुतिपर भाषणें ऐकून शंकरांनीं सर्वांस प्रत्यक्ष दर्शन दिलें. पुढें धर्मराजानें शंकरास विनंती केली कीं, महाराज कृपा करून या दासास मार्तंड भैरवाचे चरित्र सविस्तर निवेदन करावें, ही शंकरांनीं धर्मराजाची

स्तुतिपर भाषणें ऐकून मोठे सुप्रसन्न झाले. व मोठ्या आनंदा-
नें मुळारंभा पासून ते अखेरपर्यंत मार्तंडभैरव चरित्र धर्मराज्यास
विदित केले असतां, धर्मराज पुन्हा विनंती करते झाले कीं, हे दि-
नदयाळा या कंदर्पाचे जर ब्राम्हणांनीं शेवन केले. तर तो ब्राम्हण
ब्रम्हजन्मापासून भ्रष्ट होतो, त्याचा पुन्हा वृतबंध केला पाहिजे असें अ-
सून जन मार्तंडभैरवास नैवेद्यामध्यें कंदर्प आर्पण करितात, तरी या-
चे कारण काय? ते कृपाकरून या दासाल विदित करावे, हे धर्मवा-
क्य ऐकून शंकर बोलते झाले कीं, सामवेद श्वानरूप धरून राहिला
आहे हे मागे सांगितलेच आहे. पुढें तो सामवेद शाप मुक्त होच्छा-
ता आपले पूर्वरूप धारण केले व श्वानरूप सोडून दिले त्या साम-
वेदाचेच सहा भाग पृथ्वीला व्यापून आहेत हा वृत्तांत हरिश्चंद्रा-
चे यज्ञात सविस्तर वर्णीला आहे त्यातीलच हा एक कंद होय.
पुढें ते सहा अवयव माझे गणांनीं आणून मजपुढें ठेविले असतां
मी ते भाग देव पितरास वाटून दिले ते वेळेस त्या सामवेदाचे
वृषण देवेंद्रानें उचलून घेतले, ते मी आवलोकन करतांच देवेंद्रास
सांगितले कीं, हे सामवेदाचे वृषण अशुद्ध आहे याचा कोणी
स्वीकार करूंनये, हे ममवाक्य देवेंद्रानें ऐकतांच तो हातांतील कंद
खालीं टाकून दिला, तो कंद माझे चरणा जवळ पडला असतां मा
झे गणांनीं माझी विनंती केली कीं महाराज या कंदाने आपले
चरण अवलोकन केले आहेत यास्तव याचा उद्धार झाला पाहि-

न, ही गणांची विनंती ऐकून मी त्यास सांगितलें कीं, जे वेळेस मार्तंड भैरव औतार होईल ते वेळेस या कंदर्पाचा उद्धार होईल, या कारणामुळें मार्तंड भैरवाचे चंपाषष्ठीचे कुलधर्माचे दिवशीं ब्राम्हण आदि सर्व जातीनें कंदर्पाचे पदार्थ करून मार्तंड भैरवास आर्पण करावे व शेष राहिलेला प्रसाद सर्वांनी भक्षण करावा, ब्राम्हणांनी चंपाषष्ठी शिवाय कंदर्प भक्षण करूंनये जर अन्य दिवशीं कंदर्प भक्षण करील तर तो ब्राम्हण ब्राम्हणधर्मापासून भ्रष्ट झाला व त्याचा संस्कार पुन्हा केला पाहिजे, आणि जो ब्राम्हण चंपाशष्ठीचे दिवशीं कंदर्प भक्षण करील त्याला दोष नाहीं या प्रमाणें, या कंदर्पास मजपासून वरप्रदान मिळाले आहे, म्हणून हा कंदर्प मार्तंड भैरवास प्रीय आहे. हे शंकरभाष्य ऐकून सर्वांस मोठा आनंद प्राप्त झाला. पुढें राजानें शंकराची आज्ञा घेऊन यज्ञाची समाप्ती केली असतां ते वेळेस मोहोच्छाव झाला, व सुर वृंद विमानांत बसून पुष्पवृष्टी करूंलागले ते वेळेस यज्ञोपवीत जो नीरजर नामा नाग तो पुष्प सुवास घेण्याकरीतां शंकराचे कंठांतून निघून गेला हे शंकरानीं पाहून धर्मराजास बोलते झाले कीं, तुझे यज्ञ समारंभाचे गडबडींत माझे यज्ञोपवीत कोठें गेले त्याचा मला शोध नाहीं तुटले म्हणावे तर त्याचे तुकडेही दिसत नाहीत व मी त्रिगुण सूत्राचे यज्ञोपवीत धारण करणारा नव्हे, मी नाग यज्ञोपवीती आहे तस्मात आमचे यज्ञोपवीत शोधून आणा, शंकरभाष ऐकतांच धर्मराजानें पुष्कळ शोध केला परंतु त्याचे

पत्ता न लागल्यामुळें तो फार निराश झाला. हे शंकरानीं पाहूं बोलते झाले कीं येथून जवळच नागेशराज देव आहे, त्या स्थळीं तुम्ही जा, म्हणजे तुम्हास आमचे यज्ञोपवीत सांपडेल. ही पंचवदनाची भाषणें ऐकून श्रीकृष्ण व धर्मराज फार त्वरेनें निघाले आणि नागेशा जवळ येऊन त्या स्थळीं एक ब्राम्हण त्याचे दृष्टीस पडला असतां कृष्णानीं त्यास विचारलें कीं, तूं कोंण आहेस व तुझे नांव काय आणि तूं राहणार कोठील वगैरे सर्व मजकूर सांग, मग तो ब्राम्हण बोलूं लागला कीं, मी निरजरा नामा नाग आहे, नागेशाची पूजा करावया करितां या स्थळीं आलों आहे. नंतर तुला शंकरानीं फार त्वरेनें बोलाविलें आहे असे कृष्णानीं त्या नागास सूचविलें असतां मी नागेशाची पूजा करून येतो असे त्या निरजरानें कृष्णास सांगितलें आणि आंपण नागेशाची पूजा करावयास गेला. त्याची पूजा होई तों पर्यंत धर्म, कृष्ण त्या स्थळीं बसले, नंतर त्या निरजरानें नागेशाची पूजा केल्यावर श्रीकृष्ण व धर्मराज त्या नागासह निघून यज्ञ शाळेत येते झाले. पुढें शंकरास नमस्कार करून ते नाग यज्ञोपवीत कृष्णानी शंकराचे स्वाधीन केले असतां शंकरानी मोठ्या आनंदानें ते नाग यज्ञोपवीत कंठाचे ठायीं धारण केलें. नंतर त्या स्थळीं एक घटकाभर ब्रम्हानंद होऊन राहिला होता. पुढें शंकर लागलीच लिंगात गुप्त झाले व ब्रम्हदेवही तेव्हांच निघून गेले. मग श्रीकृष्ण व ब्रम्हवृंद धर्मास विचारून आपआपले स्थानीं जा-

ते झाले. पुढें धर्मराज आपले बांधवासह निघून मार्ग क्रमू लागले, पांडवांनीं ज्या स्थळीं यज्ञ केला त्या स्थळास हल्लीं पांडेश्वर असें म्हणतात. पुढें कलियुग लागल्यावर मार्तंड भैरव जयाद्रि क्षेत्रीं पर्वतावर लिंगाकार गुप्त रूपें असतां सुपे मुक्कामीं खैरे या नांवाचे मराठी पाटील आहेत, त्यांचे वंशीं भाव्या या नांवाचा एक पुरुष उत्पन्न झाला असतां तो मार्तंड भैरवाची अतिशय भक्ति करूं लागला, तो नित्य रविवारीं सुप्याहून निघून कडेपठारीं येत असे व मार्तंड भैरवास आष्टभावें लीन होऊन पुन्हा सुप्यास निघून जात असे.

असा कांहींकाळ क्रम चालू असतां त्या भाव्याभक्ताचा वृद्धापकाळ झाला, तथापि त्यानें आपला नेम सोडिला नाहीं, पुढें तो भाव्या भगत सुप्याहून कडेपठारीं येण्याकरितां निघाला असतां कष्टानें करजानदी उतरून अलिकडेस आला, आणि व्याकूळ होऊन मूर्छित पडला असतां मार्तंडभैरवांनीं म्हाळसासहित अश्ववाहन चतुरभुज असे त्या भाव्या भक्तास दर्शन दिलें, व सांगितलें कीं, मी जयाद्रि क्षेत्रानजीक डोंगरावर वास करित आहे, यास्तव तूं आजपासून पठारी न जातां, त्या डोंगरावर माझे दर्शनास ये ह्मणजे त्या स्थळीं मी तुला दर्शन देईन, असें मार्तंडभैरवांनीं त्या भाव्या भक्तास सांगून तात्काळ अंतरधान पावले. पुढें तो भाव्याभक्त सावध होऊन चहुकडे पाहतो तंव तें स्वरूप दिसत नाहीं, परंतु फक्त घोड्याचे खूर मातींत उमटलेले त्याचे दृष्टीस

पडले, नंतर त्या भाळ्याभक्तानें त्या स्थळास घोडेउड्डान असें ना‑ व ठेऊन आपण जयाद्रिक्षेत्रीं निघून आला, पुढें तो भाळ्याभक्त पर्वतावर चढून गेला असतां, त्याचे दृष्टीस धनुषाकृती मार्तंडभै‑ रवाचें व म्हाळसेचे अशी दोन लिंगे दृष्टीस पडली, नंतर त्या भाळ्याभक्तानें मार्तंडभैरवाचे यथासांग पूजन केलें असतां मार्तंडभै‑ रव फार संतोषित झाले, पुढें रात्री तो भाळ्याभक्त त्या लिंगा सेजा‑ रीच एके बाजूस निजला असतां, मार्तंडभैरव त्याचे स्वप्नांत गेले व सर्व एकंदर आपले चरित्र त्या भाळ्याभक्तास विदित केलें, पुढें तो जागृत झाल्यावर स्वप्नाचे मोठें आश्चर्य मानून परमेश्वराचा स्तव करूं लागला. पुढें प्रातःकाळ झाल्यावर त्या भाळ्याभक्ता‑ नें मार्तंडभैरवाची यथाविधी यात्रा केली, नंतर त्या पर्वताचे पूर्व बाजूस जेजेवाडी या नांवाचे एक गावंढगांव होतें त्या गांवांत तो भोळा भक्त आला, व सर्व लोकांस झालेला मजकूर विदित करून त्या सर्व लोकांसह पुन्हा पर्वतावर चढून तें सर्व लोक मार्तंडभैरवास शरण गेले. नंतर सर्वांची दर्शनें झाल्यावर तें सर्व लोक पर्वताखालीं उतरून आपआपले घरीं निघून गेले. मग मार्तंडभैरवाचा प्रसार दिवसनदिवस जास्त होत चालला असतां पुष्कळ लोक मार्तंड भैरवाची दृढभक्ती करूं लागले. पुढें वीरपाळ वीरमल्ल या नांवाचा एक पूर्ण मार्तंड भक्त होता त्यानें शके तेराशें तीनांत मार्तंड भैरवाचे मंदीर ह्मणजे आंतील गाभाऱ्याचें काम करविलें. हा मनुष्य जातीचा कोण होता,

न रहाणार कोठील याचा कांहीं बराबर शोध लागत नाहीं. मुक्काम खठाव या गांवीं राघो बंबाजी या नांवचा कोणी एक पुरुष उत्पन्न झाला असतां तो बाळपणापासून, मार्तंड भैरवाची भक्ती करीत असे, पुढें त्या राघो बंबाजीस दिल्लीचे बादशाहानें जुन्नर प्रांतीं बंदोबस्ताविषयीं नेमिलें असतां त्यास गज्यांत लक्ष्मी प्राप्त झाली, नंतर पुढें एके दिवशीं ते मार्तंड भैरवाचे यात्रेस आले असतां राघो बंबाजीचे मनांत असें आलें कीं, मार्तंड भैरवांनीं आपल्यावर पूर्ण कृपा केली आहे, यास्तव या स्थळीं आपण कांहीं तरी पुण्य पुरुषार्थ करून इहलोकीं व परलोकीं, शक्तिनरूप कीर्त करावी, मग त्या राघो बंबाजीनें शके पंधराशें सत्तावनांत मधील गाभाऱ्याचें काम व त्याचें पुढें सदरेचें काम तयार करविलें. आणि सभोंवतीं, कोटाचें काम तयार करून आंतील बाजूनें ओवऱ्या बांधिल्या. या कामास कोट्यावधी रुपये खर्च झाला असे जुने लेखावरून कळतें, दुसरे राघो बबाजीनें या पर्वताचे उत्तर बाजूस खालीं पायऱ्यांशीं एक उत्तम प्रकारची विहीर बांधली आहे. त्या वीहीरीस हल्लीं फकिराची वीहीर असें ह्मणतात. व या राघो बंबाजीस बादशाहानें राजे अशी पदवी दिली होती; म्हणून त्याचे वंशास हल्लीं खटावकर महाराज असें ह्मणतात. दुसरें असें कीं गिझनीचा बादशाह महंमद हा जे वेळेस हिंदुस्थानावर स्वाऱ्या करीत होता ते वेळेस त्यानें जेजुरीस येऊन मार्तंड भैरवाचे मंदीर फोडण्याचा इरादा केला असतां

मार्तंड भैरवांनीं त्या स्थळीं असंख्य भुंगे उत्पन्न केले, पुढें त्या भुंग्यांनीं त्या महमदाचे सेनेस अतिशय त्रास दिला तो असा कीं,त्या भुंग्यांनीं लोकांस चाऊनचाऊन त्यांचे सर्व आंगाचे रक्त काढले म्हणून त्या सर्व लोकास अतिशय दुःख प्राप्त झाले. हे महमदानें पाहून त्यास ही मोठें दुःख प्राप्त झालें, नंतर त्यानें मार्तंड भैरवास विनंती केली कीं जर तूं खरा व तेजोरूपी अस-लास तर हें दुःख सत्वर निवारण कर, म्हणजे मी तुला अनन्य भावानें शरण येईन व एक लक्ष रुपयाचा भुंगा तयार करून तु-ला आर्पण करीन हें महमदाचें विनयपूर्वक भाषणें ऐकून मार्तंड भैरवास मोठी दया उत्पन्न झाली, नंतर पुढें एकाएकीं ते सर्व भुंगे नाहींसे झाल्यावर महमदानें आपले रूमालानें आपले हात बांधून त्या पर्वतावर चढून गेला असतां म्हाळसेसहीत मार्तंड भै-रवाचे लिंग धनुष्यासारखें त्या महमदाचे दृष्टीस पडलें, तें पाहून त्या महमदास असा भास झाला कीं, हा देव आपले वीरासारखाच आहे, ह्मणून त्यानें मार्तंडभैरवास मलुखान असें नांव ठेविलें. नंतर एकलक्ष रुपयाचा भुंगा त-यार करून मार्तंडभैरवास अर्पण केला, व आपले सेनेसहीत मह मद निघून पुढें गेला. महमदानें जो भुंगा वाहिला, तो पाचे-चा खडा भुंग्याचे आकृति सारखा सोन्याचे कोंदनात बसविला होता, व सभोंवती लहान लहान कोंदनें करून त्यांत उत्तम प्र-कारची रत्नें बसविली होती. पुढें पूर्वबाजूस जी जुनी वस्ती

होती, ती मोडून पर्वताचे उत्तर बाजूस नवी वसाहत काय कारणामुळें झाली, हे बरावर समजून येत नाहीं. पुढें शके सोळाशें अकरांत पंच लिंगाचे देऊळ विठल शिवदेव दाणी सासवडकर, ऊर्फ विंचूरचे जाहागीरदार यांणीं बंधन केलें, असें तेथील लेखावरून कळतें. आतां होळकर यांचे कुलांत आहिल्या या नांमें एक विख्यांत स्त्री होऊन गेली, त्या आहिल्याबाईनें जागजागीं मोठी किर्ति केली आहे हें सर्वांस माहितच आहे. त्याच आहिल्याबाईनें जेजूरिक्षेत्रीं येऊन मोठी किर्त केली, ती अशी कीं, जो पूर्वीं खटावकरांनीं कोट बांधिला होता, तो फार मोडकळीस आला होता. तो उलगडून त्याच जाग्यावर व त्याहीपेक्षां सुरेख मंदिरा सभोंवती उत्तम प्रकारचा कोट बंधन केला. तें काम अनुक्रमें कसें झालें तें खालीं लिहितो घृतमारी व पश्चम दरवाज्याचें काम शके सोळाशे चौसष्टांत झालें. बारद्वारीचें काम व कचेरीचें आणि चौघड्याचें काम म्हणजे उत्तर बाजूचें काम शके सोळाशें आठयाहत्तरांत पुर्ण झालें. पुढें सोळाशे नवदांत आग्नेय दिशेचें काम झाले. व शके सोळाशें-ब्याणवांत पूर्व बाजूस दरवाजाचें व कोटाचें काम सिद्दीस गेले. नंतर दक्षणचे बाजूस खटावकराच्या दहा व जशाच्यातशाच कायम ठेऊन त्याचे पुढे म्हणजे पंचलिंगाचे नैरीत्य कोनास काम केलें, तें काम शके सोळाशें नव्याण्णवांत झाले, व भंडार घरचें काम शके सोळाशें आठयाहत्तरात श्रीगोंदेकर यांनीं बांधीलें.

परंतु कोणी बांधिले व त्याचे नांव काय याचा बरोबर शोध लागत नाहीं, आतां ईकडे जे वेळेस शाहुमहाराजांचा उत्कर्ष झाला व सातार मुकामीं राज्याअधिकार प्राप्त झाल्यावर त्यांनी मार्तंड प्रित्यर्थ दोन तीन गांवें ईनाम दिलीं ती असी कीं, गोसावी या आडनांवाचे ब्राम्हणास कोळवीहीरे हा गांव व जेजूरी येथील कांहीं जमीन ईनाम दिली. आणि त्यांजकडेस सेजारतीचा नैवेद्य व सोमवतीस व दसऱ्याचे दिवशीं मार्तंड भैरवाची स्वारी बाहेर शिकारीस निघत असती ते दिवशीं सर्व यात्रेकरी व भक्तलोकांस म्हूशाहिरा म्हणजे बेल भंडार व जोंधळे वाटण्याचें काम सांगितलें आहे, या कारण मुळें त्या ब्राह्मणाचे वंशास पेशवे असें ह्मणतात. व नाझरे हा गांव गौतम गोत्रीं ब्राह्मणास देऊन त्याजकडे देवाजवळ पुराण वाचण्याचे काम नेमलें. त्यांजला हल्लीं चौधरी अशी संज्ञा आहे. कुंभारनळण येथील मोकासबाब व बेलसरास कांहीं जमीन इनाम देऊन मुजुमदार या आडनावाचें ब्राह्मणास म्हाळसाकांतासमोर दररोज कीर्तन करण्याचे काम सांगितले. व चांदीच्या मल्हारी म्हाळसेच्या मूर्ति अलंकारासहित त्या मंदिरांत प्राणप्रतिष्टा करून बसविल्या या मूर्ति सुमारे बारा हजार रुपयाचे किंमतीच्या असतीलसें वाटतें. दुसरे चंदीचंदावरचे राजानीं सुवर्णाचा खंडोबा म्हाळसेचा जोड प्रभावळीसहित अलंकार युक्त तयार करून पाठवून दिला. त्याचे समवेत कारकून वगैरे सर्व बंदोबस्त होतांच त्या लोकांनीं

जेजुरीस येऊन उत्तम प्रकारें त्या मूर्तींची प्रतिष्टा करून स्थापना केली. या मूर्ति अदमासें साठ हजार रुपयांचे किंमतीच्या असतील. पुढें पेशव्यांचे राज्यांत जे वेळेस नारायणराव मरण पावले व गंगाबाईस पुरंदरावर आणून ठेविले आणि गर्भ श्रीमंत सवाई माधवराव यांचे नांवें राज्य चालविलें तें वेळेस गंगाबाईस पुत्र व्हावा ह्मणून नाना फडणविसानें मार्तंड-भैरवास एक लक्ष रुपयांचा नवस केला होता. पुढें सवाई माधवरावाचा जन्म होऊन ते गादीवर बसल्या नंतर त्यानीं तो मार्तंड भैरवास केलेला नवस फेडला. तो असा कीं, पंचवीस हजाराच्या चांदीच्या मूर्ती प्रभावळीसहित करून जेजुरी येथें स्थापित केल्या. व मार्तंड भैरवाचे मंदिरांत पूर्वींची दगडी कामाची मंडपी होती तें सर्व काम पंचवीस हजाराचे चांदीनें मढऊन काढिलें आणि पंचवीस हजारांत चांदीची शाळुंका व घंगाळ वगैरे किरकोळ सामान केलें. व बाकी राहिलेले पंचवीस हजारांत लिंगावरील कवचें, व खंडोबा ह्माळसेचे सुवर्णाचे मुखवटे व छत्री, कलगी, तुरा वगैरे अलंकार करून परमेश्वरास आर्पण केले. श्रीगोंदेकरानीं जे वेळेस भंडारघराचें काम करविलें तेच वेळेस पितळेच्या मल्हारी ह्माळसेच्या मूर्ती करून भंडार घरांत स्थापित केल्या. या जेजुरी क्षेत्रीं मार्तंड भैरवाच्या चार यात्रा भरत असतात. मार्गशीर्ष शुद्ध शष्टी व पौष शुद्ध पौर्णिमा आणि माघ शुद्ध पौर्णिमा व चैत्र शुद्ध १९ याप्रमाणें

यात्रा भरून मोठा उच्छाह होत असतो. मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस रात्री मोठया समारंभानें तेलवणाचा हांडा निघून चावडीवर येत असतो, पुढें भक्तलोक आपआपले मानाप्रमाणें यथाअनुक्रमें त्या हंड्यांत तेल घालतात, मग तो हंडा पुन्हा समारंभानें निघून ते लोक वर जातात व त्या हंड्यांतील तेल मार्तंडभैरवास अर्पण करतात.

दुसरें दिवशीं वीर या जातीचे लोक आहेत, त्यांपैकीं एक मनुष्याचे मांडीचे रक्त शस्त्रानें काढून त्या रक्ताचा टिलक मार्तंडभैरवास लावीत होते, ती चाल सुमारें पंधरा सतरा वर्षे झालीं इंग्रज सरकारानें बंद केली आहे. व मार्तंडभैरवा समोर पुष्कळ लोक नवसाचे गळ टोंचून बगाड घेत होते, तेंही तेच वेळेस बंद केलें. व पेशवे सरकारचा चौघडा मार्तंडाजवळ होता तोहि तेव्हांच बंद केला, येथें होळकर सरकारचे अन्नसत्र व चौघडा, नैवेद्य, नंदादीप अद्यप चालूं आहे. व होळकर सरकाराकडून मार्तंडभैरवास शिवरात्री करितां गंगोत्रीची कावड येत असती. मार्तंडभैरवाचे किल्लयास पूर्वपश्चिमेस व उत्तरेस असे तीन दरवाजे आहेत, त्यांपैकीं उत्तरचे दरवाजाचें काम पूर्वीं खटावकराचें होतें, ते तसेंच आंतले बाजूनें राखून होळकरांनीं आपले काम बाहेरचे बाजूस दुसरें केले आहे. या तिन्ही रस्त्यास पायऱ्या बांधून काढल्या आहेत, मार्तंडभैरवाची पूजा करण्याचा अधिकार गुरवांकडेस आहे या गुरवांत चार तक्षीमा आहेत. व मार्तंडभैरवा पु-

दील उत्पन्नाचा हाक्क निमे गुरवाचा आहे, व निमे उत्पन्नांत ला-भिणा जातीचे लोक आहेत त्यांनीं निम हिस्सा घ्यावा, व बाकी चौथे हिश्याचे उत्पन्न राहिलें ते वीर व घडसी या दोघांनीं वाटून घ्यावें. व लाध्यांनीं देवाचे नंदादीपावर नजर ठेवावी आणि धुपारतीचे वेळेस मोरचल वगैरे परमेश्वराची हरयेक नोकरी करावी. वीर व घडसी यांनीं देवाचे पूजेचे वेळेस ढोल व सूर सनया वगैरे वाद्यें वाजवावीत. आतां चंपाशष्ठीचे सहा दिवस अश्वीन मासचे शनवार रविवार सोमवार असे मिळून बारा दिवस व पौष आणि माघ असे येकंदर दोन महिनें आठरा दिवसावर पेशवे अमलापासून डबी बसली आहे, व तें उत्पन्न सरकार तर्फे राहून त्या उत्पन्नांतून नैवेद्य नंदादीप व दुसरें कांहीं किरकोळ खर्च होत आहेत. सुमारें चाळीस वर्षांचे मागें मार्तंडभैरवावर दरोडा आला होता तें वेळेस त्या दरवडेवाले लोकांनीं त्या चांदीसोन्याच्या मूर्ती व कांहीं अजबाब लुटून देवळांत जे लोक होते त्यास मारहाण वगैरे पुष्कळ केली, नंतर ते लोक त्या अजबाबासह निघून पश्चिमेच्या दरवाजानें गेले असतां देवळांतील लोकांनीं वरून बोंबा मारिल्या, तें ऐकून सर्व गांवचें लोकांनीं व असपासचे गावंढे गांवचे लोकांनीं धावणें केले त्यामुळें ते चोरटेलोक घाबरले, व ते लोक थोडे असल्यामुळें त्यानां तें ओझें जाईना म्हणून त्यांनीं जागजागीं त्या मूर्ति व प्रभावळी वगैरे सामान टाकून दिलें, व कांहीं जवाहिर सामान लवथळवे ओढ्यांत सरासरी पुरून एक

म्हाळसेची मूर्त व भुंगा आणि चैाकडा वगैरे सामान घेऊन गेले परंतु त्या मूर्तीचे वोझ्यामुळें ते फारच बेजार झाले, म्हणून त्यांनीं ती मूर्त, बेलसरचे रानांत पुरली, नंतर ते चोरटे लोक येक भूंगा व भैरवाचा चौकडा आसे घेऊन निघून गेलें. आतां ईकडे ते ग्रामस्थलोक त्या चोरट्याचा पाठलाग करीत असतां मूर्तीसह सर्व चीजवस्त सांपडली, परंतु एक मुर्त, भुगा व चैाकडा हे मात्र सांपडले नाहीं, व त्या लोकांचाही पत्ता लागला नाहीं पुढे बारावर्षांनीं येक कुणबी शेतांत नांगर हाकीत असतां त्याचे नांगरास ती चोरटे लोकांनी पुरलेली देवीची मुर्त लागली असतां कुणबी आपले गावांत म्हणजे बेलसरांत गेला व झालेला मजकूर सर्व गांवकरी लोकांस कळवीला. नंतर ते गांवकरीलोक सर्व मिळून त्या शेतांत मूर्तीजवळ आले. मग मोठ्या समारंभानें त्या म्हाळसा देवीस बेलसरास घेऊन गेलें व झालेला मजकूर जेजुरकरास लिहून कळविला असतां सर्व क्षेत्रस्थलोक सुदिवस पाहून मोठे समारंभानें त्या मूर्तीस आणावया करितां बेलसरास गेले, मग बेलसर करांनीं देवीची उत्तम प्रकारे बोळपण केली. नंतर जेजुरकर आईस घेऊन मोठ्या समारंभाने जेजुरीस आले, व यथाविधी आर्च्या करून त्या मूर्तीची पूर्वजागीं स्थापना केली. या गांवी आश्वीनमासी शनवारी जाग्रण म्हणजे प्रदोष पुजेला दुधाचा आभिषेक होऊन पुजा झाल्यावर छबीना निघतो मग मानाच्या जागा नेमल्या आहेत त्या जाग्यावर चार चार घ-

टका छत्रीना उभा करून मोठया समारंभानें परमेश्वरास सव्य करून पुनः निघाले ठिकाणीं म्हणजे देवळांत येतात व दुसरे सोमवतीची स्वारी फारच समारंभानें निघून गांवचे उत्तर बाजूस येक कोसावर करउया नदी आहे त्या स्थळीं स्नानास जात अ. सती, पुढें रात्रीं मार्तंडाची स्वारी गांवांतून मोठया आनंदानें रमत रमत किल्ल्यावर चढून जाती, पुढें मुशाहिरा वाटण्याचें काम सुरू होते. कोणत्याही कारणानें स्वारी निघाली म्हणजे भंडार घरांतील मल्हारि म्हाळसेच्या मूर्ति पालखींत बसऊन नेण्याची वहिवाट आहे. व दसऱ्याचे दिवशीं येथील परमेश्वराची स्वारी मोठें थाटानें निघून पेशव्याचे तळ्याचे पश्चमेस देवाचा रमणा म्हणून एक जागा आहे, त्या जाग्याचे दक्षणेस एका लहानशा डोंगरास भेटाभेटीची जागा अशी संवज्ञा आहे, त्या डोंगराच्या पायथ्याशीं स्वारी मंडळीसह दाखल होती, व कडेपठारची म्हाळसासहित भैरवाची स्वारी याच प्रमाणें मोठें समारंभानें निघून त्या डोंगराचे पायथ्याशी येऊन दाखल होती. पुढें त्या दोन्ही पालख्या समोरासमोर उभ्या करितात. व भक्त मंडळी हातांत दिवट्या घेऊन दोहीं रांगेनें या पालखी पासून त्या पालखीपर्यंत उभे राहतात, व मुरळ्या मोठें थाटानें देवापुढें नाचतात. वाघेलोक मोठया आनंदानें सामवेदाचा शद्ब करितात, दारू व वाद्यांची एकच गर्दी होऊन जाती, व भक्तलोक येळकाटे येळकोट असा शद्ब करून मार्तंडभैरवावर हारि-

द्राचूर्ण उधळितात, व प्रेमभरीत होत्सातां आनंदानें नाचतात, यामुळें त्या स्थळीं जो ब्रम्हानंद प्राप्त होतो तो लिहितां पुरवत नाहीं. खरोखरिच जे ब्रह्मसुख अविनाशी म्हणतात त्याप्रमाणें सुख एक क्षणभर त्या स्थळीं मनुष्यास प्राप्त होतें, म्हणजे प्राणीमात्रांची मनें त्या जागीं भेटाभेटीचे वेळेस अगदीं निर्विकल्प होऊन जातात. पुढें ती स्वारी निघून तिकडे जाती, व ही स्वारी निघून इकडे येती. ज्या प्रमाणें जेजुरीस रचना आहे त्याच प्रमाणें कडेपठारी ही रचना आहे. या मंदिराप्रमाणेंच कडेपठारी मंदिर आहे. परंतु पठारी कोट वगैरे कांहीं नाहीं, फक्त मंदिरा सभोंवती थोडी फरसी असून देवा समोर एक मोठें दगडाचें कासव केलें आहे. व देवा समोर लहानसा दरवाजा आहे, आणि दक्षण बाजूस कांहीं ओऱ्या आहेत, या मंदिराचें काम फारच दिवसांचे आहे.त्यामुळें त्याची हकिगत कांहींच कळत नाहीं, परंतु या स्थळीं फक्त मल्हारि म्हाळसेचीं लिंगें मात्र होतीं, पुढें कोणी एका भक्तानें पितळेच्या मूर्ती प्रभावळी सहित करून स्थापित केल्या, व त्या मुर्तीचे उत्तर बाजूस एक संगमरवरी दगडाचा गणपती स्थापीत केला आहे. सुमारें चाळिस वर्षांचे मागें पुण्यास रामचंद्र मल्हार मुनसप होते, त्यांनीं या स्थळीं भैरवाची स्थापना केली, व मार्तंडभैरवाचे मंदिराचे वायव्येस एक लहानसे राममंदीर बांधलें आहे. दसऱ्याचे दिवशीं याच प्रभावळींतील मुर्ति स्वारिस काढित असतात. या कडे-

पठारी गोपाळबावा व लक्ष्मणबावा असे दोन साधू फारच योग्य होऊन गेले. यांनीं म्हैषासुर देवीची स्थापना मार्तंडभैरवाचे ईशान्य कोनास केली आहे. हे पूर्ण शाक्त होते, व ते जातिचे ब्राम्हण असत. पुढे लक्ष्मणबावाचे शिष्य बाळकृष्णबावा व बाळकृष्णबावाचे शिष्य गोविंदबावा, हे ब्रम्हचारिव्रत पालन करून अक्षयीं गायत्री पुरःश्चरणें करीत होते, त्यामुळें त्यांजला सिद्धी प्राप्त झाली होती. त्यांनीं मार्तंडाचे अग्नेयेदिशेस दत्तपंचायतनाची स्थापना केली आहे. यांचे अशिरवादानें सचीवपंतास रावसाहेब हे पुत्र झाले ते दिवसापासून सचीवपंताकडील मार्तंडभैरवास नैवेद्य नंदादीप व एक ब्राम्हण अनुष्ठानास अक्षयी चालू आहे. या गोविंदबावाचा काळ होऊन सुमारें दहाबारा वर्षे झाली. मार्तंडभैरवाचे वायव्य दिशेस सुमारें तीनचारशें हातांचे अंतरावर भगवानगीर गोसावी म्हणून एक साधु राहत होता. तो फार निरापेक्ष असून ब्रह्मअनभवी होता, व परोपकारा करितां तो प्राण जाई पर्यंत झटत असे. या भगवानगिरची गोष्ट अशी सांगतात कीं, एक वेळ उमाजीनाईक बंडवाला याचे मागें इंग्रज सरकारचे लोक लागले असतां ते बंडवाले लोक त्या डोंगरावर पळून गेले तें वेळेस उष्णकाळचे दिवस होते त्यामुळें व श्रम झाल्यामुळें लोक फार व्याकूळ होऊन व तृषेनें पीडीत झाले असतां ते भगवानगिरच्या गुंफेजवळ आले, व पाणी पिण्यास मागूं लागले ते वेळेस भगवानगीर महाराजांनीं एक लहानशी पाण्य

भरलेली घागर आपल्याजवळ घेतली आणि त्या घागरींतील पाणी लोट्यांत ओतून घेत व त्या बंडवाले लोकांस पाजीत, या प्रमाणें सुमारें पांचशे बंडवाले लोक पाणी पिऊन निघून गेले तत्रापी ती घागर पाण्यानें भरलेली तसीच राहिली या प्रकारे अनेक प्रकारचे चमत्कार या भगवानगीर महाराजानीं या जेजूरीचे लोकांस दाखविले त्या पैकीं कांहीं लोक अद्याप आहेत, ते भगवानगीर महाराजाची फारच तारिफ करतात. पुढें भगवानगीर समाधिस्थ झाल्यावर त्या स्थळीं त्यांची समाध बांधून एक लहानसा मठ बांधला आहे त्या मठांत हल्ली भगवानगीरीचे चेले वगैरे मंडळी राहतात. आतां ईकडे नयाद्रीक्षेत्री मार्तंड भैरवाचे किल्ल्यास तीन दरवाजे असून त्या रस्त्यास पायऱ्या आहेत हे मागे सांगितलेच आहे. आतां ह्या तिन्ही रूप्याच्या पायऱ्या व कडेपठारचे रस्त्यास कांहीं कांहीं ठिकाणीं पायऱ्या आहेत त्या मिळून सर्व एकंदर पायऱ्या सूमारें हजार बाराशें असतीलसे वाटतें, व दिपमाळा व मनोरे मिळून आजमासे साडेतीनशें आहेत. आणि दरवाजे बावीस आहेत; यात उत्तर बाजूचे रस्त्यावरच दरवाजे व दीपमाळा बहूत आहेत व हा रस्ता नागाकृती असून, मधेच एक दुसरा रस्ता फुटून बानाईकडेस जाऊन पुन्हा, पूर्व रस्त्यास येऊन दोन ठिकाणीं मिळत आहे. मार्तंडभैरवाचे कोटांत खालीं एकंदर फर्शी केली आहे. व मार्तंडाचेसमोर एक मोठें दगडी कासव केले आहे. व पंचलिंगाचे मागें ह-

णजे पश्चिम बाजूस एक आवाड घातलें आहे, त्या जागयास अबदरखाना असें ह्मणतात. व त्या आवाडाचे पश्चमेस जवळच एक मनोरा बांधितहोते, परंतु त्याचें काम अर्धेंच राहिलें आहे. दुसरे पश्चमदरवाजाचे दक्षण बाजूस एक तालीम आहे व त्या तालमींत दक्षणचे बाजूस एक खोली आहे. या जेजूरिक्षेत्राचे आग्नेयदिशेस पेशवेसरकारांनीं एक मोठा थोरला आष्टपैलुतलाव बांधला आहे, व पूर्व बाजूस त्या तलावास गायमुख केलें आहे, आणि चोरखजीना बांधून पाणी उडविलें आहे, असें काम फारच थोडे ठिकाणीं असेलसें वाटतें. त्या तलावाचे पूर्व बाजूसच पेशवेसरकारची बाग होती, त्या बागांत ते उडविलेलें पाणी आपोआप येत आहे. त्या बागाचा इंग्रजसरकारांनीं मालकी लिलांव केला आहे. त्या तलावाचे उत्तरेस कांहीं जुनी वस्ती आहे, ह्मणून त्या वस्तीस जुनी जेजूरी अथवा शुक्रवारपेठ असें ह्मणतात. व दुसरा तलाव या बागाचे पश्चमेस होळकरसरकारांनीं बांधला आहे. हा तलाव चौकोनी आहे, व या तलावा सभोंवतीं होळकरसरकारचे बगीचे असून, अग्नयकोनास मल्हारराव होळकराची छत्री आहे. या तलावाचे व छत्रीचे कामास सुमारें ऐशीं वर्षें झाली आहेत. हल्लीं होळकरसरकारचें आन्नसत्र व सर्व एकंदर कारखान्यावर होळकरसरकारतर्फे गोविंद विसाजी गोगटे हे नेमिले आहेत, हे फार योग्य असून काम फारच चांगले रीतीनें चालवितात.

आतां इकडे शके सत्राशें सत्तरांत या गांवचे पांच पंचवीस

लोकांनीं विचार करून तीन शेर वजन सोन्याचा देवीचा मुखवटा देवळांतून चोरिला, व आपआपसांत तोडून वाटून घेतला. पुढें एक दोन महिन्यानीं ते लोक त्या द्रव्यमदानें अनेक प्रकारची सोंगेंढोंगें करूं लागले असतां चार सभ्य लोकांनीं तर्क बांधून चौकशी केली असतां देवळांत म्हाळसेचा मुखवटा नाहीं, मग त्यांनीं तालुक्यांत कळवीले असतां अम्मलदार तातडतोब निघून जेजूरीस आले. मग त्या वहमी लोकांस पकडून फारच बारीक रीतीनें चौकशी केली त्यामुळें त्या सर्व चोरीचा पत्ता एकंदर लागला, व त्या लोकांस त्या कामाविषयीं सरकारांतून शिक्षा ही मिळाली होती. या वेळेस पुरंदर तालुक्यास काशिनाथ बावा लोंढे हे मामलेदार होते, गुरव लोकांचे उत्पन्न जप्त केले व ते दिवसापासून त्या देवस्थानचे बंदोबस्ता करितां सरकारानीं पंच नेमले आहेत. पुढें त्या मुखवट्याचे किंमतीचा ऐवज जमा झाल्यावर गुरवांचें उत्पन्न जप्त होते तें खुले झाले व देवीचा मुखवटाही तयार करून आणविला, व पंचानी त्याची आर्च्या केली. पूर्वीं पासून दोन महिनें आठरा दिवसाची सरकारांतून डवी आहे त्या उत्पन्नाचा खर्च पंच मार्फतच आहे. तो असा कीं, मार्तंड भैरवाचा नैवेद्य व नंदादीप आणि पुजेचे वेळेस पुष्पें वगैरे खर्च आहे, व किल्ल्याच्या बंदोबस्ता करितां चार शिपाई नेमले आहेत. हा सर्व एकंदर खर्च सुमारे तीन चारशें रूपयाचा आहे. व उत्पन्नही तितक्याच बेताचे आहे.

सूमारें वीस वर्षं होत आली, धारचे पवार सरकारची स्वारी

जेजुरीस मार्तंड भैरवाचे यात्रेस आली होती, ते वेळेस मधील गाभाऱ्याचे व पुढील सदरेचे दरम्यानांतील दरवाज्याचे काम चांदीनें मढवून काढले आहे. पुढें श्रीमंत तुकोजीराव होळकर सरकारची स्वारी शके शतराशें पंचाहत्तरांत पौषमासी जेजूरीस देव दर्शना कारितां आली होती, ते वेळेस यांनी सूमारें चारशे भार चांदीचे पत्रे करून सदरे पुढील तीन पायऱ्यावर खिळून टाकले आहेत. मार्तंड भैरवाची एकंदर चीजवस्त सुमारें सात लक्षांची असावी असा अजमास होतो. मल्हार तिर्थाचे काम पूर्वी शाहू महाराजांनीं बांधले आहे. पुढें त्या तिर्था सभोंवती लांकडी चौसोपीचे काम हरीबा बापु नौसरीकर यांनीं बांधीले. व कडेपठारी पूर्वी पाण्याचा फारच ताप होता, ह्मणून रामचंद्र मल्हार मुनसफ यांनी देवाचे पूर्व बाजूस एक लहानसे तळें खणीले आहे. त्या तळ्यास जिवंत पाणी तर नाहींच परंतु पर्जन्य काळीं त्या तळ्यांत पाणी जमले म्हणजे तेथील लोकांस बारा महीने पुरतें व एकादें वेळेस महीना पंधरा दिवस तोटाही येतो, कडेपठारी सूमारें वीस पंचवीस घरें आहेत. शके सत्राशे एकूणनव्वदांत जेजुरी क्षेत्रीं म्युनिसीपाल कमेटी बसली व थळमोडची जकात आणि यात्रेकरी लोकांपासून दोन आणे कर घेण्याचा ठराव झाला होता, तो ठराव दुसरे वर्षी बंद करून दर दर्शनास आर्धा आणा द्यावा. या प्रमाणें ठराव झाला आहे. जेजुरीचे कमेटीचे उत्पन्नाचा कांहीं नेम नाहीं, ज्या प्रमाणें यात्रा येईल त्या प्रमाणें उत्पन्न होते म्युनिसीपालटी बसल्यापासून या गांवची बरी-

च सुधारणुक झाली आहे. या कमेटीचे पंचांनीं जानाईचे देवळा सभोंवती एक चौसोपी धर्मशाळा बांधली आहे, व गांवांतून सडका केल्या आहेत, आणि होळकर सरकारचे तलावास पाणी बाहेर काढून देण्याचा रस्ता असून, एक दोन ठिकाणीं उसासही होते, तो रस्ता म्युनिसिपालिटीनें उकरून त्यांत दुसरे लोखंडी नळ टाकून ते पाणी गांवांत आणिले आहे, अद्याप सर्व गांवांत पाणी गेले नाहीं, फक्त जानाई लगत एक हौद व त्या हौदाचे पूर्वेस दोन हौद असे तीन हौदाचे काम तयार झाले आहे, कामांत अलिफंट कलेक्टर साहेब यानीं फार श्रम घेऊन हे नळाचे काम तयार करविले आहे. या गांवांत दवाखाना व लायब्ररीचा खर्च कमेटी कडून होत असतो. या गांवांत सरकारी मराठी शाळा व गेटें असून हा गांव पुरंदर तालुक्याखालीं आहे. या गांवची जोसी कुळकर्णाची वृत्ती खाडे व बेलसरे यांची आहे. व पाटीलकीचे वृत्तींत खोमणे व माळवतकर, अशा दोन तक्षीमा आहेत. या गांवांत मार्तंड भैरव व जानाई मारूती हीच मुख्य दैवतें आहेत. या गांवीं ब्राह्मण वस्ती सुमारें शंभर घरांची आहे. गुरवांचीं घरें पाऊणशें किंवा ऐंशीं असतील, व वाघे मुरळ्यांचीं घरें तीस चाळीस असून सुमारें शें सव्वाशें उदमी लोकही आहेत, आणि शूद्रादि लोकांची वस्ती सुमारें दोन तीन शें घराची असेलसें वाटतें, या जेजुरींत एकंदर वस्ती सुमारें सात आठशें घराची असून या सर्व लोकांची उपजीविका मार्तंड भैरवावरच आहे. या गांवचे देवस्थानचे पंचांत मुख्य सरपं

षि रंगराव ऊर्फ आप्पासाहेब पुरंदरे सासवडकर हे नेमिले आहेत, आतां देवदर्शनास कोणते रीतीने जाण्याचा परिपाठ आहे तो एकंदर खालीं लिहून कळवितों, प्रथमत: किल्ल्याच्या पायथ्याशीं नंदी आहे त्या नंदीचे मुख दक्षणेस आहे. त्या नंदीस सव्य करून पायऱ्या चढण्यास आरंभ केला असतां थोडेंच दूर गेल्यावर वीरभद्राचे स्थान लागते, या वीरभद्राचे मुख उत्तरेस आहे. त्याचें दर्शन करून पुन: पुढें गेलें असतां उजवे हातचा रस्ता सोडून यावा व डावे हातचे रस्त्यानें निम्मे रस्त्यावर गेले ह्मणजे हेगण नामा सरदाराचे स्थान लागते, या ठिकाणीं हेगणाचा स्वयंभू, तांदळा असून दोन प्रतिमाही करून बसविल्या आहेत, व एक लहानसें मंदीर बांधलें आहे. या हेगण सरदारास हल्लीं हेगडी प्रधान असें ह्मणतात, या हेगडी प्रधानाचे मुख उत्तरेसच आहे, याचे दर्शन करून पुढें थोडेंच दूर चढून गेल्यावर उजव्या हाताला एक पूर्वमुख गणपतीचें स्थान लागते त्यास नमस्कार करून पुढें गेलें असतां महाद्वारापुढें दक्षणमुख नंदी आहे, त्यास सव्य करानें, त्या नंदीस सव्य करतांना उत्तरेस मुख होते त्या ठिकाणीं अडीच पायऱ्या आहेत. पुढें त्या नंदीस सव्य करून वर चढत असतां डावे हाताला एका दिपमालीके जवळ रामदासानीं स्थापित केलेला मारुती आहे त्याचे दर्शन करून दहा पांच पायऱ्यावर चढून गेलें म्हणजे लागलीच, कोटाचा दरवाजा लागतो, त्या दरवाजाचे पश्चमेस आष्टभैरवापैकींच किल्ल्याचे राखणदार येशवंतराव हावलदार ह्मणून एक दैवत

आहे. त्याचें दर्शन करून किल्ल्यांत शिरावे. या दरवाजाचे पूर्वबाजूस एक तसु रूंदीचा चिरा आहे, व त्या किल्ल्यानजीकच एक घुमट बांधलेले आहे.

मार्तंडभैरवाचे समोर मणिदैत्याची मूर्त आहे, त्या दैत्याचें तोंड पश्चमेस आहे. व बगाडाचे पुढील नंदीचे मुख पश्चमेस असून त्याचे पुढें त्या नंदीस टेकून एक लहानसी मारूतीची मूर्त आहे व मधील गाभाऱ्यांत दोही बाजूस दोन दगडाचे घोडे असून त्यांची मुखें पश्चमेस आहेत, या दोन घोड्या पैकीं उत्तर बाजूचे घोड्यावर स्वार आहे, व दक्षण बाजुचा घोडा खुला आहे. आतां अतिल गाभाऱ्याचे कामाचे वर्णन करितो.

॥ पद ॥ चाल साधी.

॥ चांदीमय तो मंडप कैसा, कारागिरें निर्मिला ॥ तेथील
॥ रचना पाहतां डोळा, आनंद होतो चित्ताला ॥ सिंहासनी
॥ ते भैरवराजे, भव्यरूप त्या मूर्तिचे ॥ दोही बाजूला दोन
॥ स्त्रिया हो, रूप न वर्णवे शक्तिचे ॥ मध्यभागीं त्या भोगही
॥ मूर्त्ति, धातुमय ते मयराळ ॥ प्रभावळीते महाराज बैसे,
॥ त्रैलोक्याचा भुपाळ ॥ मूळ पिठ ते लिंगाकार हो, कवचे
॥ वर्ती अकार ॥ त्याचे आंत तें कैसे हो बसले, महाराज तेथें
॥ शंकर॥दुष्ट मर्दना अवतार घेई, होई तेंव्हां मल्हार ॥ अर्ध
॥ आंगीची सुंदर रमणी, तीच म्हाळसा तवनार ॥ जयानामें
॥ दासी जी होती, तीच बानाइ वेल्हाळ ॥ ऐशा प्रभूला न·
॥ मन मी केलें, चरणीं टेविला हा भाळ॥अनन्य भावे शरण;

॥ रिघुनी, चर्णांतील ती गंगाहो ॥ वंदन करुनि विकल्प हा.
॥ रुनि, त्वरे निघालों तेव्हां हो ॥ वाम पाणीते गुप्त मालुजी-
॥ त्यासी नमिले द्वारांत ॥ सव्य हाताला शय्या पाहिली, मंच-
॥ क कैसा जडीत ॥ आतां पुढें हो सव्य करा या, लाऊन-
॥ ये तो उशीर ॥ बाळदास हा भक्तीबळानें, आकळीतसे
॥ शंकर ॥ १ ॥

मार्तंडभैरवाचे पृष्ठ भागीं जवळच बाणादेवीचे लिंग स्थापीत केलेले आहे व म्हाळसायुक्त मार्तंडभैरवाचे ईशान्य कोनास गुप्तमल्लेश्वराची लिंगें आहेत, तीं लिंगे बारा महिने आपूज्य असतात फक्त शिवरात्रीचे दिवशीं ती खोली उघडून त्या विवराचें तोंडावरील शिळा काढितात, मग रात्रौ त्या लिंगाची पूजा होती. नंतर सर्वांचीं दर्शनें झाल्यावर लागलीच दुसरे दिवशीं पुन्हा ती शिळा त्या विवराचे तोंडावर ठेऊन, त्या खोलीचे दार बंद करून घेतात. दुसरी दक्षण बाजूस एक खोली आहे, त्या खोलींत मार्तंडभैरवाचा शयन करण्याचा मंचक असतो, व. अंतील गाभाऱ्याचे बाहेर निघताक्षणीच उजवे हाताला, जाम दार, खान्याची खोली आहे. व डावे हाताला एक लहानशी खिडकी आहे. ती बहूतकरून आक्षयीं बंद असती आतां मार्तंड भैरवाची, त्रिकाळ पूजा होत असती ते वेळेस दुपारती सव्य निघून अनुक्रमे पूजा करून पुन्हा मार्तंडभैरवाजवळ येऊन दाखल होती त्याचप्रमाणें भक्त लोकांसही सव्य करावे लागते, तो म. जकुर खाली दुपारतीचें पदांत वर्णीला आहे.

॥ पद. चाल कोंकणी वस्ती याचा० ॥

॥ अहोराव तयारी झाली ॥ झाली स्नानाची ॥ आज्ञा मागती ॥ स्वामीची ॥ पाहा ते कैसे ॥ कैसे चांदीचे॥मध्यें वेल सुव॥ र्णाचे ॥ कोंदणें बहु ॥ बहु रत्नाचे॥कोण करील मोल त्या॥ चे ॥ घंगाळ ऐसे ॥ ऐसे सुंदर॥ आंत गंगोदक नीर ॥ ॥ करूनी उष्ण ॥ उष्ण तयार॥भक्त तिष्टती सादर ॥ भरूनी ॥ झाऱ्या ॥ झाऱ्या सिद्धता ॥स्नाना उठा जगत्राता ॥ विलंब ॥ होतो ॥ होतो तो आतां॥दास शिणले प्रार्थिता ॥ स्तवितो ॥ ऐसे ॥ ऐसे प्रभूला॥भावें नमिती चरणाला॥ उठावे देवा॥ ॥ देवा स्नानाला॥संगे घ्यावे म्हाळसेला ॥ विनंत्या करती ॥ ॥ करती ते फार ॥स्तविती दास निरंतर ॥ धांवती तेव्हां ॥ ॥ तेव्हां चतुर॥सिद्ध होती परोपरा॥चौरंग नामी॥नामी चंदनी॥ ॥ फुल्यां जडित अष्टकोनी ॥ सिद्धता केली ॥ केली दासांनीं ॥ उठावे आतां स्वामीनी ॥ हातांत कोणीं ॥ कोणी घेतले ॥ अत्तर आणि उंची तेलें ॥ सुवासी द्रव्य ॥ द्रव्य आणीलें ॥ भावें नमिती पाऊलें ॥ म्हाळसापती ॥ पती न्हाण्याची॥वेळ ॥ झाली प्रदोषाची ॥१॥ अहोराव ॥ अलंकार आतां ॥ आतां ॥ कादावे॥ स्त्रियासहित देवा न्हावे ॥ स्तवन हे देवा ॥ देवा ॥ मानावें ॥ मानस आमुचें पुरवावें ॥ ऐकुनी स्तुती ॥ स्तुती ॥ सत्वरी॥स्नाना सिद्ध हा मल्हारी ॥ जाणिलें त्यानीं ॥ त्यानीं ॥ अंतरीं॥सिद्ध केली पूजा सारी ॥ मोरचल चवऱ्या ॥ चव॥ ऱ्या उडविती॥पंखे हातीं शोभताती ॥ मुरळ्या वाघे ॥

॥ वाद्ये गातातीं ॥ भक्त आनंदे नाचती ॥ शिंगाडे कर्णे ॥
॥ कर्णे तुतारी सनया वाजनी सुंदरी ॥ ताशाचें नाद ॥ नाद
॥ आंबरी॥ढोल गर्जे परोपरी ॥ चौघडे सुरू ॥ सुरू झाले ती
॥ भालदार गर्जतातीं ॥ गुरव ते हात ॥ हात जोडिती॥ म-
॥ ल्हारी प्रती स्तवितातीं ॥ स्वामीच्या अंगीं ॥ अंगीं चर्चिलें
॥ परिमळ आणि उंची तेलें ॥ शर्करा दही ॥ दही आणिलें
॥ मधु लिंबू सोनकेळें ॥ दुधाच्या धारा॥धारा धरून॥पंचामृ-
॥ त हे घालून ॥ शुद्ध उदक ॥ उदक आणून ॥ घालिती
॥ देवालागी स्नान ॥ आंघुळ होती ॥ होती देवाची ॥ मांदी
॥ धावे सेवकाची ॥२॥ अहोरात्र न्हाऊनी सिद्ध ॥ सिद्ध होता.
॥ ची ॥ तयारी आहे वस्त्राची ॥ पुसीती आंग ॥ आंग स्व-
॥ रेची॥पूजा होती हो मालुची ॥ अलंकार वस्त्रे ॥ वस्त्रे सुंद-
॥ री ॥ पितांबर शालू भर्जरी ॥ पैठणी शेला ॥ शेला सुंदरी
॥ शोभतो मंदिल तो शिरी॥ रेखिला टिळा ॥ टिळा भंडार
॥ विराजित दिसे मल्हार ॥ चर्चिले आंगी ॥ आंगी केशर॥आ-
॥ णिक नाना उपचार ॥ गिरद्या लोड ॥ लोड बाजूशीं
॥ तक्या शोभे पृष्ठीशीं ॥ दवणा फुले ॥ फुलें देवासी ॥ भावें
॥ आर्पिती देवासी ॥ मोगरा जाई ॥ जाई शेवंती ॥ मलयागर
॥ मालजाती ॥ गुलाब बेल ॥ बेल आर्पिती ॥ नानापरी शेज
॥ करती ॥ सुवासी धूप ॥ धूप दाविला ॥ घृत दीप समर्पिला॥
॥ जाणुनि तेव्हां ॥ तेव्हां इच्छिला ॥ नैवेद्य आर्पिती देवाला ॥
॥ करपूरदीप ॥ दीप दावीला॥आर्ती चला उजविला॥निघाली

॥ स्वारी ॥ स्वारी सव्याला॥भक्त घेती वलंड्याला ॥ गर्दी झा-
॥ ली ॥ झाली भक्तांची, पूजा पाहाती हो देवाची ॥३॥ अ-
॥ होराव कासववर्ती ॥ वर्ती येऊनि॥मंदीर सव्य घेऊनी॥चाल-
॥ ले पुढें ॥ पुढें त्वरीत ॥ भैरवा भावें पुजित तेथुनी त्वरें ॥
॥ निघाले ॥ आंवालयी त्वेर आले ॥ रेणुकेप्रती ॥ प्रती पुजुनी
॥ सोमसुत्री करूनी ॥ पंच हो लिंगा॥ लिंगा उपचार ॥ पुढे
॥ पाहा भुलेश्वर ॥ तुळसी प्रती॥ प्रती भावानें ॥ सव्य करून
॥ पुढें जाणें ॥ शिवाचा सूत, सूत गणपती ॥ साक्ष ठेवावे
॥ तयाप्रती ॥ द्रौपदी चरणी, चरणी नमूनी ॥ पुढें पाहा तुह्मी
॥ नयनीं ॥ कडे पठार, पठारची खूण ॥ पाहतां चुके जन्म
॥ मरण ॥ काशी ईश्वर, ईश्वर तो भोला॥ त्यासी नमून पुढें
॥ चला ॥ शिळा घृतमारी, मारी तिजप्रती ॥ जन म्हाळसा
॥ हेच वदती ॥ विष्णूचें चर्णीं, चर्णीं नमिले ॥ मन अंतर
॥ बहु धाले ॥ रामाचा दास॥दास हनुमंत ॥ तया दर्शनें म-
॥ न शांत ॥ आनंदे चला, चला झुकत ॥ त्वरें द्वादश द्वारांत ॥
॥ तेथें गणपती, पती शीव सुत ॥ इच्छीत मनचे पूर्वीत ॥
॥ कचेरी पाही, पाही सुंदर ॥ तेथून यावे सत्वर ॥ भैरवापाशीं,
॥ पाशी येऊनि ॥ भावें पूजा आर्पूनि ॥ पुढें मग जावें, जावें
॥ समोर ॥ नैनी पाहा मणीवीर ॥ बगाडा सव्य, सव्य घेऊ-
॥ नि ॥ नंदी वृषणा पूजूनी ॥ आजंनी सुता, सुता नमावे ॥
॥ मग मंदीरी त्वरें जावे ॥ प्रभुचें चरणीं, चरणीं भावानें,
॥ अष्टआंगानें लिन होणें ॥ उत्तरपूजा, पूजा आर्पूनि ॥ भावें

॥ नमा शुळपाणी ॥ अवतार प्रभू, प्रभू हरिहार ॥ धनुष्याकृ-
॥ ती लिंगाकार ॥ तयाचें चरणीं, चरणीं तत्पर ॥ होता होई
॥ आजर आमर ॥ चरणीं लिन बाळ, बाळदासाची इच्छा
॥पुर्वावी मनीची ॥ ४ ॥

पूर्वी भंडार घरांत धुपारतीं आन्नपुर्णेकडेस व स्वारीच्या मूर्तिकडेस जात होती, परंतु सुमारें वीस वर्षे झालीं भंडार घरांत धुपारती जात नाहीं. फक्त शनवारी व रविवारी रात्रौ धुपारती किल्ल्याचे खालीं उतरून, बानाई व हेगडीप्रधान गणपती हावलदार वगैरे दैवतांची पूजाकरून पुन्हा देवळांत वर सांगितल्या प्रमाणें जातात. ज्या मार्गानें धुपारती बानाईकडेस जाती, त्याच मार्गानें फक्तलोकांचा खालीं उतरून येण्याचा पाठ आहे. तो असा कीं, किल्ल्याचे बाहेर थोडेच दूर उतरून गेल्यावर पूर्वी सांगितलेलें गणपतीचे स्थान लागतें, त्या गणपतीचे वरचे बाजूस दोन दरवाजे आहेत, त्यापैकीं डावेहातचे दरवाजानें खालीं उतरावे ह्मणजे अनायासे त्या गणपतीस सव्य होतें. व बानाईस हीं सव्य होऊन तो रस्ता बानाईपुढें येतो. तेथें खडकाला स्वयंभू बानाईची मुर्त आहे, व एक लाहनसें मंदीर बांधलेले असून त्या मंदिरापुढें पाचच्यार ओव्या बांधलेल्या आहेत. आणि त्या ठिकाणीं, दगडाच्या शेळ्या मेंढ्या, पुष्कळच करून बसविल्या आहेत. त्या स्थळीं बाणा देवीचें दर्शन करून खाली उतरले असतां, तो रस्ता पूर्व रस्त्यास मिळतो. मग अगदीं खालीं उतरून आल्यावर डावे हातचे दरवाजानें निघून गांवांत

जावे. या दरराजाचे पश्चमेस एक पिराचें स्थान आहे. आतां बानाईजवळ धुपारती आली ह्मणजे, बानाईची पूजा करून, त्या ठिकाणीं पूर्वपश्चम रस्ता आहे, त्या रस्त्यानें निघून धुपारती प्रधानाकडेस येती. मग पूर्वीं देवदर्शनास जाण्याचा रस्ता सांगितलाच आहे त्याच प्रमाणें धुपारती चढून देवळांत जाती. मार्तंडभैरवाचे ईशान्य कोनास किल्ल्याचे बाहेर फिरंगाई व पिंगळा, अशी दोन देवींचीं स्थानें आहेत. या फिरंगाईदेवीकडेस धुपारती आश्वीनमासी नवरात्रांत मंगळवारी व शुक्रवारी जात असती, मार्तंडभैरवाची प्रातःकाळ पूजा झाली ह्मणजे धुपारती सव्याला निघत नाहीं. व दोन प्रहरचे पूजेस धुपारती सव्याला निघून खालीं बानायीकडेस जाऊन पुन्हां पूर्वीं लिहिल्या प्रमाणें वर येती, आणि आस्तमानचे पुजेस फक्त किल्यांतच धुपारती फिरवितात परंतु शनवारी व रविवारी रात्रौ मात्र धुपारती बानाईकडेस येती.

चंपाशष्टिचे नवरात्रांत व अश्विनमासचे शनवारी मार्तंडभैरवास दुधाचा अभिषेक, मल्हारी महात्मोक्त होत असतो या किल्ल्याचे महाद्वारा समोर, जो दक्षणमुख नंदी आहे त्याचे पृष्टभागीं एक वडाचा वृक्ष आहे. त्या वृक्षाजवळ जेष्ठ शुद्ध पौर्णिमेचे दिवशीं या गावच्या एकंदर स्त्रिया वट पुजनास जात असतात व पूर्व दरवाज्याचे समोर निमे पर्वत उतरून गेले असतां त्या स्थळीं एक नागेशाचे स्थान आहे. त्या स्थळीं नागपंचमीचे दिवशीं एकंदर स्त्रियांचा मेळा मिळत असतो. या मार्तं-

ड भैरवाचे किल्यात एक आशोकाचा व एक बकुळीचा आणि लिंबाचा व चिंचेचा असे चार पांच वृक्ष आहेत, या किल्ल्याचे पायथ्याशी पायऱ्यावर महार लोकांस पाऊतके बांधण्या करितां जागा या गांवचे पाटील कुळकुर्ण्यांनी कांहीं स्वामित्व घेऊन दिली आहे. त्या जागीं महार लोकांनी एक लहानसे देऊळ बांधून त्या देवळांत मार्तंड भैरवाचे पाऊतकाची स्थापना केली आहे. या कामास सुमारें सवाशें वर्षे झाली आहेत. या जेजुरी क्षेत्रांत रवीवार व बुधवार आशा दोन पेठा आहेत त्या रविवार पेठेंत पांढरीचा मारुती आहे व मारुती नजिकच चावडी आहे. आणि या पेठेचे पूर्व बाजूस महा लक्ष्मीचे देऊळ आहे. व बुधवार पेठेंत जानाईचें मंदीर असून होळकराचे वाड्या समोर एक विठ्ठल मंदीर आहे व होळकर सरकारचे तळ्या नजीक जानाईचे पृष्ठभागी देवगिर गोसव्याचा मठ असून त्या मठांत विठोबा रखमाई च्या मुर्ती आहेत, या गावांत जानाईची व चीलावळीची आणि फकीराची व बंगाळीची आशा चार विहीरीं आहेत परंतु एकीचेंही पाणी चांगलें नसल्यामुळें सर्व गांव होळकर सरकारचेंच तळ्याचें पाणी पितो. दुसरे या गांवची रविवार पेठेची वसाहत पूर्वीपासूनच आहे, परंतु बुधवार पेठची वसाहत नवीन सखो मोरेश्वर बेलसरे यांनी केली. या वसाहतीस सुमारें शंभर सवाशें वर्षे झाली आहेत. पूर्वी देवाचे पूर्वेस जेजेवाडी म्हणून वस्ती होती त्या ठिकाणीं एक मारुतीचें देवालय आहे त्या मारुतीस हल्लीं रोकडोबा असें ह्मणतात. या जयाद्रि क्षेत्राचे वायव्य दिशेस एक मैलावर लव ऋषीचें स्थान आहे. त्या स्थळीं लवथळेश्वर

ह्मणून एक महादेव आहे व या महादेवाचें पश्चिम बाजूस लवती-र्थ ह्मणून एक विहीर आहे व त्या विहिरीचे पलीकडेस एक नाला वहात आहे. या लवथळेश्वराचें मंदीर फारच दिवसांचे असल्यामुळें अगदीं मोडकळीस आलें होतें म्हणून ग्रामस्थ लो-कांनीं त्या कामाचा व मंदिराचा जीर्णोद्धार केला, या कामास सुमारें वीस बावीस वर्षें झालीं असावींत. या गांवीं अश्विनमासीं ज्याप्रमाणें मार्तंडभैरवाचें जाग्रण होत असतें त्याचप्रमाणें जानाई देवीचें ही जाग्रण होत असतें. दुसरें असें कीं या जानाई देवी जवळ फाल्गुन वद्य आमावस्येचे दिवशीं लहान लहान गली खणू न त्या गली शेणानें सारवून त्या प्रत्येक गलींत एक एक धान्य घालून त्यावर माती घालून पुरून टाकितात. पुढें दुसरें दिव-शीं ह्मणजे वर्ष प्रतिपदेचे दिवशीं पाटील कुळकर्णी वगैरे गांव-करी मंडळी जमून त्या देवीचे देवळांत येतात, व तें पुरलेलें धान्य निरनिराळें करून पाहातात. याची खूण अशी आहे कीं, ज्या वर्षीं जें धान्य उत्तम प्रकारचें येणार तेंच धान्य सतेज दिस-तें, व एखादे वेळेस त्या धान्यास मोडही येतात. या क्रियास गुढ्या काढणें असें म्हणतात. या गांवांत सगनभाऊ या ना-वाचा एक मोठा विख्यात कवी होऊन गेला. या कवीचे कवी-त या कवीचें नांव सर्व लोकांस ऐकून ठाऊकच आहे. हा मनुष्य जातीचा मुसलमान असून याचे वंशांत शिकलकऱ्याचें का-म करीत होते ह्मणून त्यास सगन शिकलकरी असें म्हणता. आतां मार्तंड भैरवाच्या चार यात्रा भरतात हें मागें सांगितलेंच आहे, त्यापैकीं पौषी पौर्णिमा व माघी पौर्णिमा या दोन यात्रेस पुष्कळ

काठ्या येत असतात. देवाचे भक्त खैरे व होळम आहेत, खैरे हे सुप्याचे राहणार हे पूर्वी सांगितलेच आहे. व होळम हे संगमनेरचे राहणार, यांच्या दोन तक्षीमा आहेत, एक तक्षीम संगमनेरास राहती, व एक तक्षीमेचे लोक सासवडांत राहातात. जेजूरीस एकवर्षी सासवडकर व एक वर्षी संगमनेरकर येतात. खैऱ्याचे काठीस तीर असतो, व होळमाचे काठीस कामटा असतो यापमाणें या काठीच्या खुणा आहेत, ज्या वर सांगितलेल्या यात्रेस येणाऱ्या काठ्या खैरे व होळम यांच्या प्रसादीक आहेत. व या काटकर लोकांपासून या खैरे होळमास किफायतही बरीच होत असती, म्हणून खैरे व होळम हेही आपआपल्या काठ्या व पालख्या घेऊन. या यात्रेस येत असतात. व होळकर सरकारची काठी व पालखी फक्त माघ शुद्ध पोर्णिमेचे यात्रेसच वाफ गांवाहून येत होती, परंतु आज चार पांच वर्षे झाली, ती काठी येत नाहीं, म्हणून होळकर सरकार तर्फे मंडळी ते आपली काठी येथेंच उभी करितात. पुढें पौर्णिमा झाल्यावर द्वितीयेचे दिवशीं रात्रौ या सर्व काठ्या होळकर सरकारचे छत्रीवर जमतात, मग मोठ्या समारंभानें निघून चावडीवर जातात तेथें घटकाभर उभे राहून पुढें नीट पेठेनें निघून किल्ला चढून वर जातात. ह्या काठ्या रस्त्यानें जात असतां खैरे व होळम यांच्या काठ्या सर्वांचे पुढें बरोबर चालवितात व माघमासीं होळकर सरकारची काठी खैरे व होळम यांचे मध्यभागी बरोबर चालत असता होळकराचे उजवे हातास खैऱ्याची काठी व डावे हातास होळमाची काठी असती आतां इकडे त्या सर्व काठ्या देवास

समोर कासवावर येऊन उभ्या राहिल्या म्हणजे प्रथमतः होळ
व खैरे होलम, या त्रिवर्गांच्या काठ्या मार्तंड भैरवाचे शिख
लावितात. या त्रिवर्गांच्या काठ्या शिखरी लागतात नंतर
वांची दर्शने झाल्यावर मार्तंड भैरवाचा प्रसाद नारळ व भं
त्या काटकर लोकांस गुरव हस्ते मिळतो. पुढें त्या काठ्या
यत मोठ्या समारंभानें निघतात व मार्तंड भैरवास सव्य क
किल्याचे खालीं उतरून आपआपले ठिकाणीं जातात. पुढें
त्रा गेल्यावर पांच चार दिवसानीं मार्तंड भैरवाचा शीन उतरत
ते दिवशीं रात्रीं मार्तंड भैरवाची राज्योपचार पुजा करून प
श्वरास महानिवेद्य समर्पण करितात व मोठा मोहच्छाह करित
या प्रकारें करून मार्तंड भैरवाचीं अनेक चरित्रें आहेत, व अ
क प्रकारचे मार्तंड भैरवाचे भक्त आहेत ते या स्थळीं ये
मार्तंड भैरवास अनेक रीतिच्या वस्तु अर्पण करीतात. कित
भक्त लोकांचे आंगात मार्तंड भैरव वायू रूपानें संचार कारित
व रामदास, तुकाराम साधु व आणखी पुष्कळ भक्त लोकांस
र्तंड भैरवानीं अनेक रीतिचे चमत्कार दाखऊन आपली भ
करण्यास लाविले आहे आणि या मार्तंड भैरवाचीं स्थानें
लोक वहूशा गांवोगांव आहेतच असे जें मार्तंड भैरवाचें
चरीत्र तें बाळदासानें त्यांच्याच कृपावलोकने करून यथार्थ
प वर्णिले आहे कळावें. मित्ती शके सत्राशे नव्याण्णव
नाम संवत्छरे माहे वैशाख शुद्ध नवमी रवीवार नक्षत्र आश्ले
दिनी प्रदोष समयास जेजूरी क्षेत्री आद्यंत हा ग्रंथ झाला अस